॥ श्रीमत् शंकराचार्य विरचित ॥

# सदाचार

## या ग्रंथावर श्री हंसराजस्वामीकृत मराठी पद्य टीका

सच्चिदानंदकंदाय जगदंकुरहेतवे ।
सदोदिताय पूर्णाय नमोऽनंताय विष्णवे ॥ १ ॥
सर्ववेदांतसिद्धांत ग्रथितं निर्मलं शिवम् ।
सदाचारं प्रवक्ष्यामि योगिनां ज्ञानसिद्धये ॥ २ ॥
प्रातः स्मरामि देवस्य सवितुर्भर्ग आत्मनः ।
वरेण्यं तद्धि यो यो नः चिदानंदे प्रचोदयात् ॥ ३ ॥
अन्वय व्यतिरेकाभ्यां जाग्रत् स्वप्नसुषुप्तिषु ।
यदेकं केवलं ज्ञानं तदेवाह परं बृहत् ॥ ४ ॥
ज्ञानाज्ञानविलासोऽयं ज्ञानाज्ञाने च पश्यति ।
ज्ञानाज्ञाने परित्यज्य ज्ञानमेवावशिष्यते ॥ ५ ॥
अत्यंतमलिनो देहो देही चात्यंतनिर्मलः ।
असंगोऽहमिति ज्ञात्वा शौचमेतत्प्रचक्षते ॥ ६ ॥
मन्मनो मीनवन्नित्यं क्रीडत्यानंदवारिधौ ।
सुस्नातस्तेन पूतात्मा सम्यग्विज्ञानवारिणा ॥ ७ ॥
अथाघमर्षणं कुर्यात् प्राणापाननिरोधतः ।
मनः पूर्णे समाधाय मग्नः कुंभो यथार्णवे ॥ ८ ॥
लयविक्षेपयोः संधौ मनस्तत्र निरामिषम् ।
स संधिः साधितो येन स मुक्तो नात्र संशयः ॥ ९ ॥
सर्वत्र प्राणिनां देहे जपो भवति सर्वदा ।
हंसः सोऽहमिति ज्ञात्वा सर्वबंधैः प्रमुच्यते ॥ १० ॥
तर्पणं स्वसुखेनैव स्वेंद्रियाणां प्रतर्पणम् ।
मनसा मन आलोक्य स्वयमात्मा प्रकाशते ॥ ११ ॥
आत्मनि स्वप्रकाशाग्नौ चित्तमेकाहुतिं क्षिपेत् ।
अग्निहोत्री स विज्ञेय इतरे नामधारकाः ॥ १२ ॥
देहो देवालयं प्रोक्तो देही देवो निरंजनः ।
अर्चितः सर्वभावेन स्वानुभूत्या विराजते ॥ १३ ॥
मौनं स्वाध्ययनं ध्यानं ध्येयं ब्रह्मानुचिंतनम् ।
ज्ञानेनेति तयोः सम्यङ् निषेधांतःप्रदर्शनम् ॥ १४ ॥
अतीतानागतं किंचित् न स्मरामि न चिंतये ।
रागद्वेषं विना प्राप्तं भुंजाम्यत्र शुभाशुभम् ॥ १५ ॥
अभयं सर्वभूतानां ज्ञनमाहुर्मनिषिणः ।

निजानंदे स्पृहा नान्ये वैराग्यस्यावधिर्मतः ॥ १६ ॥
वेदांतैः श्रवणं कुर्यात् मननं चोपपत्तिभिः ।
योगेनाभ्यसनं नित्यं ततो दर्शनमात्मनः ॥ १७ ॥
शब्दशक्तेरचिंत्यत्वात् शब्दादेवापरोक्षधीः ।
सुषुप्तः पुरुषो यद्वत् शब्देनैवानुबध्यते ॥ १८ ॥
आत्मानात्मविवेकेन ज्ञानं भवति निर्मलं ।
गुरुणा बोधितः शिष्यः शब्दब्रह्मातिवर्तते ॥ १९ ॥
न त्वं देहो नेन्द्रियाणि न प्राणो न मनो न धीः ।
विकारित्वात् विनाशित्वात् दृष्यत्वाच्च घटो यथा ॥ २० ॥
विशुद्धं केवलं ज्ञानं निर्विशेषं निरंजनम् ।
यदेकं परमानंदं तत्त्वमस्यद्वयं परम् ॥ २१ ॥
शब्दस्याद्यंततोः सिद्धं मनसोऽपि तथैव च ।
मध्ये साक्षितया नित्यं तदेव त्वं भ्रमं जहि ॥ २२ ॥
स्थूलवैराजयोरैक्यं सूक्ष्महैरण्यगर्भयोः ।
अज्ञानमाययोरैक्यं प्रत्यग्विज्ञानपूर्णयोः ॥ २३ ॥
चिन्मात्रैकरसे विष्णौ ब्रह्मात्मैकस्वरूपके ।
भ्रम एव जगज्जातं रज्ज्वां सर्पभ्रमो यथा ॥ २४ ॥
तार्किकाणां च जीवेशौ वाच्यावेतौ विदुर्बुधाः ।
लक्ष्यौ च सांख्ययोगाभ्यां वेदांतैरैक्यतानयोः ॥ २५ ॥
कार्यकारणवाच्यांशौ जीवेशौ यौ जहच्च तौ ।
अजहच्च तयोर्लक्ष्यौ चिदंशावेकरूपिणौ ॥ २६ ॥
कर्मशास्त्रे कुतो ज्ञाने तर्के नैवास्ति निश्चयः ।
सांख्ययोगौ द्विधापन्नौ शाब्दिकां शब्दतत्पराः ॥ २७ ॥
अन्ये पाखंडिनः सर्वे ज्ञानवार्तासु दुर्बलाः ।
एकं वेदांतविज्ञानं स्वानुभुत्या विराजते ॥ २८ ॥
अहं ममेत्ययं बंधो नाहं ममेति मुक्तता ।
बंधो मोक्षो गुणैर्भाति गुणाः प्रकृतिसंभवाः ॥ २९ ॥
ज्ञानमेकं सदा भाति सर्वावस्थासु निर्मलम् ।
मंदभाग्या न जानंति स्वरूपं केवलं बृहत् ॥ ३० ॥
संकल्पसाक्षिणं ज्ञानं सर्वलोकैकजीवनम् ।
तदस्मीति च यो वेद स मुक्तो नात्र संशयः ॥ ३१ ॥
प्रमाता च प्रमाणं च प्रमेयं प्रमितिस्तथा ।
तस्य भासावभासेत मानं ज्ञानाय तस्य किम् ॥ ३२ ॥
अर्थाकारा भवेद् वृत्तिः फलेनार्थः प्रकाशते ।
अर्थज्ञानं विजानाति स एवार्थः परं स्मृतः ॥ ३३ ॥
वृत्तिव्याप्यत्वमेवास्तु फलव्याप्तिः कथं भवेत् ।
स्वप्रकाशस्वरूपत्वात् सिद्धत्वाच्च चिदात्मनः ॥ ३४ ॥
अर्थादर्थे यथा वृत्तिः गतुं चलति चांतरे ।
अनाधारा निर्विकारा या दशा सोन्मनी स्मृता ॥ ३५ ॥

चित्तं चिच्च विजानीयात् तकाररहितं यदा ।
तकारो विषयाध्यासो जपारागो यथा मणौ ॥ ३६ ॥
ज्ञेयवस्तुपरित्यागात् ज्ञानं तिष्ठति केवलम् ।
त्रिपुटी क्षीणतामेति ब्रह्मनिर्वाणमृच्छति ॥ ३७ ॥
मनोमात्रमिदं सर्वं चिन्मनो ज्ञानमात्रकम् ।
अज्ञानभ्रम इत्याहुः विज्ञानं परमं पदम् ॥ ३८ ॥
अज्ञानं चान्यथाज्ञानं मायामेतां वदंति ते ।
ईश्वरं मायिनं विद्यान्मायातीतं निरंजनम् ॥ ३९ ॥
सदानंदे चिदाकाशे मायामेघस्तडिन्मनः ।
अहंता गर्जनं तत्र धारासारो हि यत्तमः ॥ ४० ॥
महामोहांधकारेऽस्मिन् देवो वर्षति लीलया ।
अस्या वृष्टेर्विरामाय प्रबोधैकसमीरणः ॥ ४१ ॥
ज्ञानं दृग्दृश्ययोर्भानं विज्ञानं दृश्यशून्यता ।
एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन ॥ ४२ ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं तज्ज्ञानं ज्ञानमुच्यते ।
विज्ञानं चोभयोरैक्यं क्षेत्रज्ञपरमात्मनोः ॥ ४३ ॥
परोक्षं शास्त्रजं ज्ञानं विज्ञानं चात्मदर्शनम् ।
आत्मनो ब्रह्मणः सम्यक् उपाधिद्वयवर्जितम् ॥ ४४ ॥
त्वमर्थो विषयज्ञानं विज्ञानं तत्पदाश्रयम् ।
पदयोरैक्यबोधस्तु ज्ञानविज्ञानसंज्ञकम् ॥ ४५ ॥
आत्मानात्मविवेकस्तु ज्ञानमाहुर्मनीषिणः ।
अज्ञानं चान्यथा लोके विज्ञानं तन्मयं जगत् ॥ ४६ ॥
अन्वयव्यतिरेकाभ्यां सर्वत्रैकं प्रपश्यति ।
यत्तु तत् वृत्तिजं ज्ञानं विज्ञानं ज्ञानमात्रकम् ॥ ४७ ॥
अज्ञानध्वंसकं ज्ञानं विज्ञानं चोभयात्मकम् ।
ज्ञानविज्ञाननिष्ठेयं तत् सत् ब्रह्मणि चार्पणम् ॥ ४८ ॥
भोक्ता सत्त्वगुणः शुद्धो भोगानां साधनं रजः ।
भोग्यं तमोगुणं प्राहुः आत्मा चैषां प्रकाशकः ॥ ४९ ॥
ब्रह्माध्ययनसंयुक्तो ब्रह्मचर्यरतः सदा ।
सर्वं ब्रह्मेति यो वेद ब्रह्मचारी स उच्यते ॥ ५० ॥
गृहस्थो गुणमध्यस्थः शरीरं गृहमुच्यते ।
गुणाः कुर्वन्ति कर्माणि नाहं कर्तेति बुद्धिमान् ॥ ५१ ॥
किमुग्रैश्च तपोभिश्च यस्य ज्ञानमयं तपः ।
हर्षामर्षविनिर्मुक्तो वानप्रस्थः स उच्यते ॥ ५२ ॥
देहन्यासो हि संन्यासो नैव काषायवाससा ।
नाहं देहो महात्मेति निश्चयो ज्ञानलक्षणम् ॥ ५३ ॥
सदाचारमिमं नित्यं येऽनुसंदधते बुधाः ।
संसारसागरात् शीघ्रं मुच्यंते नात्र संशयः ॥ ५४ ॥
इति श्रीमत् भगवत्पादादार्यविरचितः सदाचारः संपूर्णः

* * * * *

## 'सदाचार'वर श्री हंसराजस्वामीकृत मराठी पद्य टीका :

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
श्री सद्‌गुरुकुलस्वामिने नमः ॥ श्रीमातृपितृभ्यां नमः ॥
कोणीएक देवदत्तनामा । परम अधिकारी महात्मा ।
येऊन आचार्यां साउमा । प्रार्थिता झाला ॥ १ ॥
म्हणे जय जय सद्‌गुरुनाथा । बहुत लाविले परमार्थपंथा ।
तेवीं मज शरणागत अनाथा । प्रीतीं स्वीकारावें ॥ २ ॥
मायामोहार्णवीं बुडालो । निजसुख समीप विसरलों ।
केवळ एकदेशी झालों । दास देहबुद्धीचा ॥ ३ ॥
धन्य आजिचा सुदिन । देखिले स्वामींचे चरण ।
आतां सोडवावें येथून । अनाथबंधो ॥ ४ ॥
नेत्रीं अश्रूंचिया धारा । गत्रें कांपती थरथरां ।
वारंवार नमस्कारा । साष्टांग घाली ॥ ५ ॥
आचार्यीं देखून त समयीं । सप्रेम धरिला हृदयीं ।
पद्मकर ठेविला डोईं । म्हणती ना भीं ॥ ६ ॥
पूर्ण पाहून अधिकार । अन्य साधनें सांडूनि दूर ।
उपदेशिला ज्ञाविचार । वेदांतसंमत ॥ ७ ॥
प्रस्थानत्रय जरी पाहतां । अवधी नसे जीविता ।
या हेतू अल्पसंकेता- । माजी अर्थ बहु ॥ ८ ॥
ऐसा सदाचार उत्तम । ज्ञानाची शीगचि परम ।
श्रवणमननेंचि कळे वर्म । समाधानाचें ॥ ९ ॥
ग्रंथारंभीं मंगलाचरण । स्वकीयमुखें करिती पूर्ण ।
इष्टदेवतेचें स्तवन । नमनादिक ॥ १० ॥
शिष्टाचारपरिपालन । हेंचि मुख्य प्रयोजन ।
बोलिल्या तीतीं ठसावे ज्ञान । सच्छिष्यासी ॥ ११ ॥
निर्विघ्न व्हावी समाप्ती । हें नलगे सार्थ्यवंताप्रती ।
तथापि मागील आली पद्धती । तैसे पुढें वर्तती ॥ १२ ॥
आपणचि ब्रह्म पूर्ण । असतां कैसें घडे स्तवन ।
म्हणाल तरी ऐका वचन । सर्वानुभवें ॥ १३ ॥
आपुलेंचि वदन पाहावें । ऐसें इच्छी स्वभावें ।
तरी आरसियापुढें करावें । देखावें मुख ॥ १४ ॥
तैसें अद्वैत पाहणें जरी । दुसरें करून जाणावें तरी ।
पुम्हां स्वमुखामाझारीं । समरसावें ॥ १५ ॥
अपरोक्ष तें परोक्षरीती । घेतां जव्हे दुजी व्यक्ती ।
हेही ज्ञानाची संपत्ती । अज्ञान कवण म्हणे ॥ १६ ॥
ज्ञानें जरी भिन्न झालें । परी अज्ञान तों संऊळीं गेलें ।

पुढें ज्ञानही मावळलें निजस्वरूपीं ॥ १७ ॥
असो एकपण न मोडतां । वृत्तियोगें आत्मा जाणतां ।
सुखचि दुणावे तत्वतां । ऐका आतां मंगल ॥ १८ ॥

सच्चिदानंदकंदाय जगदंकुरहेतवे ।
सदोदिताय पूर्णाय नमोऽनंताय विष्णवे ॥ १ ॥

सच्चिदानंदपरिपूर्ण । या जगद्वृक्षाचे कारण ।
अनंत विष्णुतें नमन । सदोदितासी ॥ १९ ॥
सृष्टिपूर्वीं जें सदोदित । आहेच आहे निभ्रांत ।
जें कां ज्ञानज्ञानातीत । केवळ ब्रह्म ॥ २० ॥
पूर्वीं कांहीं जरी न होतें । तरी जग कासयावरी दिसतें ।
यास्तव आहेच आहे तयातें । नाहीं म्हणे कोण ॥ २१ ॥
पूर्वीं दोरी होती खरी । सर्पकल्पना होय दुसरी ।
तैसी सत्य अधिष्ठानावरी । जगत्कल्पना उमटे ॥ २२ ॥
ऐसें उत्पत्तीपूर्वीं संचलें । सृष्टीमध्येंही व्यापलें ।
नामरूप जितुकें झालें । त्या त्या पदार्थीं ब्रह्म ॥ २३ ॥
मृत्तिकाचि असे घटीं । कीं तंतूचि असे पटीं ।
सर्पामाजी गोमटी । दोरीच अवघी ॥ २४ ॥
तैसें पांच भूतें चारी खाणी । दिसती जीं लोचनीं ।
चंचल तत्त्वें भासकपणीम् । आहे तें ब्रह्म ॥ २५ ॥
आहेपणा वेगळा केला । तरी काय सूप असे त्याला ।
विचारें समजून बोला । कोणीतरी ॥ २६ ॥
जैसें नामरूप उद्भवलें । तैसेंचि मागुती लया गेलें ।
पुढें ब्रह्मचि संचलें । पूर्व रीतीं ॥ २७ ॥
अवं पूर्वीं तेंचि उपरी । मध्येंही तैसेंचि निर्धारीं ।
तिन्ही कालींही दुसरे । अवस्था नसे ॥ २८ ॥
तरंगापूर्वीं पाणी असे । तरंग होतां माजी दिसे ।
लय होतांही आपैसें पाणीच पाणी ॥ २९ ॥
असो तिन्ही कालीं जें आहे । सद्रूप ब्रह्म तेंचि पाहें ।
लक्षण ब्रह्मींचें समजा हें । स्वरूपरूपें ॥ ३० ॥
आतां चिद्रूप ब्रह्म बोलिजे । येणें जडत्व निवारिजे ।
लक्षणें भिन्न न होइजे । स्वरूपभेद ॥ ३१ ॥
चोद्रूप मायेचें लक्षण । बोलतां बहुत दूषण ।
जयाचे भासा भासमान । या श्रुतीसीं विरोध ॥ ३२ ॥
आणि स्वतंत्र झाली माया । हें बोलणेंचि वायां ।
तरी अवधारा निश्चया । चिद्रूप तें ब्रह्म ॥ ३३ ॥
मायेसहित सर्व जडातें ब्रह्मचि स्वप्रभें जाणतें ।
माया चिद्रूप ऐसें वाटतें । अहाच बुद्धि ॥ ३४ ॥

उपनेत्रें स्पष्ट दिसतें । परी डोळा नसतां काय पाहतें ।
तैसें सर्वांसीही अनुभविते । ब्रह्म सर्वज्ञपणें ॥ ३५ ॥
सर्व असतां सर्वांतें जाणे । सर्वांचा लय पाहिला जेणें ।
शून्यासही प्रकाश करणें । स्वक्प्रकाशत्वें ॥ ३६ ॥
वृत्ति नसतां सुषुप्तीं । जाणताहे स्वयंज्योती ।
तैसाचि हा चिन्मूर्ती । अभाव देखणा ॥ ३७ ॥
अभाव होतां मायेचा । लय मानिसी ज्ञानाचा ।
ज्ञानाचे नाहींपणाचा । साक्षी कवण ॥ ३८ ॥
चिद्रूप दुसरें असतें । तरी ज्ञानलया साक्षी होतें ।
हें तो प्रत्यक्ष कळतें । अनुमान कासया ॥ ३९ ॥
आपुला लय आपण । पाहिला म्हणतां दूषण ।
देखिलें स्वयें आपुलें मरण । कोठें कोणे तरी ॥ ४० ॥
चिद्रूपाचा लय झाला । तो सद्रूपें जाणितला ।
ऐसें म्हणतांचि सधला । पक्ष आमुचा ॥ ४१ ॥
सद्रूपा चिद्रूपत्व आलें । तरी चिद्रूपचि सत्य झालें ।
आणि सत्याचें जडत्व गेलें । अनायासें ॥ ४२ ॥
एवं सत् तेचि चित् । ब्रह्म जाणावे निश्चित ।
आणि आनंदही प्रतिपादित । लक्षण तिसरें ॥ ४३ ॥
ब्रह्मीं आनंद कैसा । नसे सुखदुःखवळसा ।
हाही तिन्ही काळीं आपैसा । आहेच आहे ॥ ४४ ॥
आहेपणा तेथेंचि ज्ञान । तैसा आनंदही पूर्ण ।
हीं तिन्हीही लक्षणें जाण । एकेचि ठायीं ॥ ४५ ॥
पाणी द्रवत्वगोडी । यांवेगळें कोण निवडी ।
तैसें एक न राहे अर्धघडी । एकेंविण ॥ ४६ ॥
सुखदुःखाभावीं आनंद । तरी जडजाता नसे खेद ।
आणि आहेपणा तेथें प्रसिद्ध । सुखही असावें ॥ ४७ ॥
ऐसें आक्षेपितां बरवें । येविशीं उत्तर ऐकावें ।
जड चेतन हे जाणावे । विकार दोन्ही ॥ ४८ ॥
विकारीं सुखदुःखें असती । यास्तव नसे आनंदव्याप्ती ।
चेतनीं सुखदुःखें दिसती । जडत्वीं गुप्त ॥ ४९ ॥
रंकासी राज्यपद येतां । सुख प्रगटे तत्वतां ।
तेंचि पुन्हां नष्ट होतां । दुःख दिसे ॥ ५० ॥
जड उत्पन्न जेव्हां झालें । तें सुख ऐसे अनुमानलें ।
लय होतां दुःख कल्पिलें । पाहिजे तेथें ॥ ५१ ॥
जेथें सुखदुःखें दिसती । तेथें आनंदाची प्राप्ती ।
विकार जातां आदिअंतीं । प्रगटचि आहे ॥ ५२ ॥
तस्मात् सुखदुःखांचा अभाव । तेचि निजानंदाची ठेव ।
निजदुःख कल्पितां नां व न्। नसे कोथें ॥ ५३ ॥
एवं सत् चित् आनंद । तीन्ही एकचि अभेद ।

याचि हेतु श्लोकीं असे पद । कंद शब्दें ब्रह्म ॥ ५४ ॥
आतां ब्रह्म जाणावें अनंत । सजातीयादिभेदरहित ।
आणि परिच्छेद जेथें न होत । तेंचि तें तिन्ही काळीं ॥ ५५ ॥
येथें आक्षेप असे थोर । सृष्टिपूर्वीं जें साचार ।
तेहें नसे भेदमात्र । परी उत्पत्तिकाळीं असे ॥ ५६ ॥
जीवईश उद्‌भवतां । हा सजातीय भेद तत्त्वतां ।
तैसें जडही दिसतां । विजातीय भेद ॥ ५७ ॥
जोतां स्वरूपस्फुरण । हें स्वगत भेदाचें लक्षण ।
एवं सृष्टिकाळीं भेदभान । तेव्हां अनंत कैसा ॥ ५८ ॥
याचें उत्तर श्रवण करा । जीवेशभेद नव्हे खरा ।
दर्पणींचा भास दुसरा । साह्य कोणी करी ॥ ५९ ॥
तैसें अविद्यामायेंत बिंबलें । तेंचि जीव, शिव ऐसे बोलिलें ।
खोटें साचाऐसें वाटलें । परी तें नव्हे ॥ ६० ॥
उपाधि तोंवरी मिथ्या भास । वाच्य ऐसें म्हणावें त्यास ।
लक्ष्यांश तेंचि एकरस । परब्रह्म ॥ ५१ ॥
यास्तव भेद नव्हे सजातीय । तैसाचि नाहीं विजाईय ।
जडजात हा समुदाय । सत्यत्वें कोठें ॥ ६२ ॥
ब्रह्मसत्यवांचून । जड होय जरी निर्माण ।
ऐसें नसतां भेदभान । विजातीया कैसें ॥ ६३ ॥
स्फुरणीं स्वगतभेद भाविला । तरी सत्यत्व कईचे त्याला ।
स्वरूपाहून भिन्न कळला । कधीं कोणासी ॥ ६४ ॥
असो त्रिविधभेदांचे । सृष्टिकाळींही नांव न वचे ।
आदिअंतीं तों सहजाचें । आनंदत्व पूर्ण ॥ ६५ ॥
त्रिविध भेद न होती जैसे । परिच्छेदही नसती तैसे ।
परिच्छेदाचें रूप कैसें । जाणावें आधीं ॥ ६६ ॥
पर्जन्यकाळीं आहे । उष्णकाळीं नसताहे ।
हा कालपरिच्छेद पाहें । विनाशी वस्तूसी ॥ ६७ ॥
पर्वतावरी भासलें । जळामाजीं हारपलें ।
देशपरिच्छेद या बोलें । मानिजे ऐसा ॥ ६८ ॥
असे पदार्थीं एकादिया । नाढळे पाहतां दुजिया ।
वस्तुपरिच्छेद ऐसिया । लक्षणें समजा ॥ ६९ ॥
ब्रह्म सर्वदा सर्वकाळीं । कालपरिच्छेद नसे समूळीं ।
व्यापकपणें सर्वां स्थळीं । नव्हे देश परिच्छेद ॥ ७० ॥
प्रह्मस्वरूपावांचून । पदार्थचि असे कवण ।
वस्तुपरिच्छेदाचें लक्षण । ब्रह्मीं नाहीं ॥ ७१ ॥
एवं त्रिविध भेदांचें । अथवा तिन्ही परिच्छेदांचें ।
नांवचि नसतां अनंताचें । लक्षण सिद्ध ॥ ७२ ॥
अथवा कवळा नलगे अंत । म्हणोनि नामें अनंत ।
तिन्ही काळीं अबाधित । लक्षण हेंही ॥ ७३ ॥

जितुकें दिसतें भासतें । उद्भवून सर्व लया जातें ।
अपूर्ण जाणावे पदार्थ ते ते । पूर्ण तें एक स्वरूप ॥ ७४ ॥
आकाश जरी उपमावें । तेंही एकदेशी स्वभावें ।
ऐसें पूर्णत्व समजावें । लक्षण ब्रह्मींचें ॥ ७५ ॥
एवं सच्चिदानंद तीन । अनंतादि परिपूर्ण ।
हीं इतुकींही ब्रह्मलक्षणें । कृत्रीम असती ॥ ७६ ॥
सदोदितपदीं बोलिलें । येणें हेंचि येथें सुचविलें ।
इतुकिया लक्षणें सत्य केलें । तिन्ही काळीं ॥ ७७ ॥
तिन्ही काळींही लक्षणाचा । ओहटचि नसे त्याचा ।
या नांवें बोलिजे वाचा । स्वभावलक्षणा ॥ ७८ ॥
जैसा प्रकाश वर्तुळ दाहक । तिन्ही लक्षणीं अर्क ।
जें कधीं नव्हे न्यूनाधिक । स्वाभाविक या नांवें ॥ ७९ ॥
आतां आगंतुक लक्षण बोलिजे । तेणेंही ब्रह्म नोळखिजे ।
जें क्षणभरी आणि असिजे । एकदेशी ॥ ८० ॥
ऊखरभूमी मृगजळ । आणि पाहिजे मध्याह्नकाळ ।
स्वकिरणीं दिसे जळ । यास्तव हेतु सूर्य ॥ ८१ ॥
तैसा जगरूप खेळ । मृगजळापरी केवळ ।
परी याचें पाहतां मूळ । अधिष्ठान ब्रह्मचि ॥ ८२ ॥
मध्याह्न पाहिजे मृगजळा । येथें पाहिजे सृष्टिवेळा ।
टळतां मृगजळ न दिसे डोळां । लय होतां जग नाहीं ॥ ८३ ॥
जळ ऊखरभूमीं पडे । जग स्वकर्मीं आतुडे ।
मृगजळ असे एकीकडे । जगही एकदेशी ॥ ८४ ॥
सूर्यावीण मृगजळ भासेना । स्वरूपाविण जग दिसेना ।
उभयकार्यांचे हेतु जाणा । मार्तंड ब्रह्म ॥ ८५ ॥
तस्मात् या सर्व जगाचें । कारण ब्रह्मचि साचें ।
केवळ मूळ उत्पत्तेचें । ऐसें नव्हे ॥ ८६ ॥
जैसें उत्पत्तीसी कारण । तैसे स्थितिलयां प्रयोजन ।
सृष्टिस्थितिसंहार होणें । एका अधिष्ठानीं ॥ ८७ ॥
माया हाचि सूक्ष्म मोड । गुणसाम्य जाणावें खोड ।
त्रिगुणशाखा ह्या वाड । भूतें उपशाखा ॥ ८८ ॥
स्थावरजंगमादि खाणी । पत्रें पुष्पें तयालागुनी ।
सुखदुःखें फळें दोनी । आंठोळी कर्म ॥ ८९ ॥
येथींचा भोक्ता जीव । बरें वाईट ठेऊन नांव ।
असो ऐसा प्रपंच सर्व । वृक्षरूपी ॥ ९० ॥
या जगद्रोपाचें कारण । अहंब्रह्म झालें स्फुरण ।
तेचि माया परी जाण । स्वरूपावीण नसे ॥ ९१ ॥
माया म्हणिजे झाली नाहीं । रज्जूवरील जैसा अही ।
परी सत्य अधिष्ठान पाहीं । केवळ ब्रह्म ॥ ९२ ॥
एंचि ब्रह्म जगीं व्यापलें सच्चिद्रूपें कोंदाटलें ।

अस्तिभातिवीण देखिले । पदार्थ कोठें ॥ ९५ ॥
म्हणून हेंही लक्षण । आगंतुक जाणावी खूण ।
परी हें ओळखीचें चिन्ह । ब्रह्म जाणावया ॥ ९६ ॥
आधीं या लक्षणें समजावें । मग सच्चिदादि ओळखावें ।
ब्रह्मज्ञान याचि नांवें । वेदांतसिद्ध ॥ ९७ ॥
चतुर्भुज घनसांवळा । कंठी शोभे वनमाळा ।
उभय लक्षणीं जैसा कळला । विष्णु एक ॥ ९८ ॥
तैसें दोन्ही लक्षणेंवीण । नव्हे कदा ब्रह्मज्ञान ।
म्हणून प्रवर्तती सज्जन । येथिंच्या विषयीं ॥ ९९ ॥
असो विष्णु आणि जगहेतु । सच्चिदादि अनंतु ।
या लक्षणेंशीं युक्तु । ब्रह्म जें कां ॥ १०० ॥
ऐसिया स्वरूपाकारणें अनन्यभावें नमन ।
जें मी नव्हे याहून भिन्न । स्वात्मत्वें ऐसें ॥ १ ॥
अदादिरूपें वर्णिलें । हेंचि परादिकीं स्तविलें ।
अंतःकरणें आठविलें । हेंचि स्मरण ॥ २ ॥
नमन तेंचि अभिन्न । त्रिविध मंगलाचें लक्षण ।
ग्रंथारंभीं झालें पूर्ण । एकाग्रभावें ॥ ३ ॥
मंगलाचें करोनि मिष । वर्णिलें ब्रह्म निर्दोष ।
श्रवणमननेंचि भवविष । तत्क्षणीं जाय ॥ ४ ॥
ऐसें करोनि मंगळा । देवदत्ता देखिलें डोळां ।
बद्धांजली उताविळा । अतिश्रवणार्थी ॥ ५ ॥
चातक वांच्छितसे घन । कीं चकोर इच्छी पयःपान ।
तैसा वेदसारार्थ पूर्ण । मनें आकळूं पाहे ॥ ६ ॥
ऐसें देखोनि कृपामूर्ती । सप्रेम द्रवलें चित्तीं ।
सावध सावध गा म्हणती । निरूपिजेल ॥ ७ ॥
येथूनियां श्लोक चौदा । वर्णिजे ज्ञानाची संपदा ।
पुढें कीजेल संवादा । उपदेशक्रमाच्या ॥ ८ ॥
आधीं उपदेश कां न करिती । याचें प्रयोजन ऐका चित्तीं ।
वर्णितां ज्ञानाची स्थिती । अतिआवडी उपजेल ॥ ९ ॥
नव्हे ज्या विषयाचें ज्ञान । त्याचा कासया करील प्रयत्न ।
म्हणून ज्ञात्याचें समाधान । कळावें कैसें तें ॥ ११० ॥
कैसा तयाचा आचार । कैसा तयाचा विहार ।
आणि कैसा भोगमात्र । अलिप्तता कैसी ॥ ११ ॥
म्हणून उपदेशक्रम ठेविला । ज्ञात्याचा आचार बोलिला ।
तो चवदा श्लोकीं अवधारिला । पाहिजे पुढें ॥ १२ ॥
प्रथम श्लोकीं प्रतिज्ञा करिती । कीं बोलूं सदाचाररीती ।
अधिकारही कवणाप्रती । असे याचा ॥ १३ ॥

सर्ववेदांतसिद्धांत ग्रथितं निर्मलं शिवम् ।

सदाचारं प्रवक्ष्यामि योगिनां ज्ञानसिद्धये ॥ २ ॥

सर्व वेदार्थ गुंफिला ज्यांत । कल्याणरूप मलरहित ।
जेणें योगिया ज्ञान प्राप्त । सदाचार बोलूं ऐसा ॥ १४ ॥
देवदत्त म्हणे जी श्रीगुरू । सत्शब्दें वस्तुनिर्विकारू ।
आचार म्हणता विकारू । क्रियारूप दिसे ॥ १५ ॥
तरी सांगा कृपा करूनी । अति उत्कंठा लागली मनीं ।
ऐसें आचार्यां ऐकोनी । अति संतोष पावले ॥ १६ ॥
म्हणती वत्सा ऐक आतां । निर्विकारचि असे ज्ञाता ।
आचार बोलोका जो तत्त्वतां । रूपक कौतुकार्थ ॥ १७ ॥
क्रियारूप जो आचार । त्याचा अज्ञाना अधिकार ।
ज्ञाता पावला परपार । तेथें क्रिया कैंची ॥ १८ ॥
ज्ञानार्थ जयाची प्रवृत्ती । क्रिया नलगे साधकांप्रती ।
मग ज्ञात्याची निवृत्ती । काय बोलावी ॥ १९ ॥
स्नानशौचादि क्रिया बोलिली । ही कर्माची हेळणा केली ।
कीं हीं सर्वही घडलीं । धात्याप्रती ॥ १२० ॥
हे उगेचि कष्टी होती । व्यर्थचि खटपटीं शिणती ।
यांतील कांहींही फलप्राप्ती । यांसी नसतां ॥ २१ ॥
जैसा वाळूचा घाणा गाळितां । तेल ना पेंडी येतसे हाता ।
अहा कष्ट कष्ट पावतां । कोणी नुमजे ॥ २२ ॥
म्हणती आम्ही सदाचारी । नैष्ठिक आणि अग्निहोत्री ।
बुडतां मृगजळपूरीं । हें कांहीच नेणती ॥ २३ ॥
त्या त्या प्रसंगीं बोलिजेल । तेव्हां तुजसे कळेल ।
संशय अवघा मावळेल । अंतरींचा ॥ २४ ॥
सद्रूप जैसें परिपूर्ण । निजांगें ज्ञाता आपण ।
साधका असे ध्येय ध्यान । आचाररूपें ॥ २५ ॥
सिद्धाचें जें लक्षण । बोलतां न ये साधकेंवीण ।
साधकासी लागे करणें ज्ञानियां सहज ॥ २६ ॥
ऐसेंचि पुढेंही समजावें । सिद्ध तें साधकत्वें कळावें ।
येर्हवी तेथें काय बोलावें । अनिर्वाच्यासी ॥ २७ ॥
साधकत्व आणि साधन । सांडून साध्यचि परिपूर्ण ।
विचारें अंगेंचि होणें । सदाचार या नांवें ॥ २८ ॥
याचि हेतू विशेषणें । दिधलीं तीं विशद करणें ।
तेंचि निरूपण आदरानें । श्रवण कीजे ॥ २९ ॥
ऋगादि हे वेद चारी । त्यांतील सारांश बहुधापरी ।
असे उपनिषद्भागमात्रीं । ऐतरेयादिकीं ॥ १३० ॥
त्यांतील महावाक्यरत्नें । काढिलीं असती गाळून ।
त्यांचा अर्थ तो परिपूर्ण । जो प्रत्यगात्मा ब्रह्म ॥ ३१ ॥
ब्रह्मचि आत्मा निश्चय । इतुकाचि वेदांतविषय ।

आणि जितुका संवाद होय । तें उपकरण याचें ॥ ३२ ॥
असो ऐसा वेदांतसार । तेणेंशीं युक्त सदाचार ।
अर्थरत्नांचा शब्दें हार । गुंफिला असे ॥ ३३ ॥
वेदांतसिद्धांत हा एक । आत्मा ब्रह्म निश्चयात्मक ।
तयाचेंच ग्रथनकौतुक । सदाचारीं ॥ ३४ ॥
पदीं बोलिलें शिवरूप । म्हणजे कल्याण ज्याचें निजरूप ।
मायाजगताचा आरोप । जेथें नाहीं ॥ ३५ ॥
क्रियादिकांचा नलगे मळ । अहंकृतीचा हौय विटाळ ।
या हेतू बोलिजे निर्मळ । सदाचार हें ॥ ३६ ॥
ऐशिया सदाचारांत । बोलिजेतें निभ्रांत ।
कोण अधिकारी श्रवणातें । निरोपिजे तो ॥ ३७ ॥
वेदांतसिद्ध ज्ञानाची । सिद्धि व्हावी योगियाची ।
त्या योगियाचे लक्षणाची । ओळखी ऐका ॥ ३८ ॥
योगी शब्दें नव्हे ज्ञानी । जो कां पूर्णसमाधानी ।
जरी योजावा अधिकारालागुनी । तरी विरोध ॥ ३९ ॥
ज्ञानसिद्धि व्हावया म्हणतां । अधिकारी नव्हे कीं ज्ञाता ।
हठयोगी कल्पूं आतां । तरी अवधारा ॥ १४० ॥
कोंडून बैसला वारा । केव्हां प्रवर्तावें विचारा ।
त्यासी शून्यामाजी थारा । अधिकारा पात्र नव्हे ॥ ४१ ॥
मुद्रा आसनें करिती । लोली धोती आणि पोती ।
ते देहमळाचे सांगाती । अधिकार कईचा त्यां ॥ ४२ ॥
मंत्र यंत्र जपी तपी । नानासाधनी प्रतापी ।
तीर्थवासी खटाटोपी । अधिकारी नव्हे ॥ ४३ ॥
अविवेकें नागवे झाले । नखें केश वाढविले ।
खाती वृक्षाचे पाले । न होती पात्र ते ॥ ४४ ॥
पात्र नव्हे वेदाध्ययनी । अथवा नव्हे व्याकरणी ।
न्यायाची करी वेवादणी । कुतर्कें तोही नव्हे ॥ ४५ ॥
नानाशास्त्रें अधीत । जयचि इच्छी गर्वित ।
त्यासी कैंचें आत्महित । श्रवणमननें ॥ ४६ ॥
उपासक नव्हे अधिकारी । त्या मायिकाची भीड भारी ।
कर्मी तो नव्हेचि निर्धारीं । फलाभिलाषी ॥ ४७ ॥
काम्य निषिद्ध त्यागिलें । नित्य नैमित्तिक अनुष्ठिलें ।
तेही अधिकारा पात्र झाले ऐसें न घडे ॥ ४८ ॥
तया क्रियेचा अभिमान । न पडावें कांहीं न्यून ।
त्यासी न घडे श्रवणमनन । यथासांग ॥ ४९ ॥
अंतर क्रियेकडे लागलें । वरिवरी श्रवणें काय झालें ।
असो हे अवघे गुंतले । मायिकासी ॥ १५० ॥
आतां कोणता अधिकारी । बोलिजेतो अवधारीं ।
निश्चयेंशीं श्रवण करीं । देवदत्ता ॥ ५१ ॥

जो प्रपंचीं पोळला । त्रिविध तापें तापला ।
अनुतापें अवघा त्याग केला । तोचि अधिकारी ॥ ५२ ॥
सर्वही मिथ्या कळलें । सत्य तें असे एकलें ।
ऐसें जेणें निवडिलें । तोचि अधिकारी ॥ ५३ ॥
द्रव्य दारा देखतां नयनीं । वमनासमान जो मानी ।
पदार्थमात्र न इच्छी मनीं । तोचि अधिकारी ॥ ५४ ॥
मनाचा थार मोडिला । तृष्णेचा घातचि केला ।
स्वप्नजागृति विसरला । तोचि अधिकारी ॥ ५५ ॥
विषयजातातें त्यागिलें । इंद्रियांचें मडगें मोडिलें ।
विवेकें तया दमविलें । तोचि अधिकारी ॥ ५६ ॥
कष्टें शिणतां निजे प्राणी । तैसा सर्व कर्म उपमर्दूनी ।
सुखी झाला स्वात्मशयनीं । तोचि अधिकारी ॥ ५७ ॥
प्रारब्धें सुखदुःख भोगितां । अथवा पूजितां कीं गांजितां ।
निरभिमानें सोसी तत्वता । तोचि अधिकारी ॥ ५८ ॥
गुरुपदीं आवडी कैशी । वियोगे घडी कल्पाऐशी ।
काया अर्पिली सेवेसी । तोचि अधिकारी ॥ ५९ ॥
वेदांतश्रवणीं आवडी । स्वानुभवें तर्क काढी ।
अर्थी मनें मारिली बुडी । तोचि अधिकारी ॥ ६० ॥
देहाचें सुखदुःख विसरे । मनाची धांव सर्वही पुरे ।
विश्रांती पावला निर्धारें । तोचि अधिकारी ॥ ६१ ॥
हा भवपाश कधीं तुटेल । मोक्ष केव्हां मज होईल ।
अत्यंत साधन फळेल । म्हणे तोचि अधिकारी ॥ ६२ ॥
श्रवण मनन न सांडी । गुरुपदीं मारिली बुडी ।
संशया करी देशोधडी । तोचि अधिकारी ॥ ६३ ॥
बळेंचि ज्ञान आकळी । अज्ञाना कांप सुटे चळीं ।
देहबुद्धीदी खांदली मुळी । तोचि अधिकारी ॥ ६४ ॥
देहावीण जितुकें जग । तो श्रीगुरूचि निःसंग ।
नामरूपाचा सांडिला संग । तोचि अधिकारी ॥ ६५ ॥
माया अविद्या जीव शिव । या अवघ्यांचें मोडोनि नांव ।
एकलाचि उरे गुरुदेव । तोचि अधिकारी ॥ ६६ ॥
सर्व दृश्यातें ग्रासिलें । भासातें वेगळें काढिलें ।
शून्यासही ओलांडिलें ।तोचि अधिकारी ॥ ६७ ॥
श्रीगुरूचिया निजकृपें । भवसिंधु मारिला थापें ।
काळही जयासी कांपे । तोचि अधिकारी ॥ ६८ ॥
परोक्षें सर्वही कळलें । सच्चिदानंद ओळखिलें ।
ऐक्यविचारा प्रवर्तले । तोचि योगी अधिकारी ॥ ६९ ॥
असो ऐसा जया अधिकार । त्या सुगम येथींचा विचार ।
तत्क्षणीं पावे परपार । सद्गुरुप्रसादें ॥ १७० ॥
ऐसीं अधिकारचिन्हें ऐकतां । दचक बैसली देवदत्ता ।

विचारें पाहे मागुता । पूर्व केलें तें ॥ ७१ ॥
ऐसें देखोनि कृपापाणीं । थापटून बोलती सुवचनीं ।
आता भीति सांडीं ये क्षणीं । अधिकार तुज असे ॥ ७२ ॥
सद्गुरुपदीं अनन्यता । आतां तुज कायसी चिंता ।
संशय सांडीं गा परता । अवधान देईं ॥ ७३ ॥
तुज अधिकार असे म्हणतां । आनंद दाटला देवदत्ता ।
अहो माझिया सुकृता । जोडा नाहीं ॥ ७४ ॥
येर्‍हवी पाहतां मजला । काय अधिकार प्राप्त झाला ।
परी सद्गुरूनें दिधला । आपला भाग ॥ ७५ ॥
आतां मज तें काय भय । सद्गुरूनें दिधलें अभय ।
आतां कासया संशय । तरणोपायाचा ॥ ७६ ॥
जेव्हां माथां ठेविला कर । तेव्हांचि झालों असें अमर ।
आतांचि हा भवसागर । करीन कोरडा ॥ ७७ ॥
आतां बळ चढलें अपार । करीन अवघ्यांचा संहार ।
आवेशें रगडून अधर । कर चुरून बोले ॥ ७८ ॥
कामाएं जीवें मरूं । कीं क्रोधाचा घात करूं ।
आसडून पाडूं मत्सरू । मोहा हाणूं लाता ॥ ७९ ॥
लोभाचें मूळ उपडूं । कीं शोकातें चिरडूं ।
कीं भयाचें निःशेष मोडूं । असतेपण ॥ १८० ॥
अहंतेची करूं हानी । कीं ममता पाडूं उताणी ।
कीं प्रयत्नाची घाणी । करूं आतां ॥ ८१ ॥
इच्छेचा मोडूं मडगा । कीं आशेचा करूं गळगा ।
वासनेसी करवूं शिमगा । लावूं देशोधडी ॥ ८२ ॥
तृष्णेचें करूं निःसंतान । पाताळीं घालूं अभिमान ।
कीं असूयेचें रक्तपान । करूं मुखें ॥ ८३ ॥
इंद्रियांचे पाडूं दांत । कीं प्राणांचें वळूं सूत ।
मनातें बांधूं त्यांत । सहितबुद्धि ॥ ८४ ॥
हें असो संचितातें । बिंदुलें घालूं हातें ।
क्रियमाण मारूं लातें । सहप्रारब्ध ॥ ८५ ॥
गुरूनें थापटितां पाठी । बळ चढलें शतकोटी ।
आवेशें उडोनि जगजेठी । पिटी भुजा ॥ ८६ ॥
आतां उपडून काढूं मेरू । कीं आकाशा देऊंधीरू ।
कीं उडवूं सप्त सागरू । हस्तचपेटें ॥ ८७ ॥
उपडूं सप्तही पाताळ । त्यां दाखवूं सूर्यमंडळ ।
कीं सूर्यासी भूमीचा तळ । दाखवूं आतां ॥ ८८ ॥
नक्षत्रें करूं गोळा । वायूची करूं माळा ।
कीं भूमीचिया चडळा । कालवूं आपीं ॥ ८९ ॥
कीं हीं चवदा भुवनें । वैकुंठकैलासादि स्थानें ।
एकत्र करूं आसनें । देवादैत्यांचीं ॥ १९० ॥

विष्णु शिव दोन्ही धरूं। हृदयामाजी सगळे भरूं।
कीं काखेंमाजी आवरूं। ब्रह्मदेवा ॥ ९१ ॥
निजानंदक्षीरसागरी। मोक्षसंजीवनीगिरी।
आणूं क्षणार्धामाझारी। मारुतीऐसा ॥ ९२ ॥
अहंकाररावणें शक्ती। मारिली प्रेमलक्ष्मणाप्रती।
तो उठवून गुरु रघुपती। भेटवूं आतां ॥ ९३ ॥
भाव भरत अंतरला। दुरीच्या दुरी राहिला।
आतां निवटूनि राक्षसांला। अनुभूतिसीता आणूं ॥ ९४ ॥
निजसुखविमानारूढ। गुरु रामा करवूं दृढ।
पुरवूं भरताचें कोड। कौसल्यासुमतीसह ॥ ९५ ॥
ऐसा मुखें बडबडी। हर्षें नाचे मारी उडी।
हें देखोनि लवडसवडी। सद्‌गुरुनाथ ॥ ९६ ॥
म्हणती यासी ज्ञान नसतां। हर्ष दाटला अवचिता।
आतां आम्ही उपेक्षितां। बहकेल उन्मत्तपणें ॥ ९७ ॥
ऐसा सच्छिष्य आम्हांसी। कैसा मिळेल पुण्यराशी।
जयातें देखतां नेत्रांसी। भरतें दाटे ॥ ९८ ॥
आतां याचा हर्षपूर। उतरिला पाहिजे निर्धार।
म्हणूम पसरूनियां कर। हृदयीं धरिला ॥ ९९ ॥
म्हणती सवध देवदत्ता। मायेनें ग्रासिलें तुज आतां।
हें आधीं पाहें पुरता। अंतरीं विचारें ॥ २०० ॥
ऐसें ऐकतांचि उत्तर। जिरला आनंदाचा पूर।
मग भयें कांपे थरथर। सोडवीं सोडवीं म्हणे ॥ १ ॥
राज्यपदीं एकाएकीं। बैसतांचि हर्ष रंकीं।
वायु भोंक पाडूं मस्तकी। पाहे तेव्हां ॥ २ ॥
तेहें महाभय होतां। तरीच प्राणीं वांचे तत्त्वतां।
तैसेंचि घडलें देवदत्ता। महापूर ओहटे ॥ ३ ॥
मग सन्मुख वैसविलें। निरूपणातें आरंभिलें।
आतां सावधान वहिलें। हर्ष-भय टाकीं ॥ ४ ॥
श्रीगुरु विचारिती मनीं। हा अधिकारियांमाजी शिरोमणी।
उपदेशितां एके वचनीं। सर्व संशय ग्रासील ॥ ५ ॥
परी तेंचि आतां उपदेशितां। धणी न पुरे आमेचे चित्ता।
हळूहळू ब्रह्मसुख देतां। उभयपक्षीं बरें ॥ ६ ॥
ऐशिया हेतू गुरुराय। सांगती सदाचरणसोय।
म्हणती सखया सावध होय। श्रवण करीं गा ॥ ७ ॥
येथेऊन बोलिजे सदाचार। तेरा श्लोकीं निर्धार।
शब्द थोडे अर्थ फार। ज्ञात्यांचीं लक्षणें ॥ ८ ॥
तुवां मागें पुशिलेंहोतें। क्रियेचें कारण कोणतेण्।
तेंचि स्पष्ट करूं मागुतें। क्रियारूप हेंनव्हे ॥ ९ ॥
प्रातःस्मरण शौच स्नान। अघमर्षण संध्या जप तर्पण।

अग्निहोत्र अर्चन मौन । ध्यान भोजन बारावें ॥ २१० ॥
नांवे मात्र भिन्न भिन्न । एकरूप असती संपूर्ण ।
विचाररूपें निदिध्यासन । कीं समाधान ज्ञात्यांचें ॥ ११ ॥
पूर्वीं जेव्हां वेदविभाग । करून केले दोन भाग ।
दोघां अधिकारियां मग । उपदेशिले ॥ १२ ॥
अंतःकरणशुद्धि जयाची । होऊन इच्छा व्हावी ज्ञानाची ।
त्यासी क्रियारूप कर्माची । खटाटोपी ॥ १३ ॥
प्रजापति आदिकरूनिई । प्रवर्तती तये आचरणीं ।
मार्ग चालिला तेथूनी । स्वस्वकर्माचा ॥ १४ ॥
जया जाणणें मात्र उरलें । विचारज्ञाना पात्र झाले ।
उपदेशमात्र पावले । समाधान सनकादि ॥ १५ ॥
सर्वांच्या पूर्वींच उत्पन्न । तेव्हांपासून पंचवर्षी वय पूर्ण ।
एवं कल्प जातांही अधिकन्यून । वय तोंनव्हे ॥ १६ ॥
व्रतबंधचि नाहीं मुळीं । कैसे पडती कर्मसांकळीं ।
सदा ब्रह्मानंदकल्लोळीं । विचरती महीं ॥ १७ ॥
हेही परंपरा चालिली । शुकादिकीं आकळिली ।
तयांचे आचरणाची किल्ली । सांगूं तुज ॥ १८ ॥
अधिकारभेदें ब्राह्मण । दोन दोघांचीं लक्षणे ।
वेगळाली क्रिया पूर्ण । त्याची याची ॥ १९ ॥
त्याचे स्मरण प्रातःकाळीं । हा तो असे स्मरणा मुळीं ।
ते काढिती देहाची मळी । हा तरी अवधूत ॥ २२० ॥
हेंही त्या त्या प्रसंगीं । बोलिजेल तुजलागीं ।
परी समजें क्रिया वाउगी । ज्ञात्याचे ठायीं ॥ २१ ॥
आतां अनुक्रमें ऐकावें । स्नानसंध्यादि बरवें ।
प्रातःस्मरण समजावें । तिन्ही स्लोकीं आधीं ॥ २२ ॥
श्रोते ऐका सावधान । आचार्य ओळला कृपाघन ।
तुम्हींही चातक होणें । पांतेकरी देवदत्ता ॥ २३ ॥
उपनिषद्रूप धेनूचे । आचार्य दोहिते अर्थदुग्धाचे ।
देवदत्त वत्स तेथिंचे । कल्पिले पाना ॥ २४ ॥
धेनू पान्हावे वत्सासाठीं । परी सर्वांची होतसे पुष्टी ।
म्हणून तुम्हीं उठाउठीं । अर्थपान करा ॥ २५ ॥
प्रस्तुत वेदांची जननी । ब्राह्मणांची कुळस्वामिणी ।
या श्लोकाचे व्याख्यानीं । त्रिपदा असे ॥ २६ ॥
देवदत्ता ऐसें म्हणसी । गायत्री जप ब्राह्मणांसी ।
ते हें आणिले स्मरणासी । याचें प्रयोजन ऐकें ॥ २७ ॥
उत्पन्न होतां हें जग । अज्ञानींच याची वाग ।
नाहीं ज्ञानाचा योग । किंचिन्मात्र ॥ २८ ॥
मग सर्वेश्वरें पाहूनी । प्रेरिली अपौरुषी वाणी ।
ते हे गायत्री प्रणवरूपिणी । विस्तारिली ॥ २९ ॥

सर्वेश्वराचे अंतरींचा। हेतू अवधारीं साचा।
अर्थ जाणून गायत्रीचा। ज्ञानसंपन्न व्हावें॥ २३०॥
सनकादि वेगळे करून। जीव भ्रष्ट केले कामनेनें।
विचारें आम्हां काय कारण। भोग पाहिजे म्हणती॥ ३१॥
सृष्टिकर्त्यासी संकट तेव्हां। कैसें करावें या जीवां।
भोग निवर्तवून ज्ञानदिवा। लावी कवण॥ ३२॥
मग वसिष्ठादिकीं जीवांच्या कणवें। गायत्रीचें अनुष्ठान बरवें।
स्वयें करून लावावें। जनां मार्गीं॥ ३३॥
अर्थेवीण ज्ञान कैचें। हृदयशुद्धिद्वारा पात्र त्यचें।
होती म्हणून गायत्रीचें। प्रेरण कर्मीं॥ ३४॥
तुज अधिकारी दोन। पूर्वीं सांगितले ब्राह्मण।
अज्ञानासी अनुष्ठान। वचार तो ज्ञानिया॥ ३५॥
त्या ब्राह्मणा त्रिकाळीं जप। यासी नको क्रियारूप।
अर्थविचारेंचि अमूप। समाधान पावले॥ ३६॥
तस्मात् विचारवंत नर। प्रातःस्मरणीच त्या अधिकार।
यास्तव स्मरणरूप विचार। ऐकें गायत्रीचा॥ ३७॥
त्रिपदेचा करून श्लोक। पदें घातलीं सकळिक।
दोन्ही असती अधिक। अन्वयें कळती॥ ३८॥

प्रातः स्मरामि देवस्य सवितुर्भर्ग आत्मनः।
वरेण्यं तद्धि यो यो नः चिदानंदे प्रचोदयात्॥ ३॥

परमात्मा आमुच्या बुद्धी। प्रेरीरसे चिदानंदीं।
तोचि आत्मा निरवधी। प्रभातीं स्मरों॥ ३९॥
स्वप्रकाशक देव। उत्पत्तिकर्त्या सविता नांव।
सर्वदहनचि स्वभाव। भ्र्ग वरिष्ठ तोचि॥ २४०॥
आतां हेंचि एकेक पद। स्पष्ट कीजेल विशद।
अर्थ जाणतां होय निर्द्वंद्व। श्रवणात्रें॥ ४१॥
प्रातःकालीं स्मरावें। त्या प्रातःस्मरण म्हणावें।
परी आधीं समजावें। प्रभातासी॥ ४२॥
अज्ञानतमाचा अंत। ज्ञासूर्य प्रभा करीत।
यासी बोलिजे प्रभात। दोन्हीकडे सारिखा॥ ४३॥
परी ज्ञासूर्या अस्तोदय। ऐसें सर्वथा बोलूं नये।
जैसा जयांचा अनुभव होय। तैसेंकल्पिती॥ ४४॥
जनां दृष्टी सूर्य न पडतां। म्हणती सूर्य गेला अस्ता।
तोचि पुन्हां नेत्रें पाहतां। कल्पिती उदय॥ ४५॥
तैसा आत्मा न कळे जनां। त्यासी अज्ञान केली कल्पना।
परी सर्वदा जो देकणा। त्या अज्ञान केवीं॥ ४६॥
तोचि आत्मा ज्ञानियांसी। प्रगट कळतां अनुभवासी।

दिसत कल्पना ऐशी । या हेतू केली ॥ ४७ ॥
रात्रचि न देखे सूर्य । तैसाचिही नेणे उदय ।
आत्मा अज्ञानचि न होय । ज्ञान तरी कैसें ॥ ४८ ॥
आत्मत्वीं नसतां ज्ञानाज्ञान । जीवासी दोहोंचा अभिमान ।
यास्तव नेणतां तम अज्ञान । जेचि रात्री ॥ ४९ ॥
अज्ञानरात्री नसे जेथें । ज्ञानदिवसचि असे तेहें ।
यास्तव मुख्य ज्ञाता समर्थ । त्या प्रभात नाहीं ॥ २५० ॥
तो काळाचा महाकाळ । अंगे ब्रह्मचि केवळ ।
तयासी कल्पितां काळ । अति दूषण कीं ॥ ५१ ॥
साधक विचारा प्रवर्तला । तयाचा हा प्रभात बोलिला ।
ज्ञानाचा अरुणोदय जाहला । विचाररूप ॥ ५२ ॥
हाचि ब्राह्ममुहूर्त बोलिजे । येथेंचि स्वमुखा लाहिजे ।
साधक विचारें उमजे । ब्रह्मत्व आपुलें ॥ ५३ ॥
असो ऐसाही प्रभातकाळ । इतरांऐसा नव्हे केवळ ।
तयासी बोलिजे विषमकाळ । हा सुकाळ सर्वदा ॥ ५४ ॥
तो असे घटिका दोन । हा सर्वदा असे परिपूर्ण ।
मध्यसंधींशीं गहन । ज्ञानाज्ञानाच्या ॥ ५५ ॥
असो ऐसा प्रभात बोलिला । पुढें निरूपणीं मन घाला ।
आधीं पदार्थ पाहिजे कळला । स्मरण कैसें तें मग ॥ ५६ ॥
आमुच्या बुद्धी जो प्रेरिता । तोचि आत्मा असंग तत्वतां ।
व्यापोनियां तीन्ही अवस्था । निर्विकारी ॥ ५७ ॥
आकाश जैसें घटांतरीं । तैसा कूटस्थ निर्विकारी ।
आकाश न लिंपे पदार्थमात्रीं । आत्मा वृत्तीशीं अलिप्त ॥ ५८ ॥
बुद्धीचा उद्भव हौनी । क्रीडत असे अनुदिनीं ।
जाग्रदादि अवस्था तीन्हीं । बुद्धिवृत्तीच्या ॥ ५९ ॥
जागृति स्वप्न हे दोन्ही । बुद्धीचे व्यापार प्रगट जनीं ।
सुषुप्ति नव्हे म्हणसी मनीं । तरी ऐकावें ॥ २६० ॥
जाग्रत्स्वप्नबुद्धीचा । प्रभाव असे क्रीडेचा ।
ठाव जाणावा विश्रांतीचा । सुषुप्तिकाळ ॥ ६१ ॥
लीन तरी बुद्धी झाली । अवस्था तिशींच लागली ।
तीन्ही वृत्तीं बुद्धि एकली । ज्ञाते बोलती ॥ ६२ ॥
असो तिहेंचाही साक्षी । उदासपणें अवस्था लक्षी ।
असंगत्व आपलें रक्षी । जैसें तैसें ॥ ६३ ॥
प्रेरणा हाचि विकार । म्हणसी कैसा निर्विकार ।
येथें दृष्टांत असे साचार । लोहचुंबकाचा ॥ ६४ ॥
लोह अचेतन जड । स्वतां चळणें अवघड ।
चुंबसन्निधीं वाड । भ्रमण पावे ॥ ६५ ॥
स्वतां चुंबक नव्हे चळण । आणि न घडे चाळकपण ।
परी झालें जें भ्रमण । हा आळ कोणासी ॥ ६६ ॥

बुद्धीसी स्वाअं चळण कुडें । कर्में चाळक म्हणतां तीं जडें ।
माया तरी दोहींची पडे । एकरूपता ॥ ६७ ॥
अविद्या मुळींच कांहीं नेणे । गुण तरी बुद्धीचीं लक्षणें ।
जीव ईश चाळकहोणें । तरी अवधारीं ॥ ६८ ॥
चेतनत्वें दोन्ही समान । परी चळणाकडे आले जाण ।
यांची ही प्रेरणा करी कोण । हेंचि न कळे ॥ ६९ ॥
आत्मत्वीं नसे विकारवार्ता । स्वयें चेष्टेना चेतविता ।
चंचळ स्वभावें न चळे स्वतां । आणि चळण तरी झालें ॥ २७० ॥
आता चाळकाचा संकल्प । कोठें करावा आरोप ।
यास्तवप्रेरक आत्मस्वरूप । उपाधियोगें बोलिलें ॥ ७१ ॥
बुद्धी चळती ऐशी वाटली । यास्तव श्रुतीनें कल्पना केली ।
साधकाची आशंका फेडिली । कीं आत्मा चाळक ॥ ७२ ॥
चळण मुळींच नाहीं झालें । ऐसें जे ज्ञाते समजले ।
त्यांसी प्रेरकत्वही नाथिलें । श्तुरीच प्रतिपादी ॥ ७३ ॥
असो हा प्रस्ताव येथ । प्रसंगाऐसा क्रमणें पंथ ।
बुद्धीचा चाळक समर्थ । परमात्माचि ॥ ७४ ॥
परी बुद्धीऐसा चेष्टेना । अथवा विकारें हालवेना ।
या हेतू असंग जाणा । प्रेरक बुद्धीचा ॥ ७५ ॥
बुद्धि एक उपलक्षण । परी मनाअदि इंद्रियप्राण ।
या सप्तदशांचें चळण । आत्मसत्तें होतसे ॥ ७६ ॥
ज्याच्या योगें मनासी । मननकल्पना झाली ऐशी ।
परी न जाणे अधिष्ठानासी । आपुल्या मन ॥ ७७ ॥
प्राण ज्याच्या सत्तें वावरती । त्या विकार करूं न शकती ।
ज्याच्या सत्तें चक्षु पाहती । न देखती तया ॥ ७८ ॥
श्रोत्रादि ज्ञानेंद्रियें सारीं । व्यापारती स्वरूपसागरीं ।
परी आत्मया कुसरी । नेणती कोणी ॥ ७९ ॥
वाचाआदि कर्मेंद्रियें । ज्याच्या सत्तें पावती उदय ।
तयातें हा समुदाय । उद्भव करीना ॥ २८० ॥
ऐसा व्यवहार सूक्ष्माचा । जीवासहित होय साचा ।
उद्भव आणि स्थिती लयाचा । अधिष्ठानत्वें साक्षी ॥ ८१ ॥
ऐसा सर्व लिण्गांचा समुदाय । हिरण्यगर्भ जया नांव ।
ईशासहित लय-उद्भव । । जया अधिष्ठानीं ॥ ८२ ॥
ज्या ठायीं हा उद्भव झाला । तेथेंच असे वर्तणें याला ।
अधिष्ठानींच लय पावला । नाहीं म्हणसी ॥ ८३ ॥
शक्ति विषयाकार होती । परी अधिष्ठानींच समाप्ती ।
ऐसे हें अज्ञान नेणई । जाणती ज्ञाते ॥ ८४ ॥
याचि हेतू चिदानंद । हें अधिक घातलेंपद ।
उद्भव आणि उपमर्द । तयाचे ठायीं ॥ ८५ ॥
प्रेरणा हे चिदानंदीं । बुद्धीचि करी अनादि ।

ऐसिया गा संवादीं । मानवती ज्ञाते ॥ ८६ ॥
आनंदीं कैसा म्हणसी लय । तरी पाहें सुषुप्तीचा समय ।
वृत्तीचा अभाव होय । कवणे ठायीं ॥ ८७ ॥
येणें अर्थें चिदानंदाची । सार्थकता झाली पदाची ।
आतां पुढील निरूपणाची । सोय जाणावी ॥ ८८ ॥
ऐसा जो बुद्धिप्रेरक । तोचि आत्मा स्वप्रकाशक ।
भर्गादि लक्षणें एक । स्त्यावीण कवणा ॥ ८९ ॥
तत् तेंचि गा सद्रूप । मागां वर्णिलें त्याचें रूप ।
तिन्ही काळींनव्हे अल्प । अधिक उणें ॥ २९० ॥
हाचि ब्रह्मींचा निर्देश । श्रीकृष्ण सांगे अर्जुनास ।
असो देवशब्दें प्रकाश । सर्वांही करी ॥ ९१ ॥
जो जो व्यवहार जीवाचा होतो । आपुले स्वप्रकाशें जाणतो ।
सर्व लयाचा अंत पाहतो । स्वकीय ज्ञानें ॥ ९२ ॥
यासीच चिद्६रूप म्हणावें । मागें निरूपिलें बरवें ।
आतां सवित्याचें जाणावें । रूप कैसें ॥ ९३ ॥
ज्यापासून जग प्रसवे । आहे तों तेहेंच रहावें ।
आणि लय पावती सर्वे । तोचि सविता ॥ ९४ ॥
घट मातीपासून होतो । पृथ्वीवरीच वावरतो ।
पुन्हां लयही पावतो । मातीमाजी ॥ ९५ ॥
तैसा हा सर्व वृत्तांतू । उद्भवून लय पावतू ।
यास्तव सविता जगहेतू । लक्षण पूर्वीं बोलिलें ॥ ९६ ॥
सयाउपरी भर्गपद । तयाचा कैसा अनुवाद ।
स्वरूपाहून जितुका भेद । दहनचि करी ॥ ९७ ॥
माया अविद्या काम कर्म । जीव शिव जगद्भ्रम ।
अवघियांचें रूप नाम । भस्मचि करी ॥ ९८ ॥
जैसा अग्नि प्रज्वळ । भस्म करीतसे सकळ ।
सन्निधिमात्रें केवळ । अग्नीच होय ॥ ९९ ॥
तेणें रीतीं नामरूपाचा । उरोंचि नेदी ठाव त्याचा ।
अस्तिभातित्वें साचा । आपण उरे ॥ ३०० ॥
अग्नींत पदार्थ राहीना । जग तरी दिसे लोचना ।
करिशी ऐशी जरी कल्पना । तरी सावधान ॥ १ ॥
आत्मस्वरूपीं हें मुळीं नाहीं । भ्रांतीनें दिसे सर्व कांहीं ।
आत्मज्ञान होतांचि पाहीं । तेंही भस्म होय ॥ २ ॥
भ्रांति राख वरी पडली । तेणें दाहकता आच्छादिली ।
ज्ञानें अविद्या निमाली । मग नामरूप कैंचें ॥ ३ ॥
असो ज्या क्षणीं आत्मरूपाचें । परोक्षेंचि ज्ञान साचें ।
तेव्हांचि या नामरूआचे । कोळसे करी ॥ ४ ॥
मग अपरोक्षीं बोलणें काय । संकेत अवघा वायां जाय ।
आतां श्रेष्ठपदाचा अन्वय । बोलिजे अर्थ ॥ ५ ॥

चक्रवर्तीपासूनियां । ब्रह्म्यापावेतों सातिशया ।
आनंदा जाणावें वृत्तीचिया । शतशत गणती ॥ ६ ॥
राजाचें सुख अपार । फिकें होय गंधर्वांसमोर ।
देव आजानदेव पितर । तुच्छ ब्रह्मदेवापुढें ॥ ७ ॥
एक आवडे एक विटे । एक लोपे एक मेटे ।
ऐसें हें सुख गोमटें । परी खोटें सर्वही ॥ ८ ॥
सातिशय म्हणावें यासी । ब्रह्मानंदाच्या एकदेशीं ।
आणि क्षयवृद्धी सर्वांसी । वास्तव हें निकृष्ट ॥ ९ ॥
तैसा ब्रह्मानंद नव्हे । श्रेष्ठता जरी तेथेंचि आहे ।
निरतिशयानंद म्हणताहे । श्रुति तयासी ॥ ३१० ॥
त्याहून दुजा श्रेष्ठ नाहीं । अकृत्रिमानंद पाहीं ।
वरेण्य शब्द अन्या कांहीं । बोलिजेना ॥ ११ ॥
तें सुख जया होय प्राप्ती । ते तद्रूपची निश्चितीं ।
न्यूनाधिक नव्हे कल्पांतीं । आहे तैसें असे ॥ १२ ॥
असो वरेण्य तोचि अनंत । मागां बोलिला निश्चित ।
सर्वही पदांचा संकेत । आत्मया साजे ॥ १३ ॥
आत्मा अधिक घातलें पद । येणें सुचविला अभेत ।
इतुक्याही लक्षणीं विशद । परिपूर्ण आत्मा ॥ १४ ॥
ऐसीं हीं पदें सकळ । निर्देश ब्रह्मींचा केवळ ।
याचाचि पुन्हां प्रांजळ । अनुवाद कीजे ॥ १५ ॥
आत्मा बुद्धीचा प्रेरक । तत् ते व्याप्त सद्रूप एक ।
देव तोचि प्रकाशक । चिद्रूप जें कां ॥ १६ ॥
सविता हाचि जगहेतु । भर्ग शब्दें सर्वां जाळितु ।
आनंद सातिशयरहितु । वरेण्य ऐसा ॥ १७ ॥
तत् देव वरेण्य तीन्ही । जाणिजे हें स्वभावलक्षणीं ।
सविता भर्ग प्रेरकपणीं । आगंतुक लक्षण ॥ १८ ॥
दोन्ही लक्षणांकडून । जाणावें ब्रह्मचि परिपूर्ण ।
एवं गायत्रीचें निरूपण । ब्रह्मावबोधक ॥ १९ ॥
च्यात असों या पदाचा । स्मरतों पर्याय तयाचा ।
इतुकाचि हेतु याचा । जें प्रातः स्मरावें ॥ ३२० ॥
इतुक्याही ब्रह्मलक्षणाची । ओळख परोक्षत्वें साची ।
अपरोक्षालागीं स्मरणाची । अपेक्षा साधका ॥ २१ ॥
हें साधकाचें साधन । सिद्धाचें तों समाधान ।
या अर्थाचें निरूपण । पुढील श्लोकीं असे ॥ २२ ॥
महावाक्य गायत्री कैसी । अपेक्षा असे जरी ऐसी ।
अल्प संकेतें तयासी । बोलिजेतें ॥ २३ ॥
जीव शिव दोन्ही ऐक्य । तया म्हणावें महावाक्य ।
तोचि अर्थ निश्चयात्मक । येथें असे ॥ २४ ॥
तत्पदलक्ष्य परमात्मा । प्रेरक त्वंपदलक्ष्य आत्मा ।

जाणिजे एकचि महात्मा । आत्माचि ब्रह्म ॥ २५ ॥
वाच्यांशचि येथें नसतां । लक्षणेची कासया वार्ता ।
लक्ष्यांश ऐक्य तत्त्वतां । सहज सिद्ध ॥ २६ ॥
एवं महावाक्य त्रिपदा । न कल्पावें कांहीं भेदा ।
आत्माचि ब्रह्मसंवादा । उरी नाहीं ॥ २७ ॥
ऐसी गायत्री वेदमाता । आरंभी प्रगटली तत्त्वतां ।
अर्थविचारें पाहातां । अंगें ब्रह्मचि साधक ॥ २८ ॥
जपमातेंचि शूद्राचा । वर्ण पावे ब्राह्मणाचा ।
हा तों अनुभव सर्वांचा । प्रगट असे ॥ २९ ॥
हा विचार जे करिती । अर्थ स्वानुभवें जाणती ।
ते कां ब्राह्मण न होई । ब्रह्मविद ॥ ३३० ॥
तस्मात् येथील ज्ञानविचार । जाणती तेचि धन्य नर ।
तेचि ब्राह्मण जे इतर । कृपण ऐसें बोलिजे ॥ ३१ ॥
बत इति खेदें टाकुनि श्वास । श्रुति पावली परम त्रास ।
काय करणें ह्मणे जीवांस । मिथ्या भोगास सोकले ॥ ३२ ॥
ब्रह्मामृताचे कल्लोळीं । मुखीं घातली दांतखिळी ।
कीं निधान असतां जवळी । धरिली अंधदशा ॥ ३३ ॥
कामधेनू अव्हेरिली । कामना रासभी पोशिली ।
अहो हे कैसी भ्रमली । नेणती ब्रह्मविद्या ॥ ३४ ॥
विचार करणें सांडिला । मौन जप आरंभिला ।
तया जपें अज्ञानाला । निवर्तन कैसें ॥ ३५ ॥
ज्ञानसूर्य उदयासी । कामादि राक्षस विघ्नें त्यासी ।
करिती यास्तव मानसीं । ज्ञान प्रगटेना ॥ ३६ ॥
म्हणून गायत्री ब्रह्मास्त्र । हेंचि मुख्य महाशस्त्र ।
येणें असुर हे समग्र । मरती अर्घ्यदानीं ॥ ३७ ॥
विचार हाचि अरुणोदय । तो अर्घ्यप्रदानाचा समय ।
तेव्हां स्थूळादि देहत्रय । समर्पणा योजावें ॥ ३८ ॥
मायेसहित असुरांचा । येणें घातचि तयांचा ।
मग सन्निध ज्ञानसूर्याचा । प्रकाश होय ॥ ३९ ॥
ज्या क्षणीं ज्ञानउदय । तत्क्षणीं अज्ञान जाय ।
साधक अंगेंचि होय । ब्रह्मरूप ॥ ३४० ॥
देहाभिमान तैसाचि ठेविती । सूर्याकडे जळ सोडिती ।
येणें म्हणती संहारती । राक्षस सर्व ॥ ४१ ॥
अंतरीं वैरियांसी थारा । बाह्य व्यर्थचि पसारा ।
तेथें अर्थज्ञानविचारा । कोण पुसे ॥ ४२ ॥
असो या अज्ञान जनांसी ।ब्रह्मा भीतसे उपदेशीं ।
आतां यांची सुटका कैसी । कोण जाणे ॥ ४३ ॥
धन्य धन्य तेचि नर । विचारें पावले परपास ।
जितुका करण्याचा प्रकार । तितुका तेणें केला ॥ ४४ ॥

तेणें न करून सर्व केलें। येणेंकरून भ्रष्टले।
सन्निध हातवटी चुकले। म्हणोनियां ॥ ४५ ॥
तस्मात् विचारवंत ब्राह्मण। येर अवघे हे कृपण।
ऐसें बाह्या उभारून। श्रुति बोलिली ॥ ४६ ॥
ज्ञानसूर्य नाहीं प्रगट। न फुटे विचार हे पाहांट।
अज्ञानरात्रीं खटपट। करिती तेंही बरें ॥ ४७ ॥
असो आतां स्मरण विचारा। बोलत असतां निर्धारा।
अन्वयव्यतिरेकद्वारा। आत्मज्ञान कैसें ॥ ४८ ॥
पुढील श्लोकीं हें बोलणें। प्रत्यक्ष आत्मा जाणणें।
आणि विचारें तया स्मरणें। सावधान ऐका ॥ ४९ ॥

अन्वय व्यतिरेकाभ्यां जाग्रत् स्वप्नसुषुप्तिषु।
यदेकं केवलं ज्ञानं तदेवाह परं बृहत् ॥ ४ ॥

अन्वयव्यतिरेकांकडून। अवस्थां तिहीं एकलें ज्ञान।
जे केवळ परब्रह्म पूर्ण। तेंचि मी ऐसें स्मरावें ॥ ३५० ॥
अवस्थेचें जाणिजे रूपक। तेथें कैसें ज्ञान एक।
अन्वय आणि व्यतिरेक। करितां कळे ॥ ५१ ॥
अंतःकरणवृत्ति इंद्रियद्वारा। प्रवर्ते विषयव्यापारा।
सुखदुःख घडे प्राणिमात्रां। या नांव जागृति ॥ ५२ ॥
बुद्धि जागृतिसंस्कारें। एकली नाचे विषयाकारें।
सुखदुःखें होती अपारें। हे स्वप्नावस्था ॥ ५३ ॥
बुद्धि निःशेष होतां लीन। विश्रांति हेंचि सुख पूर्ण।
दुःख तें कांहींनेणणें। यां नांव सुषुप्ति ॥ ५४ ॥
जागृतिकालीं ज्ञान स्फुरे। या अन्वय बोलिजे बारे।
स्वप्नामाजी जागृति सरे। हा व्यतिरेक ॥ ५५ ॥
ज्ञानाचें स्फुरण स्वप्नीं। जाणिजे अन्वयालागूनी।
सुषुप्तिकाळीं स्वप्नहानी। व्यतिरेक हाचि ॥ ५६ ॥
सुखमात्र होतसे भान। हेंचि अन्वयरूप ज्ञान।
आत्मत्वीं नसे अज्ञान। व्यतिरेक ऐसी ॥ ५७ ॥
एव अवस्थेचा उदय। दुसरीचा होय क्षय।
परी तिहीं कालीं अद्वय। ज्ञान तें एक ॥ ५८ ॥
तिहींमाजी जें आहे। तेंचि सत्य विचारें पाहें।
एककाळी एक नव्हे। तें तें मिथ्या ॥ ५९ ॥
जागृति सत्य म्हणावी। तरी स्वप्नामाजी असावी।
सुषुप्तीमाजी दोन्ही जावीं। हा स्वभाव मिथ्याचा ॥ ३६० ॥
क्षणक्षणां अवस्था नासती। उदय पावून हारपती।
परी आत्मा स्वयंज्योती। उदयअस्तु पावेना ॥ ६१ ॥
लाट बुडबुडे फेंस तिन्ही। त्यांत अन्वयें असे पाणी।

पाणियामाजी न दिसे नयनीं । तरंगादिक ॥ ६२ ॥
तैसें तिहींमाजी असे ज्ञान । आत्मत्वीं अवस्थेचें अभान ।
यास्तव अवस्था मिथ्या तीन । साचा तो आत्मा ॥ ६३ ॥
समाधीमाजी ध्येय मात्र । स्वानुभवें ज्ञात्यासी गोचर ।
तिन्ही अवस्थांचा केर । तेथ नसे ॥ ६४ ॥
ऐसे अन्यवय व्यतिरेक । करून जाणावें ज्ञान एक ।
अवस्थेमाजीही निष्कलंक । साक्षित्वें असे ॥ ६५ ॥
केवल शब्दें सुचविलें । कीं विकारामाजी असंग राहिलें ।
जैसें आकाश संचलें । जळीं स्थळीं ॥ ६६ ॥
शब्दस्पर्शादि विषयाकार । जालें वाट तत्तदाकार ।
परी तें ज्ञान निर्विकार । साक्षिमात्र असे ॥ ६७ ॥
दीप जैसा प्रकाशी । घरींचिया आणि चोरासी ।
परी त्या त्या कर्मासी । नेंए सहसा ॥ ६८ ॥
तैसे न्याय आणि अन्याय । जें जें देहीं कर्म होय ।
साक्षिमात्रें तेथें काय । पापपुण्य लिंपे ॥ ६९ ॥
ऐसें असून सर्वथा । कर्मे स्थापिती आत्मयामाथां ।
तें तें निर्फळ गा वृथा । आत्मत्वीं नलगे ॥ ३७० ॥
मेघगतीनें चंद्रासी । चंद्र धांबतो कल्पना ऐसी ।
या आरोपे काय तयासी । धांवनें खरें ॥ ७१ ॥
असो हा विकारासरिसा । आत्मा नव्हे विकाराऐसा ।
अभंग पूर्ण जैसा तैसा । केवळपणें । ७२ ॥
परब्रह्म जें सर्वांचा । अधिष्ठानरूप साचा ।
जेथें अंत मायेचा । जीवेशांसह ॥ ७३ ॥
त्यासीच बृहत् हा संकेत । केला असे निश्चित ।
जें कां ब्रह्म सदोदित । सच्चिदादि बोलिलें ॥ ७४ ॥
एवं हा साक्षी आत्मा । तो जाणिजे परमात्मा ।
परोक्षापरोक्ष नामा । भेद जाला ॥ ७५ ॥
हें मी हेंचि गा अपरोक्ष । तें ब्रह्म जालें परोक्ष ।
आत्मा ब्रह्म नव्हे हा पक्ष । अर्थात् सिद्ध झाला ॥ ७६ ॥
तरी आतां ऐसें करावें । हें तें दोन्ही शब्द टाकावे ।
एकरूपचि जाणावे । प्रत्यगात्मा ब्रह्म ॥ ७७ ॥
जैसा मी पूर्वी बाळपणीं । खेळत होतों अनुदिनीं ।
ते व्यक्ति आठवितां मनीं । दुजा झाला ॥ ७८ ॥
परी आतां तरुणकाळीं । व्यक्ति तरी स्पष्ट देखिली ।
इतुकेनें काय भेदावली । तनु पुरुषाची ॥ ७९ ॥
तैसी तो म्हणतां नव्हे भेद । तोचि हा आत्मा अभेद ।
येथें लक्षणेचा संवाद । तो पुढें बोलिला ॥ ३८० ॥
वुचारें प्रभातें स्मरावें । मागील निरूपणा चित्त द्यावें ।
तेंचि येथें अनुभवावें । स्मरण कैसें ॥ ८१ ॥

तिहीं अवस्थांचे ज्ञान । आणि परब्रह्म परिपूर्ण ।
तेंचि मी हें अनुसंधान । अखंड राखावें ॥ ८२ ॥
स्मरणासहित जागें व्हावें । स्मरण धरून झोंपीं जावें ।
यावत्प्राणही राखावें । अनुसंधान साधकें ॥ ८३ ॥
हेचि अवधि असे याची । विचारारुणोदयकाळाची ।
येथें अनुसंधानस्मरणाची । अखंडता ऐसी ॥ ८४ ॥
जागृतिबोजनादि व्यापार । होती जाती अपार ।
परी आत्मतत्त्वाचा विसर । पडोंचि नये ॥ ८५ ॥
ऐसा अभ्यास हा करितां । निःसंशय पावे अपरोक्षता ।
ज्ञानसूर्य प्रगट होतां । अंगेंचि ब्रह्म ॥ ८६ ॥
मग जयातें स्मरावें । तेंचि आपण स्वभावें ।
न करितांही असावें । स्मरणरूप ॥ ८७ ॥
विसरचि मुळीं असावा । तरीच स्मरणाचा प्रस्तावा ।
स्मरणविस्मरणाचा व्हावा । उदय जेथूनि ॥ ८८ ॥
तोचि ज्ञाता आपण । किमपि नसे द्वैतभान ।
हेंचि सिद्धाचें स्मरण । करणें तें साधकां ॥ ८९ ॥
साधकें कैसें स्मरावें । तें स्पष्ट बोलिले आघवें ।
ऐसेंचि अखंड राखावें । साधकीं स्मरण ॥ ३९० ॥
आतां पुढील श्लोकीं बोलिजे । अर्थीं अवधान दीजे ।
तेणें ज्ञात्याचें आकळिजे । समाधान कैसें तें ॥ ९१ ॥
हेंही जाणिजे स्मरणरूप । अंगें ब्रह्म चिद्रूप ।
येथें अनुमान न अल्प । साधकीं न करावें ॥ ९२ ॥

ज्ञानाज्ञानविलासोऽयं ज्ञानाज्ञाने च पश्यति ।
ज्ञानाज्ञाने परित्यज्य ज्ञानमेवावशिष्यते ॥ ५ ॥

हा विलास ज्ञानाज्ञानाचा । ज्ञानाज्ञानरूप दिसे साचा ।
वोहट होतांचि चोहींचा । ज्ञानमात्रचि उरे ॥ ९३ ॥
विलासशब्दें जें जें दिसे । आणी सूक्ष्मत्वें जें भासे ।
मा दोहींचेही मूळ असे । ज्ञानाज्ञान ॥ ९४ ॥
अहं ब्रह्म झाले स्फुरण । तेथें असती हे दोन ।
तितुक्या स्फुरणासी जाणोन । हें ज्ञान ओळकीं ॥ ९५ ॥
आपुले पूर्णत्वाचा विसर । हेंचि अज्ञान निर्धार ।
पुढें झालें जें साकार । विपरीत ज्ञान तें ॥ ९६ ॥
पूर्वीं रज्जु देखिली ज्ञानें । परी रज्जुतें रज्जु न म्हणे ।
त्यासी अज्ञान ओळखणें । विपरीत ज्ञानें सर्प झाला ॥ ९७ ॥
ऐसा जो अन्यथाभास । याचेंचि नाअंव विलास ।
दोनी कारणें असती यास । ज्ञानाज्ञानें ॥ ९९ ॥
त्याचि विसालामाझारी । ज्ञानाज्ञानाची सरोभरी ।

नामरूपें दिसती सारीं । ज्ञानाज्ञानरूप ॥ ४०० ॥
ज्ञानें पाहतो नमरूप । परी नेणे वास्तव रूप ।
जेंचि जाणिजे स्वरूप ।ज्ञानाज्ञानाचें ॥ १ ॥
अज्ञाचि जडत्वा आलें । ज्ञानचि अन्यथा भासलें ।
चकारें हेंचि सुचविलें । ज्ञानाज्ञान पाहे ॥ २ ॥
अज्ञान ते आवरणशक्ती । ज्ञानासी विक्षेप म्हणती ।
हेचि कारणें उभय होती । आणि वस्ती दोहींची ॥ ३ ॥
अथवा अज्ञानप्रकृती । ज्ञानपुरुष स्वयंज्योती ।
दोन्ही कारणें आणि वस्ती । विलासीं दोहींची ॥ ४ ॥
दोहींगेगळें तिसरें । न दिसे येथें साकारें ।
सणुसहित ब्रह्मांड बा रे । व्यापिलें दोहींनीं ॥ ५ ॥
ऐशिया भ्रमाचें निरसन । होय जरी आत्मज्ञान ।
रज्जु यथार्थ ओळखणें । येणें सर्पहानि जैसी ॥ ६ ॥
तैसीं नामरूपें मिथ्या असती । अस्तीभातीवरी दिसती ।
यथार्थ ओळखितां जाती । पुढें आत्माचि उरे ॥ ७ ॥
आत्मा जाणिला ज्या ज्ञानें तेंही मिथ्यात्वें त्यागणें ।
कांता काढून कांटियानें दोन्हीही त्यागिजे ॥ ८ ॥
जोंवरी अज्ञान आश्रय । तों काल ज्ञान पावे उदय ।
अज्ञान नासून आपण जाय । त्यासवें नासूनि ॥ ९ ॥
जैसें निवळीबीज जाण । पाणियाचा गाळ नासून ।
आपण नासे परी जीवन । उरे जैसें ॥ १० ॥
येणें रीती ज्ञानाज्ञान । दोहींतेंही त्यागून ।
उरे केवळ ज्ञानघन । निजांगें ब्रह्म ॥ ११ ॥
मग डोळां दृष्य दिसो । अथवा एकदांचि नासो ।
परी आत्म्यावीण अतिसो । दुजा नाहीं ॥ १२ ॥
ऐसा निश्चयचि झाला । संशय अवघाचि मेला ।
ज्ञानाज्ञानेंविण उरला । ज्ञप्तिमात्र आत्मा ॥ १३ ॥
ऐसा ज्ञाता समाधानीं । स्मरणविस्मरणाचा धणी ।
करणें न करणें दोन्ही । समाप्त झालीं ॥ १४ ॥
ऐसें करण्या न करयावीण । अखंड जयाचें स्मरण ।
हें सिद्धाचें समाधान । कळलें कीं तुज ॥ १५ ॥
मागील श्लोकीं विचारसाधन । या श्लोकीं हें समाधान ।
ऐसें हें प्रातःस्मरण । साधक सिद्धाचें ॥ १६ ॥
असो तिहीं श्लोकींचें निरूपण । या रीतीं झालें प्रातःस्मरण ।
हेंचि ज्ञात्याचें आचरण । इतरां कळे ॥ १७ ॥
उगेचि पहाटे उठई । मुखें कांहीं बडबडती ।
आम्ही नैष्ठिक म्हणविती । लोकाचारें ॥ १८ ॥
मन जाआं भलतीकडे । स्मरण तरे कैसें घडे ।
असो हें सर्व कुडें । ज्ञानेंविण ॥ १९ ॥

आतां बोलिजे शौचविधी । जो कां ज्ञात्याचा समधी ।
येथिंच्या अर्थासी आधीं । चित्त द्यावें ॥ ४२० ॥

अत्यंतमलिनो देहो देही चात्यंतनिर्मलः ।
असंगोऽहमिति ज्ञात्वा शौचमेतत्प्रचक्षते ॥ ६ ॥

देह तो मलिन अत्यंत । आत्मा निर्मल सदोदित ।
असंग ऐसा मी जाणत । शौच त्यातें बोलिजे ॥ २१ ॥
देह एक उपलक्षण । परी सर्वही तत्त्वें मलिन ।
जीं व्यापिलीं अविद्येनें । यांसी शुद्धता कैंची ॥ २२ ॥
स्थूल देह अस्थिमांसांचा । सूक्ष्मीं कामादि विकार साचा ।
कारणीं तो अज्ञानाचा । ठावचि असे ॥ २३ ॥
हें विटाळाचें घर । कीं अशुद्धीचें भांडार ।
केवळ जैसें मळमूत्र । अपवित्रपणें ॥ २४ ॥
यासी शुद्धि करूं म्हणतां । त्या लाज न वाटे चित्ता ।
मृत्तिका जीवनें धुतां । कष्टमात्र ॥ २५ ॥
जैसें गाढव धुतलें । पीतांबरें विष्टिलें ।
सोंवळें करून आणिलें । ब्राह्मणपंक्ती ॥ २६ ॥
परी त्या ब्राह्मण शिवती ना । तैसें देह सोंवळें होईना ।
हें ज्ञाते जाणती अज्ञाना । कळे काय ॥ २७ ॥
नानातीर्थीं हें भिजविलें । तप्तमुद्रेने लासिलें ।
जरी वरिवरी तासिलें । तरी शुद्ध नव्हे ॥ २८ ॥
असो हें बोलतां न सरे । वर्णिता ग्रंथ विस्ताते ।
थोडियाचि अनुकारें । समजावें ऐसें ॥ २९ ॥
ऐसिया देहामाजीच राहे । असंग निर्विकारेंच आहे ।
सर्वांतें साक्षित्वें पाहे । तोचि आत्मा निर्मळ ॥ ४३० ॥
जैसा घट बाटला । धुणें न लागे आकाशाला ।
तैसे देहसंबंधें आत्मयाला । प्रायश्चित्त नको ॥ ३१ ॥
आकाश हें नाहीं कोठें । परी त्या त्या पदार्थें न वाटे ।
तैसा आत्मा घन दाटे । पदार्थमात्रीं ॥ ३२ ॥
स्वर्गनरकीं व्यापला । परी न शिवे पापपुण्याला ।
आणि सुखदुःखादि द्वंद्वाला । न लिंपेचि ॥ ३३ ॥
आकाश जरी अतिसुद्ध । परी न्यूनपणें तें अशुद्ध ।
आत्मा सहज शुद्ध बुद्ध । नव्हे आकाशाऐसा ॥ ३४ ॥
नी व तो निःशेष वाळिला । ईश्वरमायेनें बाटविला ।
उपमितां स्वस्वरूपाला । साहित्य न बाटे ॥ ॥ ३५ ॥
असो ऐसा उपमेवीण । निर्मळ असंग पूर्ण ।
मुळीं शुद्धचि त्यासा कवण । शुद्धी करूं शके ॥ ३६ ॥
चकारें निश्चय केला । शुद्धता न येचि देहाला ।

आत्मा निर्मळचि संचला । त्या शुद्धता नलगे ॥ ३७ ॥
तरी शौच कैसा म्हणसी । अवधारीं गा मानसीं ।
मी असंग निश्चयेंसीं । अनुसंधानरूपें ॥ ३८ ॥
देहबुद्धीचें पाप गेलें । अखंड ब्रह्म स्फुरूं लागलें ।
सहज शुद्धता पावले । साधक निदिध्यासें ॥ ३९ ॥
यासी शौच बोलिजे । साधक विचारें उमजे ।
सिद्धत्वीं तों नाहीं दुजें । शुद्ध बुद्धचि तो ॥ ४४० ॥
ऐसें अज्ञान नेणती । देहातें शुद्ध करूं जाती ।
त्रिसप्तकें लावूनि माती । नासिती उदक ॥ ४१ ॥
असो या भ्रमिकासी । काज नसे निश्चयेंसीं ।
ज्ञात्याचे शौचविधीसीं । बोलिले अल्प ॥ ४२ ॥
शौचाउपरी स्नान । तयाचें कैसें लक्षण ।
या श्लोकीं हें निरूपण । बोलिजे ज्ञात्याचें ॥ ४३ ॥

मन्मनो मीनवन्नित्यं क्रीडत्यानंदवारिधौ ।
सुस्नातस्तेन पूतात्मा सम्यग्विज्ञानवारिणा ॥ ७ ॥

उत्तम ज्ञानजलें सुस्नात । तेणें होत्साता पूत ।
मन आनंदसमुद्राआंत । नित्य क्रीडत मीनापरी ॥ ४४ ॥
ज्ञानाज्ञान मावळूनि । उरे जें कां पूर्णपणीं ।
त्यासीच बोलती ज्ञानी । विज्ञान उत्तम ॥ ४५ ॥
तया विज्ञानजळें जाण । मनें करूनियां स्नान ।
स्नानशब्देंनव्हे भिन्न । पूर्णपणीं समरसे ॥ ४६ ॥
जेथें अनुभव वेगळा ।उमसूं नेदी एकहेळां ।
लवण जैसें मिळे जळा । ऐसें अभिन्न झालें ॥ ४७ ॥
तेणें पवित्रता कैसी । बोलतां न ये वाचेसीं ।
तिळोदक पापपुण्यासी । दिधलें जेणें ॥ ४८ ॥
निश्चयेंशीं होतां अभिन्न । निःशेष हरपलें द्वैतभान ।
तेंचि पुन्हां उमसून मन । द्वैतेंवीण क्रीडे ॥ ४९ ॥
आनंद मार्गें वर्णिला । हचि सागर संचला ।
सीमाचि नसे जयाला । ऐलपैल ॥ ४५० ॥
मनासी मीन कल्पिलें । यास्तव आनंदसिंधु बोलिलें ।
परी समानत्वें उपमिलें । न वचे कदा ॥ ५१ ॥
ऐसा जो आनंदसागर । नित्य परिपूर्ण अपार ।
त्यामाजी मन हें निरंतर । क्रीडें अनुदिनीं ॥ ५२ ॥
स्वप्न सुषुप्ति जागर । कांहींच नेणें अणुमात्र ।
जो जो देखे पदार्थमात्र । तें चिन्मात्र ब्रह्म ॥ ५३ ॥
जडचेतन हें टाकिलें । नामरूप विसर्जिलें ।
जें जें दृश्य देखिलें । तें तें ब्रह्म ॥ ५४ ॥

अंतरीं कांहीं आठवी । भासमात्रें दिसावी ।
तेथेंही देख गोंसावी । सच्चिदानंद ॥ ५५ ॥
कल्पना जेव्हां सांडी । विज्ञानजळीं मारी बुडी ॥
तेथें नामरूपाची सांकडी । मुळींच नाहीं ॥ ५६ ॥
आतां जागृतीं व्यापारो । अथवा स्वप्नीं वावरो ।
कीं निःशेष जाउनि मुरो । सुषुप्तीमाजी ॥ ५७ ॥
परी सच्चिदानंदावीण । नामरूप न देखे जाण ।
ऐसा निश्चय बाणला पूर्ण । निःसंशय ॥ ५८ ॥
समुद्रामध्यें मासोळी । नव्हे जैसी जळावेगळी ।
तैसें ब्रह्मानंदकल्लोळीं । क्रीडतें मन ॥ ५९ ॥
ऐसें हें स्नान ज्ञात्याचें । पूर्वरीतींच हें दोहींचें ।
करण तेंचि साधकाचें । सिद्धाचें सहज ॥ ४६० ॥
हें काय कळे अज्ञाना । प्रवर्तती जलाच्या स्नाना ।
त्रिकालही करितां जाणा । काय होतें ॥ ६१ ॥
त्यासी यासी महदंतर । ज्ञाती जाणती विचार ।
ज्ञात्याचा जो आचार । अक्रियरूप ॥ ६२ ॥
स्नानकाळीं अघमर्षण । तयाचें कैसें लक्षण ।
येणें श्लोकें निरूपण । ज्ञात्याचें ऐका ॥ ६३ ॥

अथाघमर्षणं कुर्यात् प्राणापाननिरोधतः ।
मनः पूर्णे समाधाय मग्नः कुंभो यथार्णवे ॥ ८ ॥

आतां प्राणापान निरोधून । घट जैसा सागरीं मग्न ।
तैसें पूर्णीं स्थापूनि मन । अघमर्षण कीजे ॥ ६४ ॥
पूरक कुंभक रेचकेंसी । बोलिजे प्राणायामासी ।
योगशास्त्रोक्त जरी म्हणसी । तरी अवधारीं ॥ ६५ ॥
अधोगमन अपानाचें । ऊर्ध्वगमन तें प्राणाचें ।
हेंचि मुख्य रूप त्याचें ओळखावें ॥ ६६ ॥
शक्तिबीज तो सकार । पुरुषबीज तो हकार ।
ऐसीं हीं दोन्ही अक्षरें । अधोर्ध्वगामी ॥ ६७ ॥
हे वायूमध्यें राहती । प्राणासवें येती जाती ।
यांचा ज्ञाते अर्थ जाणती । तो मी ऐसा ॥ ६८ ॥
सकारें नामरूप दिसे । हकारें स्वयेंचे नासे ।
अधऊर्ध्वगमन ऐसें । उद्‌भवलय ॥ ६९ ॥
दोन्ही अक्षरें एक कीजे ।अर्थरूप साक्षी जाणिजे ।
यासी प्राणायाम बोलिजे । निरोधरूपें ॥ ४७० ॥
नमरूप जें गोचर । सांडितां जडभाग साकार ।
हाचि जाणिजे प्रकार । रेचकाचा ॥ ७१ ॥
अस्तिभातिप्रियबुद्धि । जो हकाररूपें साची ।

हा पूरकाचा विधी । साक्षित्वें पाहें ॥ ७२ ॥
चंचल जाणिव दोहींचा । अधिष्ठानरूपें साचा ।
तेथें अंकुर मनाचा । निश्चळ करी ॥ ७३ ॥
हाचि कुंभक निश्चित । जेथें मनाचा अंत ।
त्रिविध प्राणायामांत । ऐसें ओळखावें ॥ ७४ ॥
या प्राणायामेंकरून । पूर्णत्वीं स्थापिलें मन ।
जें कदा नव्हे भिन्न । स्वरूपावेगळें ॥ ७५ ॥
वेगळें तों मुळीं नाहीं । रज्जूवरील जैसा अही ।
डगेंचि कल्पितां पाहीं दिसूं लागे ॥ ७६ ॥
ज्ञानें जाणूनियां स्वरूप । सांडावा मनाचा आरोप ।
पुढें सहज आपेंआप । अधिष्ठानी मुरे ॥ ७७ ॥
भिन्नपणा जैं मोडला । अंकुर तदाकार जाला ।
आत्मरूपीं समरसला । अभिन्नपणें ॥ ७८ ॥
घट जैसा सागरीं । बुडतां जळाअंतबारेही ।
तेणें रीतीं हें निर्धारीं । मन पूर्ण झालें ॥ ७९ ॥
ऐसें स्थापूनियां मन । मग कीजे अघमर्षण ।
जे हें नसे द्वैतभान । पूर्ण अद्वैतीं ॥ ४८० ॥
अघशब्दें पुण्यपाप । दोन्हीं निमालीं आपेंआप ।
हें मुख्य जाणिजे स्वरूप । अघमर्षणाचें ॥ ८१ ॥
पूर्वीं स्नानाची झाली रीती । तदंग अघमर्षण ज्या म्हणती ।
येथें बोलिलें निगुतीं । ज्ञानरूपचि ॥ ८२ ॥
ऐसें हें अघमर्षणयुक्त । जो साधक स्नान करीत ।
तो निजांगें ब्रह्म होत । अल्पचि काळें ॥ ८३ ॥
जो निजांगें ब्रह्म झाला । सिद्ध ऐसें म्हणावे त्याला ।
तेणें करण्या न करण्याला । उरी नाहीं ॥ ८४ ॥
ऐसें न जाणतां लोक । बलात्कारें धरिती नाक ।
जळामाजी अवश्यक । बुडविती देह ॥ ८५ ॥
एथें अघमर्षण कैचें । पापपुण्यचि वरी साचें ।
नांवमात्र स्नानाचें । परी तें नव्हे ॥ ८६ ॥
असो स्नान अघमर्षण । दोन्हींचे झालें निरूपण ।
आतां संध्याविधी जाण । या श्लोकीं बोलिजे ॥ ८७ ॥

लयविक्षेपयोः संधौ मनस्तत्र निरामिषम् ।
स संधिः साधितो येन स मुक्तो नात्र संशयः ॥ ९ ॥

लय विक्षेपसंधींआंत । मन तेथें विषयरहित ।
तो संधि साधितां मुक्त । येथें संशय नाहीं ॥ ॥ ८८ ॥
लय म्हणजे समाप्ती । विक्षेप म्हणजे उद्भवती ।
या संधीमाजी ज्ञप्ती । सामान्य प्रकाश ॥ ८९ ॥

मनादि उद्धवती जेव्हां । विशेषें दिसती तेव्हां ।
तेणें आच्छादन दिसावा । अनन्यभाव ॥ ४९० ॥
ऐसें एकाचें एक दिसतां । नाथिली आली बद्धता ।
यास्तव संधि हा साधितां । सामान्य साक्षी कळें ॥ ९१ ॥
मन होता पदार्थाकार । हा विशेषाचा प्रकार ।
सामान्य तो साक्षीमात्र । ज्ञाज्ञानाचा ॥ ९२ ॥
जागृतीस्वप्नांच्या अंतीं । सुषुप्ती न ये पुरती ।
या संधीमाजी ज्ञप्ती । सर्वजनांसी ॥ ९३ ॥
तो संधि जरी पाहणें । तरी जागृतीमाजी जाणणें ।
सर्वदा संधि ओळखणें । बोलिजे ऐसा ॥ ९४ ॥
एक कल्पना उठून गेली । दुजी नाही उद्‌भवली ।
येथें विचारें जो मन घाली । त्यासी कळे ॥ ९५ ॥
सत्वगुणाचा होता लय । तमाचा नव्हे उदय ।
त्या संधीमाजी काय । सामान्यावीण ॥ ९६ ॥
एक विषय सांडोनि दृष्टी । दुजियावरी नव्हे पैठी ।
त्या संधीमाजी गोमटी । ज्ञप्ती दाटे ॥ ९९ ॥
एवं मन गुण प्राण । इंद्रियविषय जाण ।
लयोद्‌भवामध्यें सामान्य । प्रगटे साधकां ॥ ५०० ॥
बहु बोलणें काय । सर्वेंद्रियसमुदाय ।
घेती आपुलाला विषय । एकदांचि ॥ १ ॥
तेव्हां मन होय उदास । भांबावून सांडी कल्पनेस ।
ते समयीं सामान्य प्रकाश । ओळखिला पाहिजे ॥ २ ॥
ज्यास्तव योगी शिणती । नेणतां शून्यामजी पडती ।
तो हा लाहिजे स्वयंज्योती । संधीमाजी विचारें ॥ ३ ॥
ऐसिया गा संधीमाजी । मनादिस्फुर्ति नाहीं दुजी ।
विषय सांडून सुखशेजीं । सुखावें मन ॥ ४ ॥
ऐसा संधि जेणें साधिका । विचारें अभिन्नता पावला ।
तोचि एक मुक्त झाला । येथें संशय नाहीं ॥ ५ ॥
नाम रूप भिन्न दिसे । तेहेंचि बद्धता असे ।
अभिन्नपणेंचि होतसे । सहज मुक्त ॥ ६ ॥
अभ्यासें संधि साधतां । प्रकाश दुणावे तत्त्वतां ।
मग लयौद्‌भवीं पाहतां । सामान्यचि ॥ ७ ॥
पाणी वेगळें जाणिलें । मग तरंगींही देखिलें ।
स्वानुभवें सामाव्य कळलें । मग देखे विशेषीं ॥ ८ ॥
जोंवरी उरे अनुभव । तोंवरी सधक ऐसें नांव ।
अभिन्न होतांचि स्वभाव तोचि सिद्ध ॥ ९ ॥
ऐसी हे संध्या पवित्र । जेथें भेद नसे अणुमात्र ।
त्या संध्येमाजी साचार । जपही पाहिजे ॥ ५१० ॥
या श्लोकीं साधन जप । वोलिजे तयाचें रूप ।

साधकीं येथें साक्षेप । मन घालावें ॥ ११ ॥

सर्वत्र प्राणिनां देहे जपो भवति सर्वदा ।
हंसः सोऽहमिति ज्ञात्वा सर्वबंधैः प्रमुच्यते ॥ १० ॥

सर्वत्र प्राणिउयांच्या देहीं । जप चाले सर्वदाही ।
सोहं हंस जाणून पाहीं । सर्वबंधें सोडिजेतो ॥ १२ ॥
प्राणायामाचे उद्योगें । हंसाक्षर बोलिजे मागें ।
प्राणसवेंचि जो वागे । तो मी तो मी ॥ १३ ॥
जितुका हा जंगम प्राणी । जेथें प्राणाची रिघणी ।
तेथें या जपाची मांडणी । अनायासें ॥ १४ ॥
यातें योगी अजपा म्हणती । षट्चक्रयोगें साधिती ।
दोन अक्षरें ध्याती । सर्वदाही ॥ १५ ॥
परी हा जप नको ज्ञानिया । असतां अजपा नाम वांया ।
येथीचा अर्थचि समजूनियां । विचारें पाहावा ॥ १६ ॥
यास्तव श्लोकीं जाणून । अर्थ कळतां विचारून ।
तत्काळचि भवबंधन । सोडून पळे ॥ १७ ॥
विचार कैसा हा येथींचा । अवधानें पहावा साचा ।
मागें अर्थ गायत्रीचा । विस्तार केला ॥ १८ ॥
ते हे गायत्री वेदमाय । त्रिपदा दशपदीं अन्वय ।
तोचि अर्थ येथें होय । दों अक्षरेंचि ॥ १९ ॥
ब्रह्मचि प्रत्यगात्मा निश्चय । हींचि जाणा अक्षरें द्वय ।
दशपदीही अर्थ काय यावीअ असे ॥ ५२० ॥
एकाक्षरी ॐआरें । तींचि हीं दोन्ही अक्षरें ।
पुढें पावली विस्तारें । त्रिपदारूपें ॥ ३१ ॥
असो हे हंसगायत्री । तिन्ही पदें असती माझारी ।
अकार उकार मकारीं । समजून पाहा ॥ ॥ ३२ ॥
एवं येथेंचा विचार । केला पाहिजे साचार ।
जपमात्रें भवसागर । न निमे कदा ॥ २३ ॥
आत्मा ब्रह्म अभिन्न । हेंचि विचाराचें लक्षण ।
मागें झालें निरूपण । त्या रीतीं तेथें ॥ २४ ॥
एवं शंध्या जप ऐसे । विचार साधन साधकां दिसे ।
सिद्धाअंगीं अनायासें । सहजगती साधती ॥ २५ ॥
मागें बोलिला ब्राह्मण । दोहींची लक्षणें दोन ।
एका जप अनुष्ठान । विचार एका ॥ २६ ॥
त्यासीं पाहिजेत त्रिकाळ । यासी नको काळ वेळ ।
त्यापाहिजे आसनमाळ । हा मोकळा सदा ॥ २७ ॥
त्या पाणिपात्रें पूर्वमुख । या सदा ब्रह्म सन्मुख ।
त्या बुटबुट पाहिजे देख । येथें वाणी मुराली ॥ २८ ॥

त्यासी करणें लागे खटाटोप। हा सदा अक्रियरूप।
तेथें असे पुण्यपाप। हा निर्लेप दोहिंसीं॥ २९॥
असो संध्याजपाउतरी। तर्पण कसें निर्धारीं।
तेंही बोलिजेल कुसरी। येणें श्लोकें॥ ५३०॥

तर्पणे स्वसुखेनैव स्वेंद्रियाणां प्रतर्पणम्।
मनसा मन आलोक्य स्वयमात्मा प्रकाशते॥ ११॥

निजतृप्तिसुखाकडून। स्वइंद्रियां करी तर्पण।
मनें मना प्रबोधून। स्वयें आत्मा प्रकाशे॥ ३१॥
परमात्मा जो असंग। निजानंदरूप अभंग।
तेंचि होतां निजांग। अविट तृप्ती जाहली॥ ३२॥
ऐसिया स्वकीय सुखानें। इंद्रियांसी तृप्त करणें।
जया तृप्तीनें विशयांकरणें। न इच्छिती पुन्हां॥ ३३॥
सृष्टिकाळीं इंद्रियदेव। निजसुखा इच्छून सर्व।
म्हणती आम्हां ऐसा ठाव। कोणता मिळे॥ ३४॥
गो अश्वादि देखिल। तेणें देव संकोचले।
पुरुष देखतां आनंदले। टाळिया पिटती॥ ३५॥
तेथेंही पडिलें अज्ञान। निसुख आच्छादिले पूर्ण।
तेव्हां देवीं घेतलें रान। विषयसुखाचें॥ ३६॥
दुकाळीं जैसीं मिडलकीं। खाती टरफलें आणि साली।
तैसी देवां दशा झाली। विषय कोंडा सेविती॥ ३७॥
तेणें पोट कधीं न भरे। अधिक धांवती सामोरे।
क्षुधा वाढली अपारें। परी अन्न कैंचें॥ ३८॥
अज्ञानदुष्काळ गेला। ज्ञासुकाळ प्राप्त झाला।
निसुखाचा पडदा फोडिला। गेव्हां झडा घालिती॥ ३९॥
निजसुखाची घेआं गोडी। विषय झाले देशधडी।
पडाली अवघ्यांची मुर्कुंडी। बराडी जैसे॥ ५४०॥
ताक इछितां न मिळे शिंप। त्यां सांपडला अमृतकूप।
मग धांवूनि आपेआप। उड्या घालिती॥ ४१॥
अमृताची बाणतां तृप्ती। काय साली टरफलें इच्छिती।
ऐसियां देवा तेणें रीतीं। निजसुख लाधलें॥ ४२॥
इच्छा क्षुधाची हरली। परम सुखें तृप्ति झाली।
इंद्रियां पुष्टी कैसी आली। न बोलवे ते॥ ४३॥
श्रोत्र शब्द ऐकतां। त्रासेंच फिरे मागुता।
निजसुखाचे आंतौता। जाऊनि पडे॥ ४४॥
ऐसीं त्वचादि ज्ञानेंद्रियें। आणि वाच्यादि कर्मेंद्रियें।
हीं अवघाचि समुदायें। निजसुखीं रिघती॥ ४५॥
विषय वेगळे सर्वांचे। एकमेकां घेतां नवचे।

परी नवल या निजसुखाचें । सर्वांसी सारिखें । ४६ ॥
नामरूप कोंडा साधिला । विषयमात्रीं आनंद देखिला ।
मग पाहती जों आपणाला । तों तेंचि अंगें ॥ ४७ ॥
वेगळा भाव जो कल्पिला । तो तत्काळचि निमाला ।
ब्रह्मानंदचि दाटला । इंद्रियविषयावीण ॥ ४८ ॥
आनंदातें सेवूं गेले । तो आनंदेंचि यांसि भक्षिलें ।
विषय इंद्रिय दोन्ही झाले । एकरूप ॥ ४९ ॥
ऐसें निजसुखाकडून । इंद्रियांचें झालें तर्पण ।
हें ज्ञात्याचें समाधान । अज्ञानिया न कळे ॥ ५५० ॥
देव ऋषि आणि पितर । स्वर्गीं असती हे समग्र ।
ऐसें कल्पूनि इतर । तर्पण करिती ॥ ५१ ॥
जल देती उलट्या करें । म्हणती येणें तृप्त पितरें ।
जल तों जलींच संचरे । पितरां अंगोठा ॥ ५२ ॥
असों तेणेसी नसे काज । ज्ञात्याचें तर्पण उमज ।
ऐसिये तृप्तीची चोज । लाधली कैसी ॥ ५३ ॥
म्हणसी तरी ऐकावें । दों रीतीं हें मन जाणावें ।
अविवेकें विषयीं धांवे । तें बोधावें विवेकें ॥ ५४ ॥
दोन्हीपरीं एक मन । तेणेंचि त्यासी प्रबोधून ।
दोन्ही जातां समरसून । स्वयें आत्मा प्रकाशे ॥ ५५ ॥
मी कांही ब्रह्म नव्हे । मज हें सुखदुःख आहे ।
हेंचि अशुद्ध मन पाहें । ओळखूनियां ॥ ५६ ॥
मी आत्माचि असंग । एकलाचि अभंग ।
शुद्ध कल्पनेतें उमग । ऐसिये रीतीं ॥ ५७ ॥
अशुद्ध कल्पना ज्ञानें गेली । शुद्ध कल्पनाही विराली ।
पुढें जे कांहीं उरली । निजात्मप्रभा ॥ ५८ ॥
अहंब्रह्मस्फुरण गेलें । निजांगेंचि ब्रह्म झलें ।
सुखदुःखावीण दाटलें । निजात्मसुख ॥ ५९ ॥
ऐसें होतां समाधान । इंद्रियांसी तृप्ती गहन ।
या नांव जाणिजे तर्पण । पूर्ण ज्ञात्याचें ॥ ५६० ॥
आतां बोलिजे अग्निहोत्र । आचरण जें कां पवित्र ।
ज्ञाअरूपचि स्वतंत्र । नव्हे इतरांऐसें ॥ ६१ ॥

आत्मनि स्वप्रकाशाग्नौ चित्तमेकाहुतिं क्षिपेत् ।
अग्निहोत्री स विज्ञेय इतरे नामधारकाः ॥ १२ ॥

आत्मनि स्वप्रकाशाग्नींत । एकाहुती अर्पिती चित्त ।
ते अग्निहोत्री जाणिजेत । येर हे नामधारी ॥ ६२ ॥
देह कुण्ड हें शुद्ध केलें । विवेकानें सारविलें ।
साधनचतुष्टय मेळविलें उपसाहित्य तेथें ॥ ६३ ॥

आत्मा पूर्वारणी । प्रणव तोचि उत्तरारणी ।
ज्ञानविचार मंथास्थानीं । अनुसंधान मंथन ॥ ६४ ॥
कामादिक इंधनीं । किंचित पडतां ज्ञानाग्नी ।
सन्निध वैराग्य धनमी । फुंकिला नेटें ॥ ६५ ॥
तेव्हां ज्ञानाग्नि धडाडी । ज्वाला धांवती ब्रह्मांडीं ।
आत्मप्रकाशें बापुडीं । गेलीं नामरूपें ॥ ६६ ॥
अग्नि ऐसा प्रगटल्यावरी । आहुतीची जाणावी परी ।
बारा सोळा सांडोनि दूरी । एकाहुती योजिली ॥ ६७ ॥
जेणें नामरूप कल्पिलें । नसतांचि सर्व उभविलें ।
तें हें चित्त जाणा वहिलें । विकाररूपी ॥ ६८ ॥
निजानुभवाचे हातीं । तेचि घेऊन एकाहुती ।
आत्मा अग्नि स्वयंज्योती । टाकिली त्यांत ॥ ६९ ॥
आहुति पडतां अग्नींत । अग्नीच होऊन राहत ।
तेणें नामरूपादि संकेत । त्यासवें गेला ॥ ५७० ॥
पुढें अस्तिभातिप्रियरूप । एकलें एक अमूप ।
उरलें तयचें माप । कोण करी ॥ ७१ ॥
एक वेळे समर्पण । दुजिया काळें नसे जाण ।
आणि आहुतिही आन । दुसती नाहीं ॥ ७२ ॥
ऐसी एक वेळे एकाहुती । चित्त अर्पिलें आत्मज्योती ।
तोचि जाणिजे निश्चितीं । अग्नीहोत्री ॥ ७३ ॥
हें सिद्धाचें लक्षण । साधकाचें याहूनि भिन्न ।
क्षणक्षणां चित्त अर्पण । करी तो अग्नीहोत्री ॥ ७४ ॥
येर हे नामें मिरविती । आम्ही दीक्षित म्हणविती ।
आत्मा अग्नीतें नेणती । फुगती देहाभिमानें ॥ ७५ ॥
दृश्य अग्नीमाजी तूप । तांदुळादि जाळिती अल्प ।
म्हणती हुताशन हा अमूप । फळ देईल आम्हां ॥ ७६ ॥
असो ज्ञात्याची सरी । काय करिती वेषधारी ।
जया आत्मा दुरीच्यादुरी । अंतरला असे ॥ ७७ ॥
अग्निहोत्र झालिया । अर्चन बोलिजे शिष्यराया ।
येणें श्लोकीं न होतां क्रिया । सहजगती ज्ञात्याचे ॥ ७८ ॥

देहो देवालयं प्रोक्तो देही देवो निरंजनः ।
अर्चितः सर्वभावेन स्वानुभूत्या विराजते ॥ १३ ॥

देह देवाल बोलिजे । निरंजन देव ओळखिजे ।
स्वानुभवें अर्चितां विराजे । सर्वात्मभावें ॥ ७९ ॥
देह एक उपलक्षण । परी जें जें डोळियां दिसणें ।
ब्रह्मांड दृश्य हें संपूर्ण । जडरूपें देऊळ ॥ ५८० ॥
पंचभूतें चारी खाणी । देवमानवादि मिळोनी ।

इतुकेही देउळश्तानीं । चिरे शोभती ॥ ८१ ॥
ऐसिया देउळामाझारीं । आत्मा ब्रह्म निर्विकारी ।
एकलाचि चराचरीं । निरंजन देव ॥ ८२ ॥
जितुकीं भासती चंचळ । मायादि तत्त्वें सकळ ।
तें ओळखावें केवळ । पूजासाहित्य ॥ ८३ ॥
अहंकार हा पुजारी । देऊळ आणि सर्व सामुग्री ।
देवामाजी अर्पण करी । आपणासकट ॥ ८४ ॥
जीव ईश्वर मेळविले । हेंचि देवा स्नान झालें ।
जडजात विवेकें उगाळिलें । गंध तें हेंचि ॥ ८५ ॥
चंचळ तितुकीं सुमनें । ओंविलीं चैतन्यतंतूनें ।
सच्चिद्रूपी अर्पितां तेणें । अतिशोभा पावलीं ॥ ८६ ॥
अज्ञान धूप जाळिला । ज्ञानदीप उजळिला ।
धुरेंवीण दाटला । प्रकाशचि ॥ ८७ ॥
निजतृप्ति नैवेद्य पूर्ण । तंबूल अखंडैकरस जाण ।
हरपलें जें द्वैतभान । फलादि हेंचि ॥ ८८ ॥
पूर्ण जें कां समाधान । हेंचि दक्षिणाअर्पण ।
एवं झालें हें पूजन । व्यतिरेकरूपें ॥ ८९ ॥
अन्वयरूपें प्रदक्षिणा । नुगवतांही सर्वपणा ।
एकलाचि देवराणा । एकपणेंवीण ॥ ५९० ॥
मा सर्वही आपण । सर्वही देव परिपूर्ण ।
सर्वात्मभावें पूजन । सर्वीं सर्वां ॥ ९१ ॥
ऐसें ज्ञात्याचे पूजन । सर्वभावें स्वानुभूतीनें ।
अस्तिभातिप्रियत्वानें । विराजे अति ॥ ९२ ॥
हें काय कळे अज्ञाना । प्रवर्तती जडाच्या पूजना ।
आम्ही पूजक या भिमाना । बळकट केलें ॥ ९३ ॥
देहबुद्धि पोखितां जाण । मुळीं जड झाला आपण ।
कल्पिलें देव संपूर्ण । जडरूपचि ॥ ९४ ॥
धातु पाषाण गोटे । देव केले थोर धाकुटे ।
अर्चन करिती गोमटें । फलमूलजीवनें ॥ ९५ ॥
सचेतन तुलसी तोडिती । अचेतना मस्तकीं वाहती ।
तेथे देव कैंचा रे भ्रांती । पडली नेणा ॥ ९६ ॥
हे पुरे गा बडबडी । करोत जे जयां आवडी ।
अज्ञानें केलीं वेडीं । करावें काय ॥ ९७ ॥
असो ज्ञात्याचें अर्चन । झालें त्याचें निरूपण ।
पुढिले श्लोकीं मौनध्यान । ऐका कैसें ॥ ९८ ॥

मौनं स्वाध्ययनं ध्यानं ध्येयं ब्रह्मानुचिंतनम् ।
ज्ञानेनेति तयोः सम्यङ् निषेधांतःप्रदर्शनम् ॥ १४ ॥

मौन तेंचि स्वध्यायन । ब्रह्मचिंतन तें ध्यान ।
ज्ञानें वाणी मन निषेधून । दर्शन उत्तम धेयाचें ॥ ९९ ॥
वेदाध्ययन समजावें । वेद काय हें कळावें ।
यास्तव लागे हें बोलावें । अल्प कांहीं ॥ ६०० ॥
सत्य बोलतां मन विटे । असत्य तें वाटे गोमटें ।
मायिकाची भीड न तुटे । म्हणोनियां ॥ १ ॥
जनाचिया विपरीत मती । एकाचे एक भाविती ।
पाणियामाजी निजेला म्हणई । आदिनारायण ॥ २ ॥
वेद प्रगटला त्याचे श्वासीं । आणि म्हणती अपौरुषी ।
हा विरोध न काळतां त्यांसी । वेवादती वाउगे ॥ ३ ॥
असो ऐसे अनधिकारी । त्यां काज नसे निर्धारीं ।
स्वानुभवाचे अनुकारीं । बोलिजे आतां ॥ ४ ॥
अहंब्रह्म झालें स्फुरण । तोचि आदिनारायण ।
वेदही तयापासून । प्रगट झाले ॥ ५ ॥
मुख्य रूप तें वेदाचें । प्रणव रूपचि साचें ।
त्रिमात्रात्मक जयाचें । अंग होय ॥ ६ ॥
तेथें चंचळ आणि जाणता । प्रकृति पुरुष तत्त्वतां ।
प्रकृतिअंग पाहतां । मात्रा तीन ॥ ७ ॥
तोचि जाणिजे सकार । एका पुरुषाचा प्रकार ।
अर्धमात्रा जाणीव हकार । साक्षिमात्रें ॥ ८ ॥
एवं अकार उकार मकार । अर्धमात्रा ते ध्वनिमात्र ।
जाणतां बिंदु साचार । अंगें पांच ऐसीं ॥ ९ ॥
पुरुषामाजी प्रकृती । प्रकृतीमाजी स्वयंज्योती ।
निवडी कोण तयांप्रती । एकरूपचे ते ॥ ६१० ॥
एऐसा प्रणवरूप वेद । स्वयंभ प्रगटला नाद ।
तो विचारितां विशद । दों अक्षरीं दिसे ॥ ११ ॥
पूर्वीं जपप्रसंगीं बोलिलें । हंसाक्षराचें रूप केलें ।
अर्थरूपें निर्धारिलें । ते गायत्री हेचि ॥ १२ ॥
येथून प्रगटल्या मात्रा । वेगळाल्या पन्नास पवित्रा ।
पहिल्या दोन स्वतंत्रा । मेळवितां बावन ॥ १३ ॥
अकारादि वर्ण सोळा । वेगळाल्या पन्नास पवित्रा ।
कादिस्पर्श निर्मळा । हापंचविसांचा मेळा । यरादि सात ॥ १४ ॥
हक्ष हीं दोन्ही अक्षरें । मिळाअं पन्नास होती सारे ।
इतुक्यामाजीही अकारें । वस्ति कीजे ॥ १५ ॥
अकारचि रूप याचें । दिसणें तें उकाराचें ।
कारणत्वें मकाराचें । राहणें असे ॥ १६ ॥
एवं ह्या मातृका सर्व । इतुक्यांचें बीज प्रणव ।
हा अवघा वेदराव । पुरुषकृत नव्हे ॥ १७ ॥
शब्दब्रह्म हा इतुका । वाणी ज्या कां परादिका ।

त्यांमाजी वास्तव्य एका । वेदरायाचें ॥ १८ ॥
मागें पुढें मात्रा उमटत । तेणें शब्द होती अनंत ।
पुढें विस्तारिला बहुत । विरिंच्यादिमुखें ॥ १९ ॥
झालें वेदाचें निरूपण । आतां कैसें अध्ययन ।
त्याचेही प्रकार दोन । साधकसिद्धभेदें ॥ ६२० ॥
उपनिषदांचें पठण । अथवा गुरुमुखें श्रवण ।
अन्य सर्व उपेषून । इतुकाचि छंद ॥ २१ ॥
हें साधकाचें लक्षण । अध्ययन तेंचि मौन ।
आतां ऐका सावधान । मौन ज्ञात्याचें ॥ २२ ॥
अवघें ब्रह्म कळलें । पाप पुण्यही सांडिलें ।
तिळोदकचि दिधलें । उत्तमाधमभावा ॥ २३ ॥
एक ब्रह्म परिपूर्ण । तेथें कैचें द्वैतभान ।
एकला क्रीडे अनुदिन । उत्थान ना समाधि ॥ २४ ॥
अवघ्या ह्या मातृका वेद । निर्धार झाला अभेद ।
मग जो जो मुखीं निघे शब्द । तें तें अध्ययन ॥ २५ ॥
बरें वाईट न म्हणे । सत्य मिथ्या उच्चारूं नेणे ।
मुखा आलें तें बोलणें । हेंचि मौन ॥ २६ ॥
वाणी सैर बडबडी । परी द्वैत झालें देशधडी ।
वीट किंवा आवडी । दोन्ही नाहीं ॥ २७ ॥
ऐसें ज्ञात्याचें मौन । साधकाचें श्रवणमनन ।
एवं झालें निरूपण । मौनाचें ऐसें ॥ २८ ॥
मुखीं घालून दांतखिळी । सैर आशा केली मोकळी ।
तें मौन नव्हे आगळी । अविद्या माया ॥ २९ ॥
असो मनाचें अनुसंधान । जया बोलिजे ब्रह्मचिंतन ।
हेंचि ज्ञानियाचें ध्यान । सर्वदा होय ॥ ६३० ॥
ध्येय ब्रह्म परिपूर्ण । तयचें कैसें दर्शन ।
जेथें निवर्ते वाणी मन । ध्याना अवलंब केवीं ॥ ३१ ॥
ऐसें आक्षेपितां परी । बोलिजेतें निर्धारीं ।
जें जें दिसेल आकारीं । तें तें ब्रह्म नव्हे ॥ ३२ ॥
मनासी जितुकें कळलें । तें तेंही सर्व नाथिलें ।
वाणी मनही उपेक्षिलें । विकार म्हणोनी ॥ ३३ ॥
ऐसे नव्हे नव्हे म्हणतां । त्यागिलें वेगळें भासतां ।
जें कां न ये त्यागितां । आणि घेतांही न ये ॥ ३४ ॥
ध्याता आणि ग्राहक । दोन्ही नसतां जें एक ।
उरे निषेध अंतक । अधिष्ठानमात्र ॥ ३५ ॥
ऐसें जें कांहीं उरे । तेंचि ध्येय निर्धारें ।
त्या शून्य म्हणतां उत्तरें । बोलिजे ऐका ॥ ३६ ।
दीप जेणें मालविला । मालविता त्यासवें मेला ।
तरी नाहींपणा देखिला । दीपाच कोणे ॥ ३७ ॥

तैसें मन वाचा त्यागिलें जेणें । त्यागिता विचार त्यासवें जाणे ।
सर्वांचाही अंत देखणें । शून्य तरी तैसा ॥ ३८ ॥
तस्मात मन वाणी विचार । शून्यासहित भास मात्र ।
जातां उरे ज्ञप्तिमात्र । ध्येयरूप ब्रह्म ॥ ३९ ॥
तें निजांगेंचि आपण । निश्चयज्ञानें बाणली खूण ।
याचि नांवे प्रदर्शन । जे भेटी आपुली ॥ ॥ ६४० ॥
व्यतिरेकें ऐसें जाणता । तेंचि देखे कार्याआंतौता ।
सत्यावीण भास केउता । दिसे डोळां ॥ ४१ ॥
ऐसे हौनि अन्वय । पदार्थमात्रीं देखे ध्येय ।
हा सर्वदा आठव होय । हेंचि ध्यान ॥ ४२ ॥
चिंतनशब्दें स्फुरण । साधकासी अनुसंधान ।
सिद्धासी सम्रण विस्मरण । दोन्ही नसती ॥ ४३ ॥
एऐसें ज्ञात्याचें ध्यान । नलगे एकांत आसन ।
जेथें जेथें जाय मन । तो तो ब्रह्मसमाधि ॥ ४४ ॥
हें न जाणतां अज्ञान । कळेंचि मन आवरून ।
करिती मूर्तीचें ध्यान । जाउनी एकांती ॥ ४५ ॥
मूर्ती आठवितां अंतरीं । तेथें आली दिव्य नारी ।
तें विवेकें सारिली जरी । तों श्वान देखे ॥ ४६ ॥
पूजासहित्य अर्पितां । सर्प विंचू होती पाहतां ।
ऐसे तुतक ध्यन करितां । काय होतें ॥ ४७ ॥
जें जें दिसतें भासतें । ब्रह्मचि कां नव्हे तें तें ।
अखंड ध्यानचि निश्चितें । विचारें न कळे ॥ ४८ ॥
अखंड ध्यान हें न कळे । अज्ञानद्वैत न मावळे ।
बळेंचि झांकितां डोळे । ध्यान न घडे ॥ ४९ ॥
असो ये रीतीं मौन । झालें श्लोकीं निरूपण ।
आतां ज्ञात्याचें भोजन । पुढिलें श्लोकीं ॥ ६५० ॥

अतीतानागतं किंचित् न स्मरामि न चिंतये ।
रागद्वेषं विना प्राप्तं भुंजाम्यत्र शुभाशुभम् ॥ १५ ॥

मागील झालें न स्मरतां । होणार न चिंतितां ।
रागद्वेषविण येथें येतां । भोगितों शुभाशुभ ॥ ५१ ॥
मागें भोगिलें राज्यपद । अथवा अत्यंत आपद ।
नाना सुखदुःखद्वंद्व । त्याचें स्मरण् टाकिलें ॥ ५२ ॥
अहा महत्सुख गेलें । अंतरीं दुःखें तळतळिलें ।
कीं दुःख सरतां बरें झालें ।आठवी दोन्ही ॥ ५३ ॥
हेंही स्मरेना ऐसें । कारण त्यां सत्यत्व नसे ।
स्वप्नमाजी भासले जैसे । व्याघ्रस्त्रियादि ॥ ५४ ॥
तोचि जागा होऊनी ।व्याघ्र जातां बरें मानी ।

स्त्रीसुख अंतरलें म्हणोनी । कोणी तळमळीना ॥ ५५ ॥
तैसे हे विषय सर्व । मिथ्य्त्वें गेलें रूपनांव ।
दुःखरूप कीं अपूर्व । सांडिलीं दोन्ही ॥ ५६ ॥
मागें देहा दुःख झालें । अथवा सुखचि भोगिलें ।
स्वप्नापरी तें त्यागिलें । नाठवी मन ॥ ५७ ॥
तैसाचि पुढें कोण समय । सुख कीं दुःख प्राप्त काय ।
याचें चिंतनचि न होय । निर्धारिंसीं ॥ ५८ ॥
होणार जें तें आधीं । न होणार तें नव्हे कधीं ।
ऐसी होतां दृढबुद्धी । चिंतन कासया ॥ ५९ ॥
एवं गेले तें न स्मरे । पुढें न चिंती होणारें ।
प्रारब्धाचेनि अनुकारें । जे जे प्राप्तभोग ॥ ६६० ॥
ते रे द्वेष प्रीति टाकुनी । भोगिता शुभाशुभ दोन्ही ।
पापपुण्याची काहाणी । नेणे सर्वथा ॥ ६१ ॥
प्रारब्ध कैसें ज्ञात्यासी । ऐसें जरी कल्पिसी ।
तरी कर्मावीण देहासी । राहणें न घडे ॥ ६२ ॥
संचित ज्ञानें जळालें । अहंतेवीण क्रियमाण गेलें ।
प्रारब्ध देहासी उरलें । भोगमात्र निमे ॥ ६३ ॥
देहचि आपण नव्हे । तरी प्रारब्ध कोठें आहे ।
देह निमालें कीं राहे । त्या संबंध नसे ॥ ६४ ॥
आत्मा देहरूप होईना । देहासी प्राब्र्ध सोडीना ।
देहाचें रूप हें जाणा । प्रारब्ध कर्म ॥ ६५ ॥
असो ऐसे प्रारब्ध भोगिआं । सुखदुःख न पावे ज्ञाता ।
हर्षशोकाची नसे वार्ता । प्रियद्वेश्यही नाहीं ॥ ६६ ॥
द्रव्य स्त्रिया प्राप्त होतां । प्रीति उपजेना चित्ता ।
सर्पादि भयंकर पाहतां । द्वेषही न करी ॥ ६७ ॥
अथवा गृह ग्राम त्यजावें । सुखें अरण्य सेवावें ।
हेंही नेणे स्वभावें । प्राप्त तें भोगितो ॥ ६८ ॥
हें पुण्यात्मक आचरावें । हें पापात्मक त्यागावें ।
हेंही नेणें स्वभावें । प्राप्त तें भोगितो ॥ ६९ ॥
अथवा हें पाचि करूण् । पुण्य कदाही नाचरूं ।
ऐसाही नेणे प्रकारू ।प्राप्त तें भोगितो ॥ ६७० ॥
मी भोगितां हें वचन । ज्ञात्यासी कैस अभिमान ।
म्हणसी तरी सावधान । श्रवण करीं ॥ ७१ ॥
आत्मा देहावेगळा असतां । मी देहचि वाटे नेणतां ।
हे मुख्य जाणावी अहंता । बंधासी मूळ ॥ ७२ ॥
मी देह हे जालें दृढ । निरभिमानता दाकह्वी मूढ ।
तो मी मी म्हणतां द्वाड । बंधनींच पडे ॥ ७३ ॥
तैसा हा ज्ञाता नव्हे । निरभिमनता खरी आहे ।
आपण आत्मा हा दृढ राहे । विश्चय बुद्धीसी ॥ ७४ ॥

अहंकारादि देहांअ । जीं जीं तत्त्वें भिन्न भासत ।
तीं तीं मी हा संकेत । स्वप्नींही नव्हे ॥ ७५ ॥
जड चेतन वेगळें केलें । सत्य मिथ्या निवडिलें ।
सत्य तेंचि निश्चया आलें । आपण ऐसें ॥ ७६ ॥
ऐसें झालें ग्रंथिभेदन । चैतन्य आत्मा परिपूर्ण ।
त्याहून वेगळा अभिमान । पुन्हां एक नव्हे। ॥ ७७ ॥
मिथ्यात्वें हा अहंकार । तयाचे दोन प्रकार ।
एक शास्त्रोक्त साचार । दुजा लौकिकी ॥ ७८ ॥
मी असंग परिपूर्ण । ध्येय ध्याता ध्यानेंवीण ।
ऐसेंचि आठवी मन । अभिमान हा शास्त्रोक्त ॥ ७९ ॥
मी पाहतों मी चालतों । मी देतों मीचि घेतों ।
ऐसा लौकिकी बोलतो । परी बंधरूप नव्हे ॥ ६८० ॥
अंतरीं गांठी सुटली । बाह्यव्यवहारी दिसली ।
वरीवरी अहंता दाविली । ते काय तया बाधी ॥ ८१ ॥
असो ज्ञाता सर्व करितां । पापपुण्याची नसे चिंता ।
बरे वाईट भोग येतां । भोगितो सुखें ॥ ८२ ॥
शब्द बोलतां ऐकतो । वस्तुमात्राचा स्पर्श घेतो ।
जें जें दिसेल तें तें पाहतो । बरें कीं वाईट ॥ ८३ ॥
मुखी आतुडें तेंखातो । येईल त्याचा गंध घेतो ।
मुखा आलें तें बोलतो । बरें की वाईट ॥ ८४ ॥
कोणी कांहीं देतां घेतो । कोणी कांहीं मागतां देतो ।
कांहीं करितां करूं लागतो । बरें की वाईट ॥ ८५ ॥
जिकडे पाहिजे तिकडे जातो । भलते स्थानीं विसर्ग करितो ।
अंतःकरणींही आठवितो । बरें की वाईट ॥ ८६ ॥
संकल्प होय तो करितो । त्याचा निश्चयही दृढ होतो ।
आठवेल तें चिंतितिओ । बरें की वाईट ॥ ८७ ॥
आवडे तयाची अहंता । आवडे तयाची ममता ।
वर्तणूक जे पाहतां निराग्रहेंचि ॥ ८८ ॥
पाहिजे तया शिकवितो । पाहिजे तया उपेक्षितो ।
पाहिजे तया सर्व देतो । निराग्रहेंचि ॥ ८९ ॥
पाहिजे तेथें पडतो । पाहिजे तेव्हां उठून जातो ।
पाहिजे तोंवरी राहतो । निराग्रहेंचि ॥ ६९० ॥
कोणी पूजितां पूजा घेतो । कोणी गांजितां सोशितो ।
निंदा स्तवनही ऐकतो । निराग्रहेंचि ॥ ९१ ॥
कोणी घालितां स्नान करितो । कोणी वाढितां अन्न खातो ।
कोणी नेसवितां नेसतो । निराग्रहेंचि ॥ ९२ ॥
बोलाइतां जवळी येतो । ढकलून देतां मागें जातो ।
केव्हां स्वतंत्रही राहतो । निराग्रहेंचि ॥ ९३ ॥
पराधीनचि राहावें । किंवा स्वतंत्रचि असावें ।

ऐसाही नेमु न संभवे । आग्रहावीण ॥ ९४ ॥
असो हें किती बोलावें । जितुकें करणें भोगणें सर्वें ।
पापपुण्यात्मक आघवें । प्राप्त होतां भोगितो ॥ ९५ ॥
प्राप्त तितुकें करावें । अप्राप्त तितुकें त्यागावें ।
केलें तं आतां न स्मरावें । होणारें न चिंती ॥ ९६ ॥
बहु काय स्थिती बोलावी । मागील क्षणही नाठवी ।
पुढील क्षणाची उठाठेवी । सर्वथा नाहीं ॥ ९७ ॥
प्रस्तुत जितुकें पुढें आलें । तें तें सुखेंचि भोगिलें ।
भोगून पाहिजे सारिलें । म्हणोनियां ॥ ९८ ॥
अथवा गतगोष्टी बोलतो । पुढें अमुक करूं म्हणतो ।
परी सुखदुःखें शिणेना तो । इतरांऐसा ॥ ९९ ॥
बाळ जैसा क्रीडतां । करूं न करूं नसे वार्ता ।
पाप कीं पुण्य त्याचे चित्ता । न ये कधी ॥ ७०० ॥
बाळ नेणतेपणें कनिष्ठ । ज्ञाता सर्वज्ञत्वें वरिष्ठ ।
उभयांसी नाहीं कचाट । विधिनिषेधांचें ॥ १ ॥
कांहीं कळे कांहीं न कळे । ज्ञा असून आंधळे ।
विधिनिवेधांचे सांकळे । बांधिले तेचि ॥ २ ॥
ज्ञाता निजांगें पूर्ण ब्रह्म । तेथें कैंचा उरे नेम ।
अवघें जाऊनि रूपनाम । स्वइच्छा क्रीडे ॥ ३ ॥
ज्ञानियाची उंच पदवी । पुण्यमार्गीं तनु वर्तावी ।
पापाची प्रवृत्ति न व्हावी । कोणते काळीं ॥ ४ ॥
बाप हो ऐसी आशंका । सर्वथैव करूं नका ।
वर्ततो देहमात्र तितुका । प्रारब्धाधीन ॥ ५ ॥
प्रारब्धभोगाचें अक्षर । पुसी कोण पुरुषार्थी नर ।
मागें झाले पुढें होणार । कर्मगती वर्तती ॥ ६ ॥
प्रारब्ध नासूं म्हणताण् कोडें । तरी जनकादि काय वेडे ।
जो ज्या क्षणीं भोग आतुडे । समानत्वें भोगिती ॥ ७ ॥
चक्र जैसें फिरविलें । उजवें डावें फिरे उगलें ।
तैसे हें कर्माचें प्रेरिलें त्या रीतीं वर्ते ॥ ८ ॥
चक्राचें भ्रमण सरे । तरी आपेंआप थिरे ।
प्रारब्ध भोगोनि वोसरे । मग देह कैंचा ॥ ९ ॥
असो देह मेले कीं राहिले । पुण्यमार्गीं कीं पाप आचरिले ।
तेणे समाधानाचें झाले । उणे काय ॥ ७१० ॥
पापपुण्य हे कल्पना । करून भेडसावी अज्ञाना ।
बागुल जैसा बाळपणा । माजी सत्य ॥ ११ ॥
हें ज्ञानियां नसे सांकडें । नामरूप सर्वही उडे ।
जें जें येतां दृष्टीपुढें । अस्तिभातिप्रियत्वें ॥ १२ ॥
तेणेंवीण नाहीं सर्व । म्हणोनि तेंचि अपूर्व ।
ऐसा बाणला स्वानुभव । निश्चयेंसी ॥ १३ ॥

आतां देह तरी कोठें असे । कोणा प्रारब्ध उरलेंसे ।
ज्ञाता अखंड एकरसें । पूर्णब्रह्म निजांगें ॥ १४ ॥
कैंचा देह कैंचा प्राण । कैंचें इंद्रिय कईचें मन ।
कैंची बुद्धी अंतःकरण । पूर्णब्रह्म ॥ १५ ॥
कैंचा विषय कईची साधनें । कैचें भोग कैंचें भोगणें ।
कैंचा कर्ता भोक्ता जाणणें । पूर्णब्रह्म ॥ १६ ॥
कैचें संचितक्रियमाण । कैचें प्रारब्धीं वर्तन ।
कैचें असे पापपुण्य । पूर्णब्रह्म ॥ १७ ॥
कैंचा आहारविहार । कैंचा घडेल आचार ।
कैंचें बाह्य अभ्यंतर । पूर्णब्रह्म ॥ १८ ॥
कैंचा ग्राम कैंचा देश । कैंची स्त्री अकिंचा पुरुष ।
कैंचा काम कैंचा विलास । पूर्णब्रह्म ॥ १९ ॥
कईची जागृती । कैंचें स्वप्न । कैंची सुषुप्ती अज्ञान ।
कैंची अविद्या बंधन । पूर्णब्रह्म ॥ ७२० ॥
कैंचा बाप कईचा पुत्र । कैंचा शत्रु कईचा मित्र ।
कैंचे स्वजन कुलगोत्र । पूर्णब्रह्न ॥ २१ ॥
कैंची जाति कईचें कर्म । कैंचा अधर्म कैंचा धर्म ।
कैंचा वर्ण कैंचा आश्रम । पूर्णब्रह्न ॥ २२ ॥
कैंचा रंक कैंचा राजा । कैंचे पालन कोठें प्रजा ।
मीतूंपणा कैंचा दुजा । पूर्णब्रह्न ॥ २३ ॥
कैंची भूमि आप कैंचें । कैंचा वायु तेज कैंचें ।
कैंचा शब्द आकाश कैंचें । पूर्णब्रह्न ॥ २४ ॥
कैंचा मेरु कैंचा समुद्र । कईचा सूर्य कैंचा चंद्र ।
कैंचा यम कैंचा इंद्र । पूर्णब्रह्न ॥ २५ ॥
कैंचें वैकुंठ कैंचा कैलास । कैंचा सत्यलोकीं वास ।
कैंचे देवदैत्यराक्षर ।पूर्णब्रह्न ॥ २६ ॥
कैंची शिव कैंचा विष्णु । कैंचा राम कैंचा कृष्णु ।
कैंचा आणिला चतुराननु । पूर्णब्रह्न ॥ २७ ॥
कैंचा वेद शास्त्र कैंचें । कईची विभक्ति ज्ञान कैंचें ।
कैंचे साधन श्रवण कैंचें पूर्णब्रह्न ॥ २८ ॥
कैंचे मनन निदिध्यासें । साक्षात्कार कोठें असे ।
समाधिउत्थान कायसें । पूर्णब्रह्न ॥ २९ ॥
कैंचा बंध कैंचा मोक्ष । कैंचा द्रष्टा कैंचा साक्ष ।
कैंचा सिद्धांत पूर्वपक्ष । पूर्णब्रह्न ॥ ७३० ॥
कैंचें ध्येयध्याताध्यान । कैंचें ज्ञेयज्ञाताज्ञान ।
कैंचे साध्यासाधकसाधन । पूर्णब्रह्न ॥ ३१ ॥
कैंची माया कैंचे गुण । कैंचा जीव कैंचा ईशान ।
कैंचें द्वैताद्वैतभान । पूर्णब्रह्न ॥ ३२ ॥
कैंचा प्रपंच कैंचा परमार्थ । कैंचा अनर्थ कैंचा अर्थ ।

कोण सेवक कैंचा नाथ। पूर्णब्रह्न ॥ ३३ ॥
कैसा मात्रात्मक ॐकारु। कैंचा करणें विचारु।
कैंच शिष्य कैंचा गुरु। पूर्णब्रह्न ॥ ३४ ॥
कोठें बाळी बुगडी कांकण। एकचि असतां सुवर्ण।
तैसीं नामें भिन्नभिन्न। एक ब्रह्म असतां ॥ ३५ ॥
त्या त्या पदार्थीं पाहतां। पापरूपाची नसे वार्ता।
अवघें ब्रह्मचि तत्त्वतां। विलसत असे ॥ ३६ ॥
तोचि गुरु तोचि प्रणव। शिष्यही त्यासीच आले नांव।
तेचि माया जीवशिव। भेदचि नाहीं ॥ ३७ ॥
तोचि ब्रह्माविष्णुमहेश। तोचि इंद्रचंद्रादिदिनेश।
दैत्यमानवराक्षस। भेदचि नाहीं ॥ ३८ ॥
पंचभूतें चारी खाणी। स्थावरजंगमादि मिळोनी।
कीटकपाषाण नाना स्थानीं। भेदचि नाही ॥ ३९ ।
जितुकें दिसएं भासतें। बरें वाईट कल्पिजेतें।
विषयादि व्यवहारातें। भेदचि नाहीं ॥ ७४० ॥
ऐसा नामरूपेंवीण। प्राप्त विषय भोगी जाण।
गेलें होणार हें चिंतन। स्मरे ज्ञाता ॥ ४१ ॥
अथवा अतीत अनागत। काय ऐसें कोणी पुसत।
तरी चिद्‌रूप समस्त। उत्तर दिधलें ॥ ४२ ॥
न स्मरे न चिंती ऐसें नव्हे। तरी स्मरतो चिंतितो सर्वदा हें।
ऐसा काक्वर्थ येथें वाटतीहे। परी तो आठवून पूर्णाचा ॥ ४३ ॥
तस्मात् मागें झालें पुढे होणार। तें तें ब्रह्मचि चिन्मात्र।
मध्येंही जो जो भोगमात्र। निजांगें ब्रह्म ॥ ४४ ॥
ऐसें ज्ञात्याचें भोजन। जयाचें पूर्ण समाधान।
हें न ठकेचि आचरण साधकासीही ॥ ४५ ॥
तया साधनाचा विधी ।विघ्नकर जें त्या निषेधी।
असो ज्ञात्याचा सामाधी। ज्ञाताची जाणे ॥ ४६ ॥
देवदत्ता सावध अससी। किंवा नाहीं सांग मजसीं।
बोलिले ज्ञात्याचे आचरणासी ऐकिलें कीं ॥ ४७ ॥
येथें क्रिया ते कोणती। सांग बापा मजप्रती।
इतुकींही लक्षणें मागुती। अनुवादें बोलूं ॥ ४८ ॥
विचाररूप प्रातःस्मरण। साधकासी अनुसंधान।
कीं ज्ञात्याचे साधन। लक्षण पहिलें ॥ ४९ ॥
शौचविधि त्याहून काय। भिन्न असे गा उपाय।
स्नान तेंही अद्वय-। ज्ञानरूपचि ॥ ७५० ॥
अघमर्षण संध्या पवित्र। जप तर्पण अग्निहोत्र।
ज्ञानरूपचि स्वतंत्र। लक्षण त्याचें ॥ ५१ ॥
अर्चन मौन आणि ध्यान। बारावें असे भोजन।
काय असे ज्ञानेंवीण। इतुक्या ठायीं ॥ ५२ ॥

नाममात्र वेगळालें । परी तें एकरूप संचलें ।
यासी भेद तरी कोण बोले । क्रियारूप ॥ ५३ ॥
एवं झालें निरूपण । तेरा श्लोकीं आचरण ।
ज्ञानियाचें समाधान । ध्येयध्यान साधका ॥ ५४ ॥
ऐसा बोलून आचार । मौनें राहती शंकर ।
सर्व ऐकोनि साचार । देवदत्तें ॥ ५५ ॥
अंतःकरण कैसें झालें । कीं मेघें भूमीतें भिजविलें ।
तैसें श्रोत्रद्वारा आलें । गुरुवचनामृत ॥ ५६ ॥
बाह्य न जातां एक कण । अर्थ अवघा केला प्राशन ।
त्याचेंचि लागलें ध्यान । चतुष्टयासी ॥ ५७ ॥
इंद्रियां दिधलीं कपाटें । मनादि धांवती नेटें ।
अर्थसमुद्रीं ओहटे । जैसें जलचर ॥ ५८ ॥
कीं आकाशीं पक्षी उडती । अंतःकरणें तैसीं धांवती ।
अर्थसमुद्रीं बुड्या देती । उसळती वरी ॥ ५९ ॥
परी त्या ज्ञानरूप अर्थाचा । लागे कोणा अंत साचा ।
मग तो शिणूनि विस्मयाचा । आश्रय करी ॥ ७६० ॥
म्हणे काय ज्ञात्याचा आचार । काय ज्ञात्याचा विचार ।
काय ज्ञात्याचा प्रकार । बोलिला नवचे ॥ ६१ ॥
अहा अहा हे कोण स्थिती । अहा अहा हे कोण रीती ।
अहा अहा हे सुखमूर्ती । धन्य ज्ञाते ॥ ६२ ॥
धन्य धन्य ते साधक । जयां ध्येयमात्र ब्रह्म एक ।
आतां ऐसें ज्ञानकौतुक । मज प्राप्त कधीं ॥ ६३ ॥
लालुची कैसी गुंतली । कीं दुष्काळीं जैसीं मिडलकलीं ।
अन्न देखतां धांवती वहिलीं । कोणी मारितांही ॥ ६४ ॥
कीं मुंगी जैसीं साखरीं । कीं पतंग दीपावरी ।
कीं व्यभिचारिणी नारी । मनें परपुरुषीं ॥ ६५ ॥
तैसें झालें देवदत्ता । आधीं पावेन अर्थामृता ।
केव्हां सद्‌गुरु होईल दाता । केव्हां भेटेल तें सुख ॥ ६६ ॥
केव्हां जाईल अज्ञान । केव्हां प्रगटेल ज्ञान ।
केव्हां होईल अभिन्न । समाधान केव्हां ॥ ६७ ॥
पुन्हां विचार मनीं । धन्य माझी सुकृतश्रेणी ।
गुरुमूर्ति देखिली नयनीं । आतां मज उणें काय ॥ ६८ ॥
क्षीरसागरीं पडिला । तो कां राहील भुकेला ।
कुबेर जेणें मित्र केला । त्या दरिद्र कैंचे ॥ ६९ ॥
कामचेनूचे वत्सासी । क्षुधेची चिंता कायसी ।
तैसे सद्‌गुरुमाय मजसी । कृपेसहित ओळली ॥ ७७० ॥
तरी आतांचि सद्‌गुरु बोधिती । होईल भावाची समाप्ती ।
सुखेंचि स्वानुभवाप्रती । पावेन आतां ॥ ७१ ॥
आणिक एक खंती वाटली । जे म्यां गुरुसेवा नाहीं केली ।

अहा प्रारब्धा घरबुडी झाली । माझी तेणें ॥ ७२ ॥
गुरु तरी अति कृपाळु । परी मी काय होय दुर्बळु ।
अति लाभ जो दुर्मिळु । तो म्यां अव्हेरिला ॥ ७३ ॥
अहा हे कोण कैंची भ्रांती । ब्रह्मादि सद्‌गुरु सेविती ।
मज वाटे कृपामूर्ती । फळली नाहीं ॥ ७४ ॥
तुज बोधितों म्हणितलें । परी सेवेसी पात्र नाहीं केलें ।
तस्मात् मजसी ठविलें । सद्‌गुरुनाथें ॥ ७५ ॥
तरी मी बळें देउनि झडी । सेवा करीन आवडीं ।
गुरु कोपतांही न सोडीं । मेलियावीण ॥ ७६ ॥
गुरुसेवा हे सांडून । काय करावें कोरडे ज्ञान ।
यावीण कैंचे समाधान । दुसरें असे ॥ ७७ ॥
गुरुसेवा घडे ज्यासी । तोचि केवळ पुण्यराशी ।
ज्ञानभक्ति होती दासी । अनायासें ॥ ७८ ॥
काया वाचा आणि मन । सेवेसी केलें अर्पण ।
आतां माझें हें म्हणता आण । श्रीसद्‌गुरूची ॥ ७९ ॥
काया हे चरणदासी । करून लावीन सेवेसी ।
दिवस कीं नेणतां निशी । सावधान राखीन ॥ ७८० ॥
अरुणोदयापासून अस्ता । पुन्हां अरुणोदय मागुता ।
होंय तोंवरी सेवा करितां उमस नेदीं ॥ ८१ ॥
जेथें सद्‌गुरु दृष्टी पडे । देह धांवेल तयापुढें ।
गुरुमनीं जें जें आवडे । तें तें कोडें करीन ॥ ८२ ॥
मुखीं अमुक ऐसें म्हणतां । करीं हा उच्चार न होतां ।
त्या त्या पदार्थाआंतौता । जाऊन पडेन ॥ ८३ ॥
मीच दास दासी समग्र । पाककर्ता आणि महार ।
मीच असें हकालखोर । झाडेकर मळाचा ॥ ८४ ॥
प्रकार सेवेचा जितुका । एकलाचि करीन तितुका ।
साह्य न करींच अनेकां । विभागियांसी ॥ ८५ ॥
बहु काय बोलणें असे । क्षणही सेवेवीण न सोसे ।
अखंड मस्तकींच सौरसें । आज्ञा वाहीन प्रभूची ॥ ८६ ॥
देहाच्या पादुका सुंदर । गुरुचरणीं शोभती फार ।
केंस हे झाडिती केर । अंगणींचा ॥ ८७ ॥
देह शय्येचा पलंग । देह बैसावया चौरंग ।
देह हेचि सुरंग । चालती भूमि ॥ ८८ ॥
जेथें पडती रजःकण । तेथें माथा वोवडीन ।
गुरु जीवरी करिती स्नान । रंगशिला ती देह ॥ ८९ ॥
जया उदका श्रीगुरूचे । पादपद्म लागती सांचे ।
तेंचि तीर्थ स्नानपानाचें । येर ते अपवित्र ॥ ७९० ॥
बहु काय बोलूं पुढती । गुरुचरणीं देहा ची समाप्ती ।
जेथें रजःकणाची माती । तेथें रक्षा मिळेल ॥ ९१ ॥

हें असो मरणाउपरी । देखें कवण निर्धारीं ।
देह आहे जों तोंवरी । सेवाचि करूं ॥ ९२ ॥
काय करील गुरुसेवा । वाणी रंगेल गुरुनांवा ।
अंतःकरणामाजी ठेवा । गुरुमूर्तीचा ॥ ९३ ॥
जितुका देहांईल समुदाय । तितुकिया सेवाचि उपाय ।
गुरुसेवेपरतें काय । कोणा काज असे ॥ ९४ ॥
देह हेंचि दिच्=व्य देऊळ । हृदय तेंचि अंतरस्थळ ।
प्राण हे भूमि केवळ । उपप्राण चांदोवे ॥ ९५ ॥
मध्यें उंच सिंहासन । तें हें मुख्य अंतःकरण ।
मन बुद्धि चामरें दोन । जीव तो छत्र ॥ ९६ ॥
वित्त होय चोपदार । छडीदार अहंकार ।
बंदीजन गाती बडिवार । चारही वाचा ॥ ९७ ॥
वेदसारांश तांबुलाचा । मुखापासून द्रव त्याचा ।
श्रोत्रेंद्रियां येथींचा । पीकग्रहणाधिकार ॥ ९८ ॥
त्याचा ही घाली विंजणा । चक्षु हा आरिसा देखणा ।
जिव्हा लागलीसे पाना । चरणामृताच्या ॥ ९९ ॥
घ्राण होऊनियां भ्रमर । आमोद घेईल सत्वर ।
पाणींद्रियें राहती दूर । तयां रीग कैंचा ॥ ८०० ॥
तेव्हां होऊनि द्वारपाळ । संतोष पावे केवळ ।
पादेंद्रियें ईं सर्वकाळ । प्रदक्षिणा करिती ॥ १ ॥
सख्य करून जिव्हेचें । उच्छिष्ट पावे रसाचें ।
तेणें सुखें बाहेरी नाचे । उपस्थेंद्रिय ॥ २ ॥
पायूसी अधिकार थोर । सर्व झाडी तेथिंचा केर ।
पंचविषय जे सत्वर । पाहिजे तें पुरविती ॥ ३ ॥
कामासी आवडी भारी । गुरूचा झाला कामारी ।
सेवा चुके जो निर्धारीं । क्रोध त्यावरी योजिला ॥ ४ ॥
असो ऐसे सेवाधार । दिननिशी होती तत्पर ।
वैराग्य विवेक विचार । आले सत्वर धांवूनी ॥ ५ ॥
म्हणती आम्हां सद्‌गुरूची । अवडी मोठी सेवेची ।
कांहीं मुशारा न मागतांची । गुरुसन्निध राहूण् ॥ ६ ॥
मग धांवूनियां चित । हातीं धरूनियां त्वरित ।
गुरुचरणीं केलें रत । अखंड सदा ॥ ७ ॥
जे जे परमार्थी मिळाले । ते ते सेवाधिकारी केले ।
जें जयासी आवडलें । ते दिधलें तयासी ॥ ८ ॥
ऐसी सेवा पाहतां । आनंद झाला देवदत्ता ।
कांहीं खेदाची नसे वार्ता । जन्ममृत्यूची ॥ ९ ॥
धन्य धन्य सद्‌गुरुनाथा । मह स्वीकारिलें अनाथा ।
आतां प्रपंच कीं परमार्था । चाड नाहीं ॥ ८१० ॥
श्रोते ऐका सावधान । अंतरीं इतुकें झालेंमनन ।

देवदत्तें उघडिलें नयन । तों पुढें गुरुमूर्ति ॥ ११ ॥
मग धांवून चरण धरिले । नेत्रोदकेंचि क्षाळिले ।
अंतःकरण प्रेमें भरलें । उठावें न वाटे ॥ १२ ॥
शंकर मनीं विचारिती । धन्य हा अधिकारी म्हणती ।
परीक्षण एक पाहूं निश्चितीं । कौतुक याचें ॥ १३ ॥
म्हणोनि स्तब्ध राहिले । कांहीं न बोलती उगले ।
पुढें देवदत्तें काय केलें । ऐका सर्व सांगतों ॥ १४ ॥
वारंवार प्रदक्षिणा । पुन्हां घाली लोटांगणा ।
बद्धांजली सन्मुख जाणा । राहिला उभा ॥ १५ ॥
तों सद्गुरु न पाहती । देवदत्त दचकला चित्तीं ।
एकाएकी मस्तकीं शक्ती । पडली जैसी ॥ १६ ॥
कीं मेरु अंगीं कोसळला । किंवा भूमिकंप झाला ।
कीं सहस्र विजांचा पडिला । मेळा मस्तकीं ॥ १७ ॥
प्रळयसूर्य खडतरला । सहस्रावधि मेळा आला ।
अग्नि तया साह्य जाला । जाळूं लागला ब्रह्मांड ॥ १८ ॥
कोरडे झाले सप्तसमुद्र । सूर्यापरी तापला चंद्र ।
कीं अमृताचे पाझर । विषतुल्य झाले ॥ १९ ॥
तप्त पात्रीं फुटे लाही । तैसें चित्त चरफडी पाहीं ।
स्वेदपूर्व चालिले देहीं । थरथरां कांपे ॥ ८२० ॥
नेत्रीं पडली झांपडी । उष्णश्वास घाणें सोडी ।
अंतःकरणें झाली वेडीं । कांहीं न सुचे ॥ २१ ॥
मुद्गलप्रहारें मूर्छितासी । कांहीं न आठवे मानसीं ।
देवदत्ता दशा तैसी । कांहीं स्मरेना ॥ २२ ॥
पंचप्राण एकवटले । नाडीचे द्वार कोंडलें ।
देह काष्ठप्राय झालें । मडें जैसें ॥ २३ ॥
नव्हे स्वप्न नव्हे जागृती । नव्हे मूर्च्छा नव्हे सुषुप्ती ।
नव्हे मरणाची रीती । समाधिही नव्हे ॥ २४ ॥
हे कोण अवस्था म्हणावी । वर्णी ना कोणीही कवी ।
यास्तव अनिर्वाच्य जाणावी । दशा ऐसी ॥ २५ ॥
ऐशा झालिया घटिका दोन । कांहीं सावध जाला प्राण ।
तयासवें किंचित मन । उद्भवतें जालें ॥ २६ ॥
घाणीं दाटूनि आला श्वास । जिव्हेचा सर्व गेला रस ।
मस्तकीं झाली कुसमुस । न बोलवे ती ॥ २७ ॥
हस्तें हस्त रगडिले । म्हणे न कळे हें काय झालें ।
देह मरोनियां जन्मलें । कीं हें स्वप्न ॥ २८ ॥
काय झाले प्रयोजन । नेणों कोणतें आलें विघ्न ।
मग करें नेत्र पुसून । पाहिली मूर्ति ॥ २९ ॥
मग आठविलें चित्तीं । जे सद्गुरु कांहीं न बोलती ।
या हेतू ऐसी रीतीं । अवस्था जाली ॥ ८३० ॥

पुन्हां झाली कासाविसी । दुःखें तळमळी मानसीं ।
अहा सद्गुरूनें मजसी । कां उपेक्षिलें ॥ ३१ ॥
पाहतां सद्गुरुकृपेसी । मातेची उपमा कायसी ।
ऐसें असतां या समयासी । विपरीत जालें ॥ ३२ ॥
सहस्रअन्यायीं असतां । तयाही नुपेक्षी माता ।
आजिचा हा प्रसंग कोणता । न कळे मज ॥ ३३ ॥
चातकासी ओळला घन । तेथें सुटला प्रभंजन ।
मेघ जाती विरळून । तैसा हा अंतराय ॥ ३४ ॥
या भवानें अति गांजलों । सद्गुरूसी शरण आलों ।
गुरूनें उपेक्षितां मेलों । आतां कोण रक्षी ॥ ३५ ॥
हरि हर ज्यावरी रुसले । त्या गुरूनें संरक्षिले ।
गुरूनें जया अव्हेरिलें । तया त्राता कोण ॥ ३६ ॥
परी आतां प्रतिज्ञा ऐसी । सद्गुरु वरिलासे मानसी ।
जरी उपेक्षिलें मजसी । तरी पदसी न सोडीं ॥ ३७ ॥
जरी येथें न करिती कृपा । तरी देह कैंचा उरे बापा ।
कोण सोसी या संतापा । देहबुद्धीच्या ॥ ३८ ॥
काय मिळे प्राण सांडितां । ऐसें हें न कल्पीं चित्ता ।
गुरुविहरेंचि मागुता । पावेन मी जन्म ॥ ३९ ॥
कृपा नव्हे एकजन्मीं । तरी सप्त जन्में पावेन मी ।
धरीन गुरुचरण अंतर्यामीं । सहसा न सोडी ॥ ८४० ॥
कृपाघन जरी न ओळे । वांचती काय चातकेमेळे ।
तैसी काऊन प्रपंचफळें । देवदत्त वांचेना ॥ ४१ ॥
जीवनावेगळी मासोळी । वांचे जरी अन्य स्थळीं ।
गुरुकृपेंवीण मायामेळीं । देवदत्त वांचेना ॥ ४२ ॥
मी एकला जरी मरें । काय करतील हे सारे ।
परी उणें आलें साचारें । ब्रीदालागीं ॥ ४३ ॥
बडिवार गात होते वेद । ए व्यर्थचि झाले शब्द ।
तस्मात् जाणिजे अर्थवाद । हाही इतरांऐसा ॥ ४४ ॥
असो आमुचें काय गेलें । जन्मुअमृत्यूच आम्हां भले ।
परी ब्रीदावरी घातलें । बिंदुलें हातें ॥ ४५ ॥
ऐसे न करावें समर्था । कृपादृष्टीं पाहें अनाथा ।
कर ठेऊनियां माथां । कुरवाळी मुख ॥ ४६ ॥
हे सद्गुरु कृपापाणी । सत्य करा देववाणी ।
सर्व अन्याया क्षमापुनी । पाहीं दीनातें ॥ ४७ ॥
मग कंठ करोनि मोकळा । दीर्घस्वरें बाहता जाला ।
नेत्रद्वारें पूर चालिला । भूमापावेतों ॥ ४८ ॥
कौतुक आतां पाहसी काय । धांव धांव सद्गुरुमाय ।
वत्सालागी जैसी गाय । हूंबरून चाटी ॥ ४९ ॥
ऐसें देखोनि श्रीगुरु । सप्रेम दाटले न धरवे धीरु ।

मग उठूनि अति सत्वरु । कंठीं मिठी घालिती ॥ ८५० ॥
गुरुशिष्य एक झाले । सरितासागर मिळाले ।
कीं घटाकाश मेळविलें । महदाकाशीं ॥ ५१ ॥
मग शंकर नेत्र पुसिले । स्वकरें मुख कुरवाळिलें ।
मस्तक अवघ्राण केलें । थापटिली पाठी॥ ५२ ॥
अगा वत्सा परमसखया । कौतुक पाहिलें शिष्यराया ।
आम्हीं दुर्मिळ एकुलतिया । उपेक्षूं कैसें ॥ ५३ ॥
वृद्धपणीं विटाळ जातां । वंध्या जैसी प्रसवे सुता ।
तया कैसी अव्हेरी माता । निर्दयपणें ॥ ५४ ॥
तैसें घडलें आम्हांसी । आतां उपेक्षा ते कैसी ।
निर्भय असावें मानसीं । प्राणापैलीकडे तूं ॥ ५५ ॥
मग देवदतें केले नमन । सुखरूप झालें अंतःकरण ।
प्रेमे सद्‍गद नेत्रीं नीवन । कांहीं बोलवेना ॥ ५६ ॥
सद्‍गुरूंनी धरून हातीं । बैसविलें पूर्वरीतीं ।
हस्तें मुख कुरवाळिती । वारंवार ॥ ५७ ॥
आतां होईं सावधान । बोलिजेतें ब्रह्मज्ञान ।
तुझें कैसें भवबंधन । पाःऊं आतां ॥ ५८ ॥
तुज बोलिलें सदाचरण । तेणें झालें परोक्षज्ञान ।
अपरोक्षाची बाणे खूण । ऐसें आतां उपदेशूं ॥ ५९ ॥
मागें इतुकें निरूपिलें । तें तुवां मौनें श्रवण केलें ।
परी कांहीं नाहीं पुसिलें । मर्यादिस्तव ॥ ८६० ॥
आतां येथें भीड धरिसी । तरी मग कोणा पुसूं जासी ।
यास्तव आठवेल जो मानसीं । प्रश्न करी गा ॥ ६१ ॥
महाप्रसाद जो म्हणोनी । मस्तक ठेविला पुन्हां चरणीं ।
सरसावून बैसला श्रवणीं । बद्धांजली पुढें ॥ ६२ ॥
श्रीगुरु बोलती वचन । ऐक उपदेशाचे लक्षण ।
प्रस्तुत वैराग्य आणि ज्ञान । यांचि अवधि बोलूं ॥ ६३ ॥
सीमा ऐकें ज्ञानाची । तैसीच पूर्ण वैराग्याची ।
एका श्लोकीं दोहींची । स्थिती कैसी ॥ ६४ ॥

अभयं सर्वभूतानां ज्ञनमाहुर्मनिषिणः ।
निजानंदे स्पृहा नान्ये वैराग्यस्यावधिर्मतः ॥ १६ ॥

निर्भयता सर्व भूतांची । ज्ञाते बोलती हेंचि ।
अवधि जाणा वैराग्याची । ब्रह्मीं स्पृहा अन्य नसे ॥ ६५ ॥
भूत म्हणजे झालें । भ्रमेंकरून उद्‍भवलें ।
मायादि नामरूप जेतुलें । जीवेशांसह ॥ ६६ ॥
इतुक्यांचें असतां भय । तें ज्ञानही न होय ।
म्हणोनि बोलिजे निर्भय । ज्ञान तेंचि ॥ ६७ ॥

येथें कोणी मंदमती । एकाचें एक भाविती ।
देह अमर करूं म्हणती । योगाभ्यासें ॥ ६८ ॥
कूरजाती व्याघ्र सर्प । अथवा वायु अग्नि आप ।
अध्यात्मादि ताप देहा न व्हावे ॥ ६९ ॥
भूतमात्र जितुकें । तेणें देह नासूं न शके ।
तया बोलती कौतुकें ज्ञान ऐसें ॥ ८७० ॥
तरी ऐसें कदा न घडे । देह कधीं तरी पडे ।
काळाचे हातीं सापडे । तेव्हां निर्भय कैसा ॥ ७१ ॥
अरे हें जितुकें उत्पन्न । भय तया असे दारुण ।
तेथें देहाची गणती कोण । निर्भयत्वाची ॥ ७२ ॥
वायु चंद्र आणिअर्क । भयरूपचि असे पावक ।
मृत्यूसीही असे धाक । परमेश्वराचा ॥ ७३ ॥
माया अविद्या नासती । जीवेशही त्यासवें जाती ।
तेथें असे काळभीती । कल्पांतरूप ॥ ७४ ॥
जें जें दिसे भासे । शून्यासहित सर्व नासे ।
कालही भय वाहतसे । महाकाळाचें ॥ ७५ ॥
असो हें सर्व भयरूप । निर्भयत्व नसे अल्प ।
एक जाणिजे स्वस्वरूप । अद्वय जें कां ॥ ७६ ॥
तेंचि एक निर्भय । येर हें बोलणें काय ।
द्वैतीं अवश्य भय होय । बोलिली श्रुति ॥ ७७ ॥
बहु कासया बोलणें । ब्रह्म जाणे साधकपणें ।
तेंही निर्भय न होणें । भिन्नत्वामुळें ॥ ७८ ॥
यास्तव जो ब्रह्म अभिन्न । सांडूनियां धातृध्यान ।
होय निजांगें आपण । तेंचि ज्ञान निर्भय ॥ ७९ ॥
स्वयें अंगें ब्रह्म झाला । मग कोणाचें भय त्याला ।
सर्व नामरूप भ्रमाला । झालें अधिष्ठान ॥ ८८० ॥
सर्पें रज्जूच खादली । हे वार्ता नाहीं ऐकिली ।
तेवी ब्रह्मीं भीति नाहीं बोलिली । नामरूपाची ॥ ८१ ॥
तस्मात् निर्भय ब्रह्मरूप । तेंचि ज्ञात्याचें स्वरूप ।
सर्व भूतांतें आपेंआप । अभय जालें ॥ ८२ ॥
पूर्ण ज्ञाते ऐसें बोलती । हेचि ज्ञानाची चरम स्थिती ।
यावीण अन्य जें म्हणती । तें विपरीत ज्ञान ॥ ८३ ॥
ऐसी हे सीमा ज्ञानाची । तुज निरूपिली साची ।
आतां अवधि वैराग्याची । सावध ऐकावी ॥ ८४ ॥
नामरूप त्यागावें । अंगें ब्रह्मचि होआवें ।
स्वानुभवें तृप्ती पावावें । स्पृहा ऐसी ॥ ८५ ॥
निजानंदरूपाहूनी । जें जें दिसे भिन्नपणीं ।
तें तें मिथ्यात्वें मानीं । शुक्तिरजत जैसें ॥ ८६ ॥
करूनियां खपुष्पमाळा । कोण शोभे घालितां गळां ।

तैसा हा मायिक मेळा । येथें स्पृहा कैंची ॥ ८७ ॥
तस्मात् मायिकाचा त्याग । ब्रह्मरूप होय अंग ।
हेचि अवधि उमग । वैराग्याची ॥ ८८ ॥
विचारें सर्व त्यागिलें जेणें । त्यागितांही उरू न देणें ।
साधकही अभिन्न होणें । हेंचि वैराग्य ॥ ८९ ॥
ब्रह्मादितृणांत । अर्थात् होती मिथ्याभूत ।
मी पणाचा होता अंत । वैराग्य लाभे ॥ ८९० ॥
ऐसिया वैर्ग्यावीण । कदा न राहे ब्रह्मज्ञान ।
आणि पूर्ण नसतां ज्ञान । वैराग्यही नव्हे ॥ ९१ ॥
तस्मात् ज्ञान वैराग्य दोन्ही । एकमेकां साह्यपणीं ।
जैसे अंध पंगूं मिळोनी । मार्ग चालती ॥ ९२ ॥
ज्ञान पंगू वैराग्यावीण । वैराग्य अंध नसतां ज्ञान ।
एवं मिळती हीं जरी दोन । समाधान तेव्हां ॥ ९३ ॥
वैराग्यें नामरूप त्यागावें । ज्ञानें ब्रह्म तें जाणावें ।
पुढें द्वैत टाकून व्हावें । निजांगें ब्रह्म ॥ ९४ ॥
हें ऐकोनि देवदत्त । नम्रपणें प्रश्न करीत ।
जरी निजांगें ब्रह्म होत । तया लाभ दोहींचा ॥ ९५ ॥
तरी आतां जी सद्‌गुरु । सांगा उपाय कोणता करूं ।
निजांगें ब्रह्म निर्धारू । होईन कैसा ॥ ९६ ॥
गुरु म्हणती आधीं जाणावें । ब्रह्मज्ञान प्रांजल व्हावें ।
मग हळू हळू स्वभावें । होइजे अंगें ॥ ९७ ॥
ब्रह्मज्ञान होय कैसें । आक्षेपिसी जरी ऐसें ।
तरी श्रवणमननेंवींअ नसे । साधन दुसरें ॥ ९८ ॥
तेंचि कैसें श्रण मनन । आणि निदिध्यासाचें लक्षण ।
येणें श्लोकीं निरूपण । सावध ऐकें ॥ ९९ ॥

वेदांतैः श्रवणं कुर्यात् मननं चोपपत्तिभिः ।
योगेनाभ्यसनं नित्यं ततो दर्शनमात्मनः ॥ १७ ॥

वेदांतें करावें श्रवण । दृष्टांतयुक्तीनें व्हावें मनन ।
योगें नित्य निदिध्यासन । तेव्हां भेटी आपुली ॥ ९०० ॥
उपनिषद्‌भाव तो वेदांत । प्रत्यगात्मा ब्रह्म निश्चित ।
हाचि विषय निभ्रांत । प्रयोजन ऐकें ॥ १ ॥
वेदांत श्रवण जालिया । फळ काय म्हणसी शिष्यराया ।
जाणिलें असतां अद्वया । मोक्षप्राप्ती ॥ २ ॥
आपण तेंचि असतां ब्रह्म । नाथिला उद्‌भवला भ्रम ।
देहबुद्धीचा संभ्रम । या नांव बंध ॥ ३ ॥
आपण ब्रह्म हें निवळे । तुटती भ्रमाचीं पडळें ।
साधका स्वानंदसोहळे । मोक्ष तो हाचि ॥ ४ ॥

एवं भवबंधुदुःख जाय। स्वात्मसुखें तृप्ति होय।
हेंचि प्रयोजन उभय। वेदांताचें ॥ ५ ॥
साध्य साधक ध्येय ध्याता। अथवा जाणिजे ज्ञेय ज्ञाता।
हाचि संबंध तत्त्वतां। साधनरूप ॥ ६ ॥
ऐसिया वेदांताचा। कोण अधिकाराची येथींचा।
तो पूर्वीं बोलिला साचा। सदाचरणीं ॥ ७ ॥
एवं विषयप्रयोजन। संबंध अधिकारी पूर्ण।
हें चतुष्टय अनुबंधन। जेथें तो वेदांत ॥ ८ ॥
अथवा सहा चिन्हें आणिक। बोलिजेताती ऐक।
तयांसीच वेदांत एक। म्हणावें ऐसें ॥ ९ ॥
उपक्रम उपसंआर। तिजी फळश्रुति साचार।
दृष्टांत आणि प्रकार। अभ्यासाचा ॥ ९१० ॥
येर शास्त्रें सांडावीं। घटपटादि उठाठेवी।
वेदांतश्रवणींच असावी। आवडी बहु ॥ ११ ॥
ऐसें वेदांतश्रवण जरी। गुरुमुखें सर्वदा करी।
गुरुवांचून निर्धारीं। प्रतीती न बाणे ॥ १३ ॥
तया गुरूचें लक्षण। पुढें असे निरूपण।
परी कैसें करावें श्रवण। अवधारीं तें ॥ १४ ॥
हें ब्रह्म प्रत्यक्ष कळावें। नामरूप मिथ्या स्वभावें।
कांहीं जाणणें न उरावें या नांव श्रवण ॥ १५ ॥
पुढें मननावांचून। न होती संशय भग्न।
अनेक शास्त्रांचें वेवादन। म्हणोनियां ॥ १६ ॥
येथें दृष्टांत आणि युक्ती। साध्कां घडे मननप्राप्ती।
संशय अवघे मावळती। लाहे स्थिती आपुली ॥ १७ ॥
शास्त्रीं नाना रीतीं बोलिलें। प्रत्ययेंवीण अवघें फोलें।
तें तें त्यागून घेतलें। पाहिजे एक ॥ १८ ॥
अचाट बुद्धि खेळवावी। बळें मोक्षश्री वरावी।
सूक्ष्मविचारें समजावी। पूर्णस्थिति जे ॥ १९ ॥
संशय सर्व निमाले। द्वताचें भान विरालें।
मननाचें हें रूप झालें। दुसरें साधन ॥ ९२० ॥
हेंचि दृढ व्हावें चित्तीं। तरी अभ्यासीं योगरीती।
तिसरें साधन निश्चितीं। बोलिजेतें ॥ २१ ॥
ब्रहम्चि सत्य आपण। जग जीव मिथ्या संपूर्ण।
इतुकें सर्वदा अनुसंधान। स्मरणरूपें ॥ २२ ॥
स्मरण जेथून उद्‌भवतें। पुन्हां जेथें लया जातें।
निश्चय आपण तेंचि तें। अखंडता ऐसी ॥ २३ ॥
नको प्राणाची निरोधता। नको मनाची स्तब्धता।
दिसे भासे त्या त्या आंतौता। आपणचि वाटे ॥ २४ ॥
हाचि येथें योगाभ्यास। द्वैताचा नव्हे उमस।

पूर्णब्रह्म एकरस । तिसरें साधन ॥ २५ ॥
ऐसें श्रवण आणि मनन । तिसरें तें निद्दिध्यासन ।
दृढाभ्यासें स्वयें आपण । आपणा भेटे ॥ २६ ॥
स्मरतां न स्मरतां एक । आपण ब्रह्म निश्चयात्मक ।
साक्षात्काराचें कौतुक । ये रीतीं असे ॥ २७ ॥
सर्व एक मावळलें द्वैताद्वैतभान गेलें ।
परिपूर्ण ब्रह्म संचलेंम् । तिन्ही काळीं ॥ २८ ॥
ऐसा अंगें ब्रह्म झाला । संशय अवघाचि निमाला ।
मग विचारही राहिला । साधरूप ॥ २९ ॥
ऐसें हें गा परमार्थाचें । निरूपण झालें साधनाचें ।
याविरहित साधन कैंचें । असे दुसरें ॥ ९३० ॥
देवदत्त म्हणे जी श्रीगुरु । येथें साधन एक विचारु ।
श्रवणमननें साक्षात्कारु । घडे साधकां ॥ ३१ ॥
परी शब्दें परोक्षतीरीं । कळे ऐसी अनुभूती ।
अपरोक्षज्ञान कोणे रीतीं । शब्दें ब्रह्म होय ॥ ३२ ॥
मन वणी मुरडे जेथें । शब्दप्रवृत्ती कैसी तेथें ।
तरी सांगावें सद्गुरुनाथें अपरोक्ष कैसेनि ॥ ३३ ॥
तेव्हां बोलती श्रीशंकर । ऐक अपरोक्षाचा निर्धार ।
येणें श्लोकीं साचार । निरूपिजेल ॥ ३४ ॥

शब्दशक्तेरचिंत्यत्वात् शब्दादेवापरोक्षधीः ।
सुषुप्तः पुरुषो यद्वत् शब्देनैवानुबध्यते ॥ १८ ॥

शब्दाची अचिंत्य रचना । शब्देंचि पावे अपरोक्षज्ञाना ।
जैसा निजेला प्रुष जाणा । शब्दें जागा होय ॥ ३५ ॥
शब्दचि सृष्टीसी मूळ । नामरूपें निर्मी सकळ ।
तोचि तयासी होय काळ । ज्ञानोदयीं ॥ ३६ ॥
जेव्हां अज्ञान असे पाठीं । तेव्हां कल्पी जीवसृष्टी ।
ज्ञानाची फुटतां पांहटी । मिथ्यात्वें सर्वां विदारी ॥ ३७ ॥
तुवां पुसिलें शब्दें येणें । अपरोक्ष अंगें कैसें होणें ।
तरी ऐक सावधपणें बोलिजेतें ॥ ३८ ॥
अंगें अपरोक्ष आहे मुळीं । अज्ञानें झाली वेगळी ।
ब्रह्म नाहीं मुखकमळीं । न दिसे म्हणे ॥ ३९ ॥
दशम आपण विसरला । नवांतें मोजिता झाला ।
म्हणे दहावा नदींत मेला । कोठें न दिसे ॥ ९४० ॥
नाहीं न दिसे दोन्ही परी । हेंचि आवरण अंतरीं ।
दोन्ही प्रकारें संहारी । परोक्षापरोक्ष ॥ ४१ ॥
अस्ति ब्रह्म आहे दशन । हाचि परोक्षाचा उगम ।
तेणें नाहींपणाएं नाम । पुसून टाकिलें ॥ ४२ ॥

प्रत्यक्ष दशम ब्रह्म तूंचि । येणें सिद्धि अपरोक्षाची ।
न दिसे ऐसिया आवरणाची । हानि ते समयीं ॥ ४३ ॥
मुळीं ब्रह्मचि हा न होता । तरी शब्दब्रह्म करी केउता ।
भ्रमें आपणासी चुकतां । भ्रम जातां भेटे ॥ ४४ ॥
तस्मात् शब्दचि कारण यासी । परोक्षापरोक्षज्ञानासी ।
परी वाक्यें असती जैसीं । तैसेंचि होय ॥ ४५ ॥
ब्रह्म हें सच्चिदानंद । आहे ऐसा बोलतां शब्द ।
तेणें नव्हेचि अभेद । अपरोक्षज्ञान ॥ ४६ ॥
तूंचि ब्रह्म स्वयें अससी । महावाक्याची प्रवृत्ति ऐसी ।
गुरुमुखें ऐकतां आपैसी । अपरोक्षता बाणे ॥ ४७ ॥
जैसा कोणी निजेला नर । नाममात्र करितां उच्चार ।
जागा होय झडकर । शब्दें जैसा ॥ ४८ ॥
देवदत्ता ऐसें म्हणसी । नामाची दृढता पुरुषासी ।
ब्रह्मस्थिति कोठें तैसी । पूर्वानुभूत ॥ ४९ ॥
तरी ऐसें न कल्पावें । पूर्वानुभूतचि जाणावें ।
अहंब्रह्मस्फुरण स्वभावें । चाले परेपावेतों ॥ ५० ॥
पश्यंतीपासून वैखरी । कल्पिली देहबुद्धि दुसरी ।
अज्ञान नुरतां तिळभरी । सहज अपरोक्ष ॥ ५१ ॥
असो तुजला खरें खोटें । प्रस्तुत झालें एकवटें ।
तेणें तुजलागीं न भेटे । अपरोक्षज्ञान ॥ ५२ ॥
तरी अतां ऐकिजे । आत्मानात्म निवडिजे ।
तेणें विवेकें लाहिजे । अपरोक्षज्ञान ॥ ५३ ॥

आत्मानात्मविवेकेन ज्ञानं भवति निर्मलं ।
गुरुणा बोधितः शिष्यः शब्दब्रह्मातिवर्तते ॥ १९ ॥

आत्मानात्मविवेकें करून । तत्काळ होय निर्मळ ज्ञान ।
गुरूनें शिष्य बोधितां जाण । शब्द लंघून अर्थ पावे ॥ ५४ ॥
देवदत्ता हा साख्याचा । पूर्वांगचि वेदांताचा ।
विवेक वोलिजे तुज साचा । अवधान देई ॥ ५५ ॥
आत्मा काय अनात्मा काय । ऐसा विचार अंतरीं होय ।
तस्मात् हे ऐकावी सोय । ओळखी दोहोंची ॥ ५६ ॥
दिसतें भासतें कळून येतें । जड चंचळ विकारवंतें ।
मिथ्यात्वें सुखदुःख उमटतें । तें तें अनात्मा ॥ ५७ ॥
अनात्म्याचा निर्धार । तुज सांगितला साचार ।
इतुक्या चिन्हें जें गोचर । तें तें त्यागीं ये क्षणीं ॥ ५८ ॥
न दिसे न भासे न कळें जें । निर्विकारें सर्वां ओळखिजे ।
सदा सुखमात्र असिजे । तोचि आत्मा ॥ ५९ ॥
ऐसीं हीं चिन्हें बुद्धीनें समजून निश्चय करणें ।

तरी अनायासें पवणें । निर्मळ ज्ञाना ॥ ९६० ॥
जेथें किंचित् भेद नाहीं । तेंचि मिर्मल ज्ञान पाहीं ।
यावीण अपरोक्ष कांहीं । नसे दुसरें ॥ ६१ ॥
जया आत्मानात्मविवेक । तोचि अधिकारी एक ।
मागें बोलिलें रूपक । बहुधा याचें ॥ ६२ ॥
ऐसा जरी अधिकार । तरे पाहिजे गुरुशास्त्र ।
हें तिन्हीही होतां एकत्र । समाधान पावे ॥ ६३ ॥
सच्छास्त्र तो वेदांत । मागें बोलिला निश्चित ।
आतां ऐकें सावचित्त । गुरुलक्षणें कैसीं ॥ ६४ ॥
जो निजांगें ब्रह्म पूर्ण । अभंग जयाचें समाधान ।
स्वानुभवें तृप्ति गहन । तोचि सद्गुरु ॥ ६५ ॥
अकुंठित प्रबोधशक्ती । शब्दब्रह्मीं पर्पूर्ण गती ।
ऐसा सद्गुरु साधकांप्रती । बोधीं तत्क्षणी॥ ६६ ॥
निजांगेंही ब्रह्म असूनी । शब्दब्रह्मीं शक्ति उणी ।
तेणें नव्हे संशयधुणी । सच्छिष्याची ॥ ६७ ॥
प्रबोधशक्ति असे प्रबळ । अंगें ब्रह्म नव्हे निश्चळ ।
तेणें बोधें अनुभव केवळ । नुमटे सच्छिष्यीं ॥ ६८ ॥
चंद्र जो नेत्रें न देखे । तो कैसा दावील शाखे ।
आणि शाखेवीण दावूं न शके । चंद्र पाहतांही ॥ ६९ ॥
जेणें चंद्र पाहिला दृष्टीं ।तोचि शाखा दावी बोटीं ।
पाहणार तोही उठाउठीं । चंद्रमा देखे ॥ ९७० ॥
तैसें ब्रह्मज्ञान प्रांजळ । शब्दब्रह्म करतळामळ ।
तोचि सद्गुरु दयाळ । मेळवी परमार्था ॥ ७१ ॥
ऐसिया गुरूनें शिष्यासी । बोधिले असतां उपदेशीं ।
तत्क्षणी पावे निजार्थासी । शब्दशाखा टकूनि ॥ ७२ ॥
असो तुवां देवदत्ता । थोर आक्षेप केला होता ।
शब्दमात्रें लाभ केउता । त्याचें उत्तर दिधलें ॥ ७३ ॥
यास्तव गा शिष्यराया । उपदेशावीण साधन वायां ।
श्रवणमननादि उपाया । विचारें अपरोक्ष ॥ ७४ ॥
ऐसें ऐकोनि देवदत्त । साष्टांग घाली दंडवत ।
प्रदक्षिणा असे करीत । प्रेमभरित अंतरीं ॥ ७५ ॥
जोडोनियां उभयपाणी । बोलताहे सद्गद वाणी ।
जय जय सद्गुरो मोक्षदानी । करुणार्णवा ॥ ७६ ॥
मज वत्साची तूं गाय । मज लेकुराची माय ।
आतां कळवळून हृदय । प्रेमें पान्हा घालीं ॥ ७७ ॥
मजवरी कृपा करणें । मातेसी काय बाळ म्हणे ।
परी प्रेमाचें साजणें । माताचि जाणे ॥ ७८ ॥
तैसें म्यां काय बोलावें । हें सर्वज्ञा सर्व ठावें ।
अम्हां नेणतियांचे कणवे । धरिला अवतारु ॥ ७९ ॥

मज बोधावें पूर्ण ज्ञान। हें कैसें बोलावें वचन।
सद्‌गुरु दयाळ परिपूर्ण। इच्छिती करी करतील ॥ ९८० ॥
चातकें मुखचि पसरावें। हेंब पडती तितुकें घ्यावे।
तैसे म्यां अवध्यान द्यावे। वचनरहस्य ॥ ८१ ॥
हेही माझी प्रौढी नव्हे। मजसी अधिकार कोठें आहे।
परी कृपाळुवें लवलाहें। धरिलें हृदयीं ॥ ८२ ॥
आतां सद्‌गुरु जैसे ठेइती। तैसेंचि राहणें द्रुढमती।
ऐसें बोलोनियां पुढती। नमन केलें ॥ ८३ ॥
ऐसें देखोनि आचार्य। सप्रेम द्रवलें हृदय।
आतां वत्सा सावध होय। उपदेशक्रमीं ॥ ८४ ॥
तेरा श्लोकीं सदाचरण। जें ज्ञानियाचें समाधान।
तुज सांगितलें निरूपण। परोक्षरीतीं ॥ ८५ ॥
एक श्लोकीं साचार। ज्ञान वैराग्य निर्धार।
निरूपिलें अति सुंदर। परोक्षेंचि ॥ ८६ ॥
तेथोनियां श्लोक तेन। मुख्य ज्ञानाचें उपकरण।
गुरुशास्त्र विचार करणें। सच्छिष्यासी ॥ ८७ ॥
मागें आम्ही आश्वासिलें। तुजसी बोध करूं वहिलें।
तयाचें विस्मरण झालें। नाही आम्हां ॥ ८८ ॥
परी आतां एक करावें। जें जें आम्ही मुखें बोलावें।
तें तें तत्त्व अनुभवावें। प्रत्यक्ष पुढें ॥ ८९ ॥
सांडीं म्हणूं तें सांडावें। मिथ्या मिथ्यात्वें त्यागावें।
ऐसें नेतिमुखें समजावें। स्वरूप आपुलें ॥ ९९० ॥
तत्पद आणि त्वंपद। यांचा कैसा अनुवाद।
वाच्य टाकून् अभेद। लक्ष्यांशीं कैसा। ९१ ॥
यथाक्रमें हे बोलिजे। येथें अतिसावधान दीजे।
त्वंपदशोधनींच उमजे। सहज तत्पद ॥ ९२ ॥
यास्तव आधीं त्वंपदाचें तीन श्लोकीं निरूपण साचें।
बोधिल्या रीतीं बुद्धीचें। अनुसंधान असावें ॥ ९३ ॥
तुझा आम्ही हात धरूनी। पंथ चालिजे येथूनी।
तुजला तुझें अधिष्ठानीं। नेऊन घालूं ॥ ९४ ॥
जेथवरी मर्यादाभूमी। तेथवरी बोलिजे आम्हीं।
एकरूप होतां संगमीं। बोलणें कैचें ॥ ९५ ॥
परी न बोलतांही तुजसी। मेळविजे अखंडरसीं।
हे प्रतिज्ञाचि पाहें ऐसी। येचि क्षणीं गा ॥ ९६ ॥
तेथें आम्ही ढकलून देऊं। मग तुझा तूं जाणें अनुभवू।
त्याच क्षणीं उत्तीर्ण होऊं। तुझिया ऋणें ॥ ९७ ॥
देहद्वय आधां अवधारीं। तेथें असती कोश चारी।
ते ते विचरें त्याग करीं। मी नव्हे म्हणोनी ॥ ९८ ॥

न त्वं देहो नेन्द्रियाणि न प्राणो न मनो न धीः ।
विकारित्वात् विनाशित्वात् दृष्यत्वाच्च घटो यथा ॥ २० ॥

तू देह नव्हेसी दृश्य । इंद्रियें प्राण पावती नाश ।
विकारी मन बुद्धि नव्हेस । घटाचे परी ॥ ९९ ॥
ऐकें तुवा देवदत्ता । आपुलें निजरूप नेणतां ।
वाउगी कल्पिली अहंता । मी देह म्हणोनी ॥ १००० ॥
मागें आम्हीं बोलिलें । आत्मानात्म निवडिलें ।
पुन्हां संक्षेपें अवधारिलें । पाहिजे आतां ॥ १ ॥
जड दुःख नाशिवंत । तें तें जाण अनात्मजात ।
अस्तिभाति सदोदित । प्रियरूप आत्मा ॥ २ ॥
सच्चिदानंद जें ब्रह्म । तोंचि स्वयें आत्माराम ।
अस्तिभाति प्रिय परम । असे म्हणोनी ॥ ३ ॥
तेंचि कैसें ओळखावें । तेंही बोलिजेतें बरवें ।
तेणें रीतीं समजावें । आत्मस्वरूप ॥ ४ ॥
मी आहें ऐसें वाटे तुज । मी नाहीं म्हणतां लाज ।
ऐसें सर्वकांईं जें उमप । अस्तिरूप तें ॥ ५ ॥
जें सर्वदा जाणतें । पदार्थमात्रा प्रकाशितें ।
चिद्‌रूपचचि जाणावें तें । भातित्वपणें ॥ ६ ॥
सर्व पदार्थीं ज्याकरितां । आवडी उपजे चित्ता ।
त्या त्या पदार्थीं पाहतां । प्रियत्व कैंचें ॥ ७ ॥
तस्मात् अतिशय जें आवडे । तेंचि आत्म्याचें रूपडें ।
एवं हें बोलणें उघडें । अस्तिभातिप्रियत्व ॥ ८ ॥
तेंचि तुझें मुख्य रूप । येर हा अवघा आरोप ।
दिसे भासे नामरूप । रज्जुसर्पावरी ॥ ९ ॥
ऐसींचि सर्व तत्त्वें उमगें । मी मी तया म्हणसी उगें ।
त्यांमध्येंचि तूं असंगें । ओळखीं त्या ॥ १०१० ॥
मी आत्मा हा दृढनिश्चय । होतां नामरूपाचा क्षय ।
जडासी मी म्हणतां काय । अज्ञान याहुनी ॥ ११ ॥
स्थूल देह अस्थिमांसाचा । जन्मला हा रक्तरेताचा ।
त्यासी मी म्हणतां वाचा । लाज कां न वाटे ॥ १२ ॥
अस्थि त्वचा नाडी मांस । रोमादि भूमीचे अंश ।
मग आत्मा कैसा अविनाश । विचारीं मनीं ॥ १३ ॥
शुक्र शोणित लाळ । स्वेद मूत्रासी आप मूळ ।
हा आत्मा नव्हे केवळ । द्रवत्वरूपें ॥ १४ ॥
क्षुधा तृष्णा निद्र मैथुन । आलस्यादिकां तेज कारण ।
तें आत्मा नव्हे परिपूर्ण । विकार देहाचे ॥ १५ ॥
आकुंचन प्रसरण निरोधन । वायूचें हे चलनवलन ।
या विकारा आत्मा होणें । न घडे कधीं ॥ १६ ॥

काम क्रोध मोह भय । शोकासी आकाश कारण होय ।
हाचि आत्मा निःसंशय । म्हणती मूढ ॥ १७ ॥
एवं पंचभूतांचें निर्मित । मातापित्यांपासून होत ।
षड्विकार तेथें राहत । तो आत्मा कैसा ॥ १८ ॥
जन्मतो आहे वाढतो । तोचि तरुणत्व जरा पावतो ।
प्राण जातांचि नासतो । हा आत्मा अन्व्हे कधीं ॥ १९ ॥
नाशवंत आणि जड । स्वतां न चळे दगड ।
सदा हें दुःखाचें भांडें । आत्मा नव्हे ॥ १०२० ॥
जागृति अवस्था जडासी । स्वतंत्रता कोठें यासी ।
लिंगदेह मिळतां त्यासी । व्यवहार घडे ॥ २१ ॥
सूक्ष्मासी देहावीण । भोग प्राप्त नव्हे जाण ।
यास्तव स्थूलामाजी राहून । व्यवहार करी ॥ २२ ॥
तस्मात् अवस्था बुद्धीची । स्थूलासी अवस्था कैंची ।
जड दृश्य अन्नमयाची । ओळखी व्हावी ॥ २३ ॥
हस्तपादादि मस्तक । आणि इंद्रियांचे गोलक ।
या इतुकियांसी कौतुक । म्हणसी माझें ॥ २४ ॥
माझें माझें म्हणत असतां । तयासी मी म्हणसी केउता ।
विचारून पाहें पुरता । अंतर्यामीं ॥ २५ ॥
ऐसिया जडामाजी पाहें । तुझा आहेपणा आहे ।
त्यावरी उगेंचि दिसताहे । नामरूप ॥ २६ ॥
अगा सत्यपणावीण । नव्हे भ्रमासी दर्शन ।
ऐसें जें कां अधिष्ठान । तो तूं आत्मा ॥ २७ ॥
जडामध्यें आहेपण । तेंचि आत्मस्वरूप जाण ।
सूक्ष्मदृष्टीं अनुमान । पाहतां येतें ॥ २८ ॥
ऐसा आहेपणा तुजपुढें । आपेआपचि उघडे ।
प्रस्तुत देहाचें मडें । कळलें कीं तुज ॥ २९ ॥
घट जैसा दृष्टी पाहे । डोळा कधींच घट नव्हे ।
तैसा देह दृश्य दिसताहे । नव्हे आत्मा यास्तव ॥ १०३० ॥
तूं म्हणसी आत्मा कोण । देहासी कल्पिसी जडपणें ।
परी मी देह म्हणतां होणें । आरोप आत्म्यासी ॥ ३१ ॥
तस्मात् सांडीं देहबुद्धीसी । तूं आत्मा स्वयें अससी ।
आतां यासी मी म्हणसी । तरी आम्हां शब्द नाहीं ॥ ३२ ॥
तैसेंचि तूं नव्हेसी इंद्रिय । क्रियाशक्तींचा समुदाय ।
कांहीं ज्ञानशक्तिही होय । ज्ञानेंद्रियासी ॥ ३३ ॥
हेंही काय पंचभूतांचें । परी अंश हे रजसत्वाचे ।
द्वास असती निर्गमाचें । मनबुद्धीसीं ॥ ३४ ॥
वाचा अग्नि बोलणें । मातृकेचा उच्चार करणें ।
त्यासी आत्मा कोण म्हणे । विनशियासी ॥ ३५ ॥
उच्चार न होतां मनन । तेंचि मध्यमेचें लक्षण ।

मनन न होतां भासकपण । ते पश्यंती वाचा ॥ ३६ ॥
नव्हे भास नव्हे मनन । उगीच स्फुरे आठवण ।
तेचि परा हे ओळखण । परी ते तूं नव्हेसी ॥ ३७ ॥
पाणी इंद्र देणें घेणें । व्याआरती जडपणें ।
तेंचि तुझें रूप म्हणणें । नव्हे योग्य ॥ ३८ ॥
वामन पादाची क्रिया । गमन ऐसें ओळखीं तया ।
तेंचि तूं गा शिष्यराया । आत्मा नव्हेसी ॥ ३९ ॥
उपस्थेंद्रिय प्रजापति । घेतसे सुखाची रति ।
परी तो विकार स्वयंज्योति । आत्मा केवीं तूं ॥ १०४० ॥
यम गुदाधोद्वारीं । देहमळाचा विसर्ग करी ।
तो कैसा ओसी निर्विकारी । आत्मा तूं गा ॥ ४१ ॥
एवं कर्मेंद्रियें पांची । क्रियारूप ओळखी यांची ।
परी न कळे विषयरुची । व्यापारती जडत्वें ॥ ४२ ॥
आतां ज्ञानेंद्रियें जयां म्हणती । शब्दादिविषय घेती ।
हेही क्रिया परी जाणती । कांहींसें विषया ॥ ४३ ॥
श्रोत्र शब्दासी जाणे । परी अर्थ निवडूं नेणे ।
यास्तव ज्ञानक्रियालक्षणें । दोन्ही असती ॥ ४४ ॥
ऐसेंचि चारीं समजावें । ज्ञानक्रियात्मक ओळखावें ।
परी तें विनाशी स्वभावें । तूं आत्मा नव्हेसी ॥ ४५ ॥
श्रोत्र दिशा ऐकणें । वायु त्वचा स्पर्शणें ।
चक्षु सूर्य देखणें । नव्हे आत्मा ॥ ४६ ॥
जिव्हा वरुण रसस्वाद । अश्विनौदेव घ्रण गंध ।
हेंचि नव्हेसी निर्द्वंद्व । आत्मा तूं गा ॥ ४७ ॥
एवं दहाही विकार । होती जाती व्यापार ।
यांमध्यें तूं निर्विकार । अससी आत्मा ॥ ५१ ॥
त्यामध्यें जो आहेपणा । तोचि तूं आत्मा ऐसी खुणा ।
अधिष्ठानावीण कोणा- । वरी भास होय ॥ ४९ ॥
ज्ञानेंद्रियांमाजी कांहीं । चिद्रूपत्वें असे पाहीं ।
परी निःशेषचि नाहीं । कर्मेंद्रियांत ॥ १०५० ॥
एवं इंद्रियेंही दाही । अस्तिरूपत्वें आत्मा पाहीं ।
चिद्रूपचि असे कांहीं । तो तूं आत्मा ॥ ५१ ॥
येथें तुज सच्चिद्रूप । न कळे जरी त्याचें रूप ।
तरी पुढें आपेंआप । बुझसी तूं गा ॥ ५२ ॥
परी इंद्रियदेवता व्यापार । स्पष्ट कळला कीं विकार ।
यासी मी म्हणतां दूर । राहिला आत्मा ॥ ५३ ॥
तस्मात् हेंचि मी ऐसें । सांडीं गा अनात्मपिसें ।
जड दुःख आणी नासे । तें तेअम् तूं नव्हेसी ॥ ५४ ॥
स्थूल देह दृश्य जैसा । इंद्रियविकार जाणती तैसा ।
यासी किंचित्ही मी ऐसा । न म्हणे कधीं ॥ ५५ ॥

हें असो प्राण असतां । देहासी असे जीवत्वता ।
परी तेही जड केउता । आत्मा तूं होसी ॥ ५६ ॥
ऊर्ध्वगती जो चाले । प्राण नांव तया आले ।
परी त्यासी आत्मत्व कल्पिलें । विमूढजनीं ॥ ५७ ॥
अधोगमन अपानाचें ।व्यान सर्वांगीं नाचे ।
कंठी राहणें उदानाचें । समान नाभीं ॥ ५८ ॥
याचा जडत्वेंचि व्यापार । कांहीं न जाणई अणुमात्र ।
म्हणोनि बोलिले विकार । क्रियाशक्तीचा ॥ ५९ ॥
क्षुधा तृषा दोन्ही धर्म । तेणें पोषी इंद्रियग्राम ।
तो नव्हेचि आत्माराम । नासे म्हणोनी ॥ १०६० ॥
येथेंही सद्रूपें अससी । सर्पाधिष्ठान रज्जु जैसी ।
तो तूं आत्मा भ्रमासी प्रांअ ऐसे नाम ॥ ६१ ॥
परी या भ्रमातें जाणसी । यास्तव प्राण तूं नव्हेसी ।
तरी तूं आत्मा अविनाशी ।मीच प्राण हें त्यागीं ॥ ६२ ॥
करी संकल्प विकल्प । तेंचि मनाचें रूप ।
जगत्कल्पनेचा आरोप । जेणें केला ॥ ६३ ॥
मुख्य निर्विकल्पस्फुरण । जया नांव अंतःकरण ।
तयाचे भाग झाले दोन । मन बुद्धि नामें ॥ ६४ ॥
चित्तधर्म चिंतनात्मक । तेंही मनाचें रूपक ।
तेंचि आत्मा हें कौतुक । न घडे न घडे ॥ ६५ ॥
संकल्पें होय नव्हे करी । त्याचा अमुक निश्चय धरी ।
त्या वृत्तीसी निर्धारीं । बुद्धि तें नाम ॥ ६६ ॥
अमुक कार्य अगत्य करूं । अमुक हें हातीं न धरूं ।
ऐसें जाणिजे अहंकारू । बुद्धिवृत्तीचा ॥ ६७ ॥
मन बुद्धि चित्त अहंकार । व्यापारभेदें चत्वार ।
परी तीं दोनचि साचार । मन आणि बुद्धि ॥ ६८ ॥
हेंही कार्य भूतांचें । ज्ञानशक्ति सत्वगुणाचें ।
भोग साधन जीवात्मयाचें । चंचल विकारी ॥ ६९ ॥
आत्मप्रकाशावांचून । वृत्तीसी न घडे वर्तन ।
ज्ञानशक्तिया अभिधान । परी परप्रकाश ॥ १०७० ॥
बुद्धि मन ऐसीं दोन्ही । इंद्रियद्वारा निघोनी ।
कीजे विषयांचीं घेणीं । भोग जीवात्मया ॥ ७१ ॥
एवं ऐसी उभयवृत्ती । यासी अंतःकरण म्हणती ।
उद्भव आणि समाप्ती । असे यासी ॥ ७२ ॥
पाणियावरी तरंग । कीं आकाशी मेघ ।
विकाररूपचि असंग । आत्मा कैसा ॥७३ ॥
शोक मोह लज्जा भय । कामक्रोधादि अपाय ।
इत्यादि हा समुदाय । बुद्धिवृत्तीचा ॥ ७४ ॥
ऐसिया वृत्तीमाजी जाण । तुज आत्म्यासी व्याप्ती पूर्ण ।

सद्रूप चिद्रूप दोन । लक्षणें ओळखीं ॥ ७५ ॥
तरंगीं जैसें पाणी । वर्तताहे अखंडपणीं ।
तेवीं तूं या अंतःकरणीं । अस्तित्वें अससी ॥ ७६ ॥
तुझिया प्रकाशामुळें । वृत्तीलागी ज्ञान कळें ।
भोगिती विषयसोहळे । तेंचि चिद्रूप ॥ ७७ ॥
परी आनंद आच्छादिला । अन्यथा विकार झाला ।
सुखदुःखें शीण केला । म्हणोनियां ॥ ७८ ॥
प्रकाश आणि दाहकता । हीं तेजाचीं रूपें तत्त्वता ।
परी चंद्रमंडळीं पाहतां । प्रकाश असे ॥ ७९ ॥
शीतळ उपाधीमुळें । दाहकता हे मावळे ।
तेवीं आनंदरूप झांकोळे । वृत्तीमाजी ॥ १०८० ॥
तस्मात् सच्चिद्रूपासी । विकारामाजीं ओळखीं त्यासी ।
असज्जडदुःखात्मकासी । सांडीं परतें ॥ ८१ ॥
सांडीं म्हणतां भाविसी आन । कीं निःशेष काढावें खांदून ।
तरी ऐसें मव्हे ओळखून । मी म्हणणें सांडीं ॥ ८२ ॥
एवं देह इंद्रिय प्राण । आणि मन बुद्धि दोन ।
हें सर्व विकारी दृश्य म्हणून । आत्मा नव्हे ॥ ८३ ॥
जें असत् जड दुःखरूप । तें तें मिथ्या भ्रमरूप ।
अस्तिभातिप्रियरूप । जाणिज आत्मा ॥ ८४ ॥
स्थूल देह अन्नमय । कोश ऐसी संज्ञा होय ।
प्राण आणि कर्मेंद्रिय । प्राणमय कोश ॥ ८५ ॥
ज्ञानेंद्रिय एज मन । मनोमय कोशाचें लक्षण ।
बुद्धिज्ञानेंद्रिय मिळून् ।विज्ञानकोश ॥ ८६ ॥
प्राणमय मनोमय । विज्ञानमय कोशत्रय ।
सप्तदश शब्दांचा समुदाय । लिंगदेह बोलिजे ॥ ८७ ॥
स्थूल जड आत्मा नव्हे । सूक्ष्मीं नाना विकार पाहें ।
याचें रूप सकल आहे । असज्जड दुःखरूप ॥ ८८ ॥
आतां दोन्हींच्या अवस्था । जागृतिस्वप्न व्यवस्था ।
बोलिजे तयांची संख्या । यथाक्रमेंचि ॥ ८९ ॥
अंतःकरणवृत्ती प्राणाधारें ।श्रोत्रादि इंद्रियद्वारें ।
निघोनि होती विषयाकारें शब्दस्पर्शादि ॥ १०९० ॥
याचि नांवें जागृती । सुखदुःखें जीवास होती ।
आता स्वप्नावस्थेची स्थिती । सावध ऐकें ॥ ९१ ॥
इंद्रियांवीण बुद्धिवृत्ती । शब्दादिविषय कल्पिती ।
तेणें सुखदुःखें उमटती । अंतर्यामीं ॥ ९२ ॥
हा संस्कार जागृतीचा । संकल्परूप व्यवहार याचा ।
स्वप्नावस्था बोलिजे वाचा । तयालागीं ॥ ९३ ॥
जागृतीचें नेत्रस्थान । म्हणजें सर्वांगीं असे वर्तणें ।
नेत्र एक उपलक्षण । बोलिलें असे ॥ ९४ ॥

स्वप्नाचें कंठीं बिढार । संकल्परूप जो विकार ।
आतां दोहींचे साचार । बोलिजे अभिमानी ॥ ९५ ॥
अंतःकरणीं प्रतिबिंबलें । तयासी जीवनाम आलें ।
तेंचि तदाकार झालें अभिमानरूपें ॥ ९६ ॥
मी देह माझें स्वजन । मी उत्तमकुलीं उत्पन्न ।
जातिआश्रमादिवर्ण । मज असती ॥ ९७ ॥
ऐसा जो अभिमान धरी । तो विश्वाभिमानीं निर्धारीं ।
मी कर्ता भोक्ता अंतरीं । अभिमान तैजस ॥ ९८ ॥
मी सुखी दुःखी पापी । मी पुण्यात्मा प्रतापी ।
ऐसियाही संकल्पीं । बोलिजे तैजस ॥ ९९ ॥
स्थूल देह मात्र अकार । सूक्ष्म तोचि उकार ।
उभयरूपें प्रणवाक्षर । विभागलें दो ठायीं ॥ ११०० ॥
विषय प्रत्यक्ष जैं भेटती । दृश्यत्वें इंद्रियांसी प्राप्ती ।
तेव्हां सुखदुःखें जीवा होती । स्थूल भोग या नांवें ॥ १ ॥
बुद्धिवृत्तीनेण् आठवितां । विषय भासे आंतौता ।
सुखदुःख उठे चित्ता । हा प्रविविक्त भोग ॥ २ ॥
स्थूल सूक्ष्म जागृति स्वप्न । नेत्र कंठी दोन्ही स्थाने ।
विश्व तैजस अभिमान । आत्मा तूं नव्हेसी ॥ ३ ॥
अकार उकार मात्राद्वय । स्थूल प्रविविक्त भोग होय ।
समजावें हें अज्ञानकार्य । आत्मा अन्व्हेसी ॥ ४ ॥
अगा देवदत्ता इतुकें । निरूपिलें तुज निकें ।
अंतरीं काळलें असे जितुकें । तें बोलोनि दाखवीं ॥ ५ ॥
देवदत्तें करोनि नमन । बोलताहे नम्र वचन ।
अस्तिभातिप्रिय पूर्ण । लक्षण आत्म्याचें ॥ ६ ॥
असज्जड दुःखरूप हें अनात्म्याचें स्वरूप ।
साही लक्षणामाजी अल्प । कळलें तें निवेदूं ॥ ७ ॥
उद्भवें तितुकें नासते । यास्तव असत् मनीं वाटतें ।
परप्रकाशें वर्ततें । म्हणोनि जड ॥ ८ ॥
सुखदुःखें शीण पावे । दुःखरूपचि या नांवें ।
हे अनात्मजात आघवें । कळलें ऐसें ॥ ९ ॥
सत्य अधिष्ठानावीण । भ्रमसी नव्हे दिसणें ।
सर्वदा आहे जो पूर्ण । तद्रूप आत्मा ॥ १११० ॥
सर्व वृत्तींचा जाणता । हा चिद्रूप आत्मा तत्त्वतां ।
परी आनंद नेणें मी कोणता । सप्रतीत ॥ ११ ॥
शंकर म्हणती शिष्यराया । अनुमानें बोलसी वायां ।
यथार्थ बोलिल्या न्याया । तुज नाहीं कळलें कीं ॥ १२ ॥
प्रत्यक्षासी अनुमान । तया म्हणूं न ये ज्ञान ।
आतां होईल सावधान । सप्रतीत बोलूं ॥ १३ ॥
मृत्तिका जया क्षणीं कळे । तत्क्षणीं घटबुद्धि मावळे ।

घटबुद्धि जातां निवळे । मृत्तिका एक ॥ १४ ॥
तैसा अस्तिभातिप्रिय । आत्म्याचा होतां निश्चय ।
असज्जाद दुःख जाय । तत्क्षणींचि ॥ १५ ॥
असज्जड दुःख जयासी । सानुभवें कळे मानसीं ।
अस्तिभातिप्रियरूपासी । प्रगटता आयती ॥ १६ ॥
तस्मात् तुज नाहीं कळलें । म्हणून पाहिजे बोलिलें ।
नामरूप जितुकें झालें । भ्रमें अस्तित्वावरी ॥ १७ ॥
मृत्तिकेवीण घटासी । सांगें रूप आकारासी ।
आंत बाहेर मृत्तिका जैसी । विलसत असे ॥ १८ ॥
तंतूमाजी कापुसावीण । कोणतें होतसे भान ।
तैसे देहे प्राण बुद्धि मन । यांस रूप काय ॥ १९ ॥
सद्रूप तरी दिसेना । परी त्यावीण हे भासेना ।
भासासी मूळ कल्पना । परी तें झालेंचि नाहीं ॥ ११२० ॥
जें मुळींचि झालें नाहीं । रज्जूवरील जैसा अही ।
आहे तें स्वरूपचि पाहीं अस्तिस्वरूप ॥ २१ ॥
देवदत्त म्हणे महाराजा । सद्रूप होय जी ओजा ।
एकरूप भाव दुजा । झालाचि नाहीं ॥ २२ ॥
जें सर्वदा अखंड असे । आदिअंतीं एकरसें ।
आहे नाहीं दोन्ही ऐसें । बोलतां न ये ॥ २३ ॥
आचार्य म्हणती गा खरें । सद्रूप बाणलें निर्धारें ।
मिथ्या मिथ्यत्वें सारें गेलें नामरूप ॥ २४ ॥
परी चिद्रूप आणि आनंद । कळला पाहिजे निर्द्वंद्व ।
तरी ऐकावा संवाद । पुढील श्लिकींचा ॥ २५ ॥

विशुद्धं केवलं ज्ञानं निर्विशेषं निरंजनम् ।
यदेकं परमानंदं तत्त्वमस्यद्वयं परम् ॥ २१ ॥

विशुद्ध केवल ज्ञानघन । निर्विशेष जो निरंजन ।
एकचि परमानंद पूर्ण । तें तूं अससी अद्वय ॥ २६ ॥
देवदत्ता पूर्वश्लोकीं । निरूपण केलें कौतुकीं ।
देहद्वय आत्मा नव्हे कीं अस्तिभातिरूप ॥ २७ ॥
अस्तित्व बाणलें तुज । चिदानंदीं नव्हे उमज ।
चिद्रूप कळलें म्हणसी मज । परी तें सविशेष ॥ २८ ॥
साखर गोडी एक जैसी । वाटली अविचारबुद्धीसी ।
वृत्ती आणि ज्ञानरूपासी । एकत्र केलें ॥ २९ ॥
साखरेवेगळी गोडी । रसास्वादनीं निवडी ।
तैसें वृत्तीमधून काढीं । स्वानुभवें ज्ञान ॥ ११३० ॥
शब्दामाजी शब्दाकार । तैसेचि स्पर्शादि प्रकार ।
त्या त्या सारिखें साचार । ज्ञान झालें वाटे ॥ ३१ ॥

शब्द स्पर्श टाकावे । रूपरसादि त्यागावे ।
नुसतें ज्ञान अनुभवावें । विशुद्ध जें कां ॥ ३२ ॥
तैसाचि मनाचा संकल्प । सांडावें बुद्धीचें रूप ।
उरे जें कां स्वस्वरूप । ज्ञप्तिमात्र जाणावें ॥ ३३ ॥
चित्त चित्ताचा व्यापार ।मिथ्यात्वें त्यजावा अहंकार ।
उरें जें कां ज्ञानमात्र । तोचि आत्मा चिद्रूप ॥ ३४ ॥
विकारवृत्ति झाली जरी । तरीं ते ज्ञान निर्विकारी ।
या हेतू पदांमाझारी । निर्विशेष बोलिलें ॥ ३५ ॥
ऐसें जें पूर्णज्ञान । व्यापून अवस्था तीन ।
परी तया विकारा भिन्न । निर्विशेषत्वें ॥ ३६ ॥
साक्षित्वें जाणें जागृती । जाणे विषयमात्राप्रती ।
तैसीचि स्वप्नाची प्रतीती । त्याचि ज्ञानें होय ॥ ३७ ॥
शब्द जेणें ओळखिला । स्पर्शादि प्रत्यय होय त्याला ।
विषयभेद मात्र झाला । परी ज्ञान अभेद ॥ ३८ ॥
तेणेंचि रीतीं स्वप्नातें । साक्षित्वें जाणे भासातें ।
अवस्थाभेद परी ज्ञान तें । दुसरें नाहीं ॥ ३९ ॥
तेंचि सुषुप्तीतें जाणे । आपुलेनि सर्वज्ञपणें ।
परी ज्ञानासी भेद होणें । न घडे कधीं ॥ ११४० ॥
ऐसें बुद्धिवृत्तीवीण । जें कां असे विशुद्ध ज्ञान ।
तें प्रत्यक्ष अनुभवून । बोलें मजसी ॥ ४१ ॥
देवदत्त तेव्हां विचारी । ज्ञानें दिसती ही सारीं ।
आणि साक्षिही तयामाझारी । अनुभवा येतो ॥ ४२ ॥
परी वृत्तीवीण जें वेगळें । तें तों बुद्धीसी न कळे ।
जाणूं जातां तया बळें । उफाळे विकार ॥ ४३ ॥
तरी आतां जी सद्गुरु । येथें न सुचे विचारु ।
केवळ ज्ञानाचा निर्धारु । मज बाणवावा ॥ ४४ ॥
ऐकें देवदत्ता तुजसी । वृत्ति कळताहे आपैसी ।
परी मी नेणें आपणासी । म्हणसी तें अज्ञान ॥ ४५ ॥
तेंचि अज्ञान जैं फिटे । तरीच आपण आपणा भेटे ।
वृत्तिज्ञानही सर्व आटे । तत्क्षणींचि ॥ ४६ ॥
नसतां देहद्वय नामरूप । भासूं लागलें भ्रमरूप ।
यासी कारण स्वस्वरूप । न कळे तें अज्ञान ॥ ४७ ॥
हा कारणदेह तिसरा । सर्प जैसा नेणतां दोरा ।
परी देहद्वयाचा उभारा । येथूनि झाला ॥ ४८ ॥
ज्ञानघन स्वप्रकाश । असून नेणे आपणास ।
हाचि आनंदमय कोश । बोलिजे पांचवा ॥ ४९ ॥
येहील अवस्था सुषुप्ती । जेहें वृत्तीची समाप्ती ।
नव्हे स्वप्न ना जागृती । नेणीवदशा जे ॥ ११५० ॥
जागृतिस्वप्नीं वृत्तीसी । श्रम होती अतिशयेसीं ।

तेव्हां येतसे विश्रांतीसी । आनंदामाजी ॥ ५१ ॥
ऐसी वृत्ती लीन झाली । ते सुषुप्ति नाम पावली ।
तेचि अवस्था कल्पिली । हृदयस्थानीं ॥ ५२ ॥
मकारमात्रा प्रणवाची । अज्ञानरूप बोलिजे साची ।
तेथें प्राज्ञ अभिमानाची । प्रौढी असे ॥ ५३ ॥
तया अज्ञाना जाणतां असून कल्पिली अहंता ।
बळेंचि होय नेणता । प्राज्ञ तोचि ॥ ५४ ॥
कांहीं नसतां विकार । अनुभवीतसे सुखमात्र ।
तयासीच नाम साचार । आनंदभोग ॥ ५५ ॥
असो अज्ञानसुषुप्तिस्थान । मकरमात्रा प्राज्ञाभिमान ।
आनंदबोगही नेणपण । आत्मा नव्हेचि ॥ ५६ ॥
तया अज्ञानातें जाणे । तरी तेंचि आत्मा केवीं म्हणे ।
नेणिवेमाजी ज्ञानलक्षणें । कैसीं तें बोलूं ॥ ५७ ॥
ज्या क्षणीं वृत्ति उमटे । तेव्हां साक्षित्वें ज्ञान भेटे ।
जेधवां वृत्ति ओहटे । तेव्हांही जाणें ॥ ५८ ॥
वृत्तीचा अंत अनुभविला । तो वृत्ति उद्भवतां कळला ।
लय अमुक वेळ झाला । आठवीं ज्ञानें ॥ ५९ ॥
लयकाळीं अनुभव नसे । तरी वृत्तिकाळीं ज्ञान कैसें ।
यास्तव जाणता अखंड असे । तिन्ही काळीं ॥ ११६० ॥
वृत्तिपूर्वीं ज्ञानरूप । अखंड असे अमूप ।
उद्भवकाळीं आपेंआप । वृत्तीसी जाणे ॥ ६१ ॥
जेव्हां वृत्ति निमाली । त्या क्षणीं ज्ञप्ति उरली । ए
वं तिन्ही काळीं संचली । चित्प्रभा एक ॥ ६२ ॥
ऐसिया गा ज्ञानासी । अज्ञान वृथा आरोपिसी ।
हे भ्रांति सांडीं वेगेंसीं । ज्ञानमात्रचि तूं ॥ ६३ ॥
जो कां वृत्तीसी जाणे । तोचि आत्मा ओळखणें ।
परी वृत्तिविकार त्यागणें । वृत्ति असतांचि ॥ ६४ ॥
साखर सांडून गोडी घ्यावी । तैसी ज्ञानप्रभा ळखावी ।
वृत्तीवीण ही जाणावी । ज्ञप्ति आपुली ॥ ६५ ॥
बहु कासया बोलणें । आत्मा अज्ञान कधीं न होणें ।
सर्वदा ज्ञानघन ओळखणें । चिद्रूप आत्मा ॥ ६६ ॥
होय जी म्हणे देवदत । ज्ञानरूप सदोदित ।
आदि अंत अवलोकित । निजात्मप्रभें ॥ ६७ ॥
तस्मात् तिन्ही काळीं एक ज्ञान । जें सर्वदा अखंड पूर्ण ।
परी सद्रूपही ज्ञानाहून । वेगळें कोठें ॥ ६८ ॥
आहेपण तेंचि ज्ञान । ज्ञान तेंचि अखंडपण ।
ऐसें ऐकतांचि वचन । सुखावती गुरु ॥ ६९ ॥
भला प्रतीति पावसी । तेणें संतोष आम्हांसी ।
आतां ऐकें आनंदासी । सच्चित् कळलें ॥ ११७० ॥

देहबुद्धी होतां दृढ । स्वसुखासी लावूनि कवाड ।
नानाविषयांचे काबाड । आवडती मनीं ॥ ७१ ॥
तृणापासून विरिंची- । पदापावेतों विषयरुची ।
अधिकाधिक वाढे साची । परी कृत्रिमरूप ॥ ७२ ॥
जे जे पदार्थ आवडती । जयाकरितां इच्छी प्राप्ती ।
तो तरी आवडता किती । म्हणोनियां बोलावा ॥ ७३ ॥
जैसा आपण आवडता । तेवीं नावडती माता पिता ।
पुत्र कन्या स्वजन कांता । नावडती ऐसे ॥ ७४ ॥
द्रव्य पशु राज्यभोग । देव वेद सुख स्वर्ग ।
गुरु शिष्य आवडती सांग । परी आपणाऐसे नाहीं ॥ ७५ ॥
देह इंद्रियें प्राण मन । बुद्धि आणि अंतःकरण ।
आवडला जैसा आपण । तैसें हें सर्व नव्हे ॥ ७६ ॥
ही सर्व जनां प्रतीती । असतांही ऐसें नेणती ।
बळेंचि अन्यत्वीं धांवती । सुख असे म्हणोनी ॥ ७७ ॥
तस्मात् आत्मा आअडता । तोचि सुखरूप तत्त्वतां ।
मी सुखी दुःखी हे वार्ता । वाटे विकारामुळें ॥ ७८ ॥
तो वृत्तिविकार निमे जेव्हां । स्वसुख प्रगट असे तेव्हां ।
सुषुप्तीमाजी सर्व जीवां । वृत्तीवीण आनंद ॥ ७९ ॥
अत्यंत आधि अथवा व्याधी । वृत्ति तोंवरी दुःखें बाधी ।
सुषुप्तीमाजी कोणें कधीं । पाहिलें सुखदुःख ॥ ११८० ॥
तस्मात् सुखरूप सुषुप्ती । सर्व सुखदुःखाची समाप्ती ।
अखंड सुखमात्र अनुभूती । स्वात्मसुखाची ॥ ८१ ॥
जेधवां स्वप्न जागृती । उल्लंघूनि जातां वृत्ती ।
आरंभीं सुखाकार होती । तो वासनानंद ॥ ८२ ॥
तेही वासना जेहें विरे । सुखमात्रचि तेथें उरे ।
परी सुखानुभव स्फुरे । आपुला आपण ॥ ८३ ॥
तेथें जरी न अनुभवितें । तरी उत्थानीं आठवितें ।
अनुभविल्यावीण विषयांएं । स्मरूं शकेना ॥ ८४ ॥
एवं वृत्तीवीण आनंदघन । स्वानुभीति तेंचि ज्ञान ।
सर्वदा असे परिपूर्ण । सद्रूपही तेंचि ॥ ८५ ॥
सत् सर्वत्रीं व्यापलें । अंतःकरणीं ज्ञान स्फुरलें ।
सुषुप्तिकाळीं तीन्ही संचले । सच्चिदानंद ॥ ८६ ॥
सच्चिद्रूपासी आच्छादन । करूं न शकेचि अज्ञान ।
व्यवहार नव्हे तयावीण । मायादिजगाचा ॥ ८७ ॥
सत् आच्छादी जरी भ्रम । तरी कोठें उद्भवे रूप नाम ।
चिद्रूप आच्छादितां धर्म । ज्ञानक्रिया कैंची ॥ ८८ ॥
आनंदमात्र विकारांत । आच्छादिल्यापरी वाटत ।
तोही सुषुप्तीमाजी प्रगटत । अनायासें ॥ ८९ ॥
एवं आत्मा सच्चिदानंद । सुषुप्तीमाजी निर्द्वंद्व ।

असज्जड दुःख खेद । किमपि असेना ॥ ११९० ॥
जो सर्वदा आहेच आहे । तो कदाही असत् नव्हे ।
सुखानुभव जाणताहे । तरी नव्हे जडरूप ॥ ९१ ॥
आनंदरूपचि असतां । तरी सुखदुःख कोठें वार्ता ।
एवं सुषुप्तिकाळीं तत्त्वता । द्वैतचि नाहीं ॥ ९२ ॥
अज्ञान नांव जें आलें । ज्ञानें जाणतां व्यर्थ गेलें ।
एवं जडदुःख नाथिलें । सुषुप्तिकाळीं ॥ ९३ ॥
असो तुज सच्चिद्रूप । कळलें तयाचें स्वरूप ।
आनंदाचें माप । पदरीं घेईं ॥ ९४ ॥
वृत्तीसी न कळे म्हणसी । कैसें जाणावें सुखासी ।
तरी अवधारीं मानसीं । एकाग्रपणें ॥ ९५ ॥
जैसें वृत्तीवीण ज्ञान । स्वप्रकाशें परिपूर्ण ।
तैसा हाही अनुभवावीण । आनंद ओळखीं ॥ ९६ ॥
मागें आम्हीं सदाचरणीं । संध्येचिये निरूपणीं ।
संधि साधिल्या मध्यस्थानीं । उद्भव लयाच्या ॥ ९७ ॥
हाचि वासनानंद जाण । जागृतिसुषुप्तींचें मध्यस्थान ।
तोचि विचारें पाहतां शोधून । जागरींही कळे ॥ ९८ ॥
वृत्तितरंग सांडावा । दुजा उद्भवचि न व्हावा ।
तत्क्षणीं पावे स्वानुभवा । निजात्मसुखाचे ॥ ९९ ॥
उदासवृत्ती सुख उमटे । ध्येयध्यानरूपें भेटे ।
परी तेंही सुख ओहटे । वृत्ति निमतां ॥ १२ ॥
तस्मात् अनुभविती यावीण । अनुभाव्यरूप सुख पूर्ण ।
येणें विचारेंचि अभिन्न । होय देवदत्ता ॥ १ ॥
ऐसा सच्चिदानंदघन । केवळ निर्विशेष पूर्ण ।
विशुद्ध एक दंडायमान । कळला कीं तुज ॥ २ ॥
पर निरंजन पदें दोन । हेंचि ऐकें सावधान ।
मायादिकांचें अधिष्ठान । परब्रह्म जें कां ॥ ३ ॥
उत्पत्तिपूर्वी जें आहे । तेंचि कार्यामध्यें पाहें ।
प्रलयकालीं संचलें राहे । ज्ञानाज्ञानावीण ॥ ४ ॥
ऐसा जो कां परमात्मा । तोचि तूं हा प्रत्यगात्मा ।
अद्वयपदें अभेदवर्मा । कळलें पाहिजे ॥ ५ ॥
एतदर्थ महावाक्यप्रवृत्ती । अभेदीं दृढ व्यावी मती ।
तस्मात् तेंचि तूं गा चिन्मूर्ती । अससी ब्रह्म ॥ ६ ॥
साक्षिमात्र प्रज्ञानघन । ब्रह्म सर्वां अधिष्ठान ।
मीचि एक परिपूर्ण । बाणो तुजप्रति ॥ ७ ॥
अहंशब्दें जें स्फुरण । एंचि ब्रह्म कीं आपण ।
ऐसी हे प्रतीति गहन । बाणो तुजप्रति ॥ ८ ॥
हा आत्मा स्वप्रकाश । अपरोक्ष ब्रह्म अविनाश ।
परिपूर्ण अखंडैकरस । बाणो तुजप्रति ॥ ९ ॥

हे शब्द शाखा तुज दाविली । स्वानुभवचंद्रीं दृष्टी घालीं ।
तो तूं कैसा अमुक खोली । बोलतां न ये ॥ १२१० ॥
यास्तव बोलणें खुंटलें । निरूपण समाप्त झालें ।
पुढें काय जें उरलें । तेम् चिन्मात्र तूंचि ॥ ११ ॥
ऐसी ऐकतां वचनोक्ती । लागली नेत्रांची पाती ।
इंद्रियें मनआदि वृत्ती । मिळती परेसी ॥ १२ ॥
तेंही स्फुरण चित्सागरीं । मिळे लवणाचिये परी ।
अखंडैकरस ध्येमात्रीं । समरस झाला ॥ १३ ॥
देह झाला काष्ठवत । निश्चल परिपूर्ण निवांत ।
ऐसा शंकरें देवदत्त । देखिला पुढें ॥ १४ ॥
आनंदें टाळी पिटिली । हस्तें वरी छाटी उडविली ।
म्हणती धन्य आजि हे फळली । वंध्या वाग्धेनु ॥ १५ ॥
मग उठोनियां त्वरित । आनंदें शंकर नाचत ।
धन्य अहा हे देवदत्त । धन्य धन्य आम्ही ॥ १६ ॥
मागें हस्तमालक । तो तरी ज्ञानाचा तिलक ।
तेथें उपदेशाचें कौतुक । पुरलें नाहीं ॥ १७ ॥
परी देवदत्तें धन्य केलें । आमुचें वांझपण फेडिलें ।
यासी ब्रह्मात्मबोधें झालें । अपरोक्ष ज्ञान ॥ १८ ॥
परी आमुचिये वाणीसी । पुरली नाहीं असोसी ।
आणि ज्ञातया हे कायसी । ताटस्थावस्था ॥ १९ ॥
हा आतां झालासे लीन । मागुती होईल उत्थान ।
वृत्तिकालीं हें समाधान । झालें तें निमेल ॥ १२२० ॥
तरी यासी करूं सावध । मागुती करूं दृढ बोध ।
जेणें सर्वत्रीं अभेद । पूर्ण ज्ञान ठसावें ॥ २१ ॥
ऐसें विचारूनि अंतरीं । सप्रेम आलिंगिलें उरीं ।
पाठी थापटिती करीं । कुरवाळिती मुख ॥ २२ ॥
अगा वत्सा हे पाडसा । नेत्र उघडीं गा अमासा ।
तुजवीण आम्हांसी सहसा । न धरवे धीरु ॥ २३ ॥
तूं तों अखंड एकरसीं । पूर्ण निमग्नचि झालासी ।
यास्तव आम्हां विसरलासी । काय गा आतां ॥ २४ ॥
ऐसी सूक्ष्म अंतःकरणीं । पडिली अमृतरूप गुरुवाणी ।
तेव्हां वृत्तिसहित खडबडोनी । उठता झाला ॥ २५ ॥
परी वृत्तिमाजी अपार । दाटला आनंदाचा पूर ।
पुलकांकित सर्व गात्र । सजल नेत्र उघडिले ॥ २६ ॥
तों पुढें गुरुमाय देखिली । पदावरी साष्टांग घाली ।
शंकरें उचलूनि आलिंगिली । तनू देवदत्ताची ॥ २७ ॥
सांडूनियां गुरुशिष्यपण । एकरूप जाले पूर्ण ।
न धरत चालिलें स्फुंदन । उभयतांसी ॥ २८ ॥
मग शंकरें काय केलें । स्वकरें नेत्रांसी पुसिलें ।

हातीं धरूनि बैसविलें । पूर्वरीतीं सन्मुख ॥ २९ ॥
देवदत्त थरथरां कांपे । आनंदामाजी वृत्ति लोपे ।
कंठीं दाटूनि आलीं बाष्पें । न फुटे शब्द ॥ १२३० ॥
मग सांवरूनियां बळें । उघडिता होय नेत्रकमळें ।
परी प्रेमाचे होती उमाळे । उमसूं न लाहे ॥ ३१ ॥
मग पदीं घालूनियां मिठी । मंदमंद बोले ओठीं ।
जय जय सद्गुरु उठाउठीं । मोक्षध्वज उभारिला ॥ ३२ ॥
देहबुद्धीचिया रंकासी । दिधलें साम्राज्य एकरसीं ।
अहा हे सद्गुरु ब्रीदासी । सत्य केलें ॥ ३३ ॥
विषयकर्दमींची मासोळी । सोडिली ब्रह्मानंदकल्लोळीं ।
काय स्तवावें मुखकमळीं । मौनावले वेद ॥ ३४ ॥
जय जय सद्गुरु कृपापाणी । न कळे कृपेची कैसी करणी ।
शब्दमात्रें अखंडपणीं । मेळविलें मज ॥ ३५ ॥
ऐसें जें निर्विकार सुख । जेथें नसती सुखदुःख ।
तेंचि होऊनि अशेख । म्यां सर्वदा असावें ॥ ३६ ॥
नको वृत्तीचा वळसा । नको भिन्नत्वाचा ठसा ।
अखंड निजस्वात्मैक्यरसा । परिपूर्ण व्हावें ॥ ३७ ॥
ऐकोनि देवदत्तवाणी । शंकर बोलती हांसोनी ।
सावध असावें निरूपणीं । पुढील श्लोकाचे ॥ ३८ ॥

शब्दस्याद्यंततोः सिद्धं मनसोऽपि तथैव च ।
मध्ये साक्षितया नित्यं तदेव त्वं भ्रमं जहि ॥ २२ ॥

जो शब्दाचे आदिअंतीं । मनाच्याही तेणेंचि रीतीं ।
मध्यें साक्षी नित्य निश्चितीं । तेंचि तूं हा टाकीं भ्रम ॥ ३९ ॥
अगा तुजसी देवदत्ता । सत्य मिथ्या न कळे तत्त्वतां ।
रज्जु रज्जुत्वेंही जाणतां । सर्प मारूं धांवसी ॥ १२४० ॥
स्थाणू स्थाणुत्वें जरी भेटे । चोरा मारूं धांवसी नेटें ।
अहा हें तुजलागी गोमटें । असे कीं ज्ञान ॥ ४१ ॥
मृत्तिएक्वीण घटांत । काय बा असे किंचित ।
तैसें मन प्राणादि समस्त । तुजवीण तेथें काय ॥ ४२ ॥
कापुसावीण सुतासी । काय बा सांगें रूपासी ।
तैसेंचि मनादि सर्वांसी । काय आहे तुजवीण ॥ ४३ ॥
तयातें सांडूं पाहसी । ऐसियाही सांडीं भ्रमासी ।
उद्भवतां निमतां काय तुजसी । उद्‌भव लय असे ॥ ४४ ॥
जेधवां वृत्तिविकार होणें । तुजला त्यासवें काय येणें ।
अथवा निमतां नाहीं जाणें । तुजला मागुतीं ॥ ४५ ॥
जोंवरी शब्द नाहीं उठिला । तूं जैसा अससी संचला ।
उठून हरी शब्द निमाला । तरी तूं अखंड ॥ ४६ ॥

मध्येंचि शब्दाची स्थिती । होतां जाणसी तयाप्रती ।
साक्षिमात्रें स्वयंज्योती । तो विकारी नव्हे ॥ ४७ ॥
तेणेंचि रीतीं मनादि । तूं अससी अंतींआदि ।
मध्येंही साक्षी अनादि । निर्विकाररूपें ॥ ४८ ॥
शब्द मन उपलक्षण । परी जीं जीं तत्त्वें निर्माण ।
त्या त्या आदिअंतीं पूर्ण । मध्येंही साक्षिरूपें ॥ ४९ ॥
वायुमेघाचिये गती । भंगेना गगनाची स्थिती ।
तैसे विकार होती जाती । परी तूं जैसा तैसा ॥ १२५० ॥
अगा जेधवां होतें अज्ञान । तेधवां विकारी न होसी पूर्ण ।
घटीं मठीं जैसें गगन । निश्चल तैसा ॥ ५१ ॥
आतां ज्ञान जालियावरी । विकास लाविसी निर्विकारीं ।
हाचि भ्रम गा निर्धारी । पूर्ण ज्ञान नव्हे ॥ ५२ ॥
जळें काय सांडिले तरंग । कीं आकाशें चवडिले मेघ ।
मनादि हें तुझेंचि अंग । केवीं सांडूं पाहसी ॥ ५३ ॥
किरणें सांडितसे तरणी । कीं ज्वाला अव्हेरी अग्नी ।
मनादि हे आत्मपणीं । केंवी सांडूं पाहसी ॥ ५४ ॥
तथापि सांडूं हें समग्र । ऐसा धरिसी अहंकार ।
हाचि निजरूपीं विकार । तुज कां न कळे ॥ ५५ ॥
अगा सांडीमांडी करूं जासी । तों तों विकारा पावसी ।
निजरूपी भिन्न पडसी । समाधान कईचें ॥ ५६ ॥
यासी तत्यत्वें जें भाविलें । आणि आपणासी भिन्न कल्पिलें ।
इतुकेंचि पाहिजे त्यागिलें । सप्रतीतज्ञानें ॥ ५७ ॥
मन प्राण देह इंद्रिय । नामें मात्र कल्पूं न ये ।
असें एं ब्रह्म तूं अद्वय । अससी हा भ्रम टाकीं ॥ ५८ ॥
एवं अहंकारादि देहांत । तूंचि अससी सदोदित ।
सांडीमांडीचा संकेत । भ्रम हा टाकीं ॥ ५९ ॥
मिथ्या म्हणजे नाहीं झालें दृश्यत्वें जरी तें दिसलें ।
तें तुवां कैसें मानिलें । भिन्न आपणाहूनि ॥ १२६० ॥
ज्वालेसहित अग्नी । कीं तरंगासहित पाणी ।
तैसा तूं आपणालागूनी । जाणें वृत्तीसहित ॥ ६१ ॥
किरणांसहित तरणी । कीं प्रकाशासहित मणी ।
तैसा तूं आपणालागूनी । जाणें वृत्तीसहित ॥ ६२ ॥
एक देहाचा भासला । तुजसी आत्मत्वें दाविला ।
तैसेंचि ब्रह्मांड देखें वहिला । आपुलिये ठायीं ॥ ६३ ॥
एक घट मृत्तिकेचा । कळला जरी असे साचा ।
तरी सर्वां घटीं मृन्मयाचा । विचार पाहावा ॥ ६४ ॥
तेंचि कैसें निरूपण । पुढील श्लोकीं सावधान ।
कीजे तत्पदशोधन । त्वंपदावरी ॥ ६५ ॥

स्थूलवैराजयोरैक्यं सूक्ष्महैरण्यगर्भयोः ।
अज्ञानमाययोरैक्यं प्रत्यग्विज्ञानपूर्णयोः ॥ २३ ॥

स्थूल विराट एक रीती । सूक्ष्म हिरण्यगर्भाप्रती ।
ऐक्य अज्ञान प्रकृती । प्रत्यग् विज्ञानपूर्णासी ॥ ६६ ॥
देह जड अस्थिमांसाचा । तैसाचि जड समुदाय भूतांचा ।
तेथें विस्तार चहूं खाणींचा । तो हा विराट ॥ ६७ ॥
जडवें दोन्ही समान । तेवींच दृश्यत्वें अभिन्न ।
अभेचचि कार्यकारण । ओळखावें तुवां ॥ ६८ ॥
स्थूलदेहीं अवस्था जागृती । तैसीच विराटा उत्पती ।
यासी भेद नाहीं रती । आकारमात्र हे ॥ ६९ ॥
विश्वाभिमानी जो पिंडीं । तोचि असे ब्रह्मा ब्रह्मांडीं ।
स्थूल भोगाची आवडी । सरिखी दोघां ॥ १२७० ॥
सूक्ष्म हिरण्यगर्भ दोन्ही । चंचलत्वें समान मानी ।
सप्तदश तत्त्वांची करणी । कार्यकरणरूपें ॥ ७१ ॥
वायूसी नांव आलें प्राण । चंद्रमा तोचि असे मन ।
बुद्धि तेचि चतुरानन । भेदचि नाहीं ॥ ७२ ॥
श्रोत्र दिशा त्वचा समीर । चक्षु सूर्य जिव्हा रसधर ।
घ्राण अश्विनीकुमार । एकरूपचि ॥ ७३ ॥
वाचा अग्नि पाणी सुरपति । पाद वामन उपस्थ प्रजापति ।
गुदेंद्रिय तो निर्‍ऋति । समान दोहींकडे ॥ ७४ ॥
एवं सप्तदशकलांचा । अपंचीकृत भूतांचा ।
विस्तार कार्यकरणांचा । समान देखें ॥ ७५ ॥
स्वप्नावस्था सूक्ष्मासी । पालन अवस्था जाण तैसी ।
उकार मात्रा हे दोहींसी । समान असे ॥ ७६ ॥
तैजस अभिमानी पिंडीं असे । ब्रह्मांडीं विष्णु पाळीतसे ।
यास्तव कार्यकारण नसे । भेद कांहीं ॥ ७७ ॥
अज्ञानकारणाचे रीतीं । जाणें अव्यकृत प्रकृती ।
हेचि स्वरूपा आवरणशक्ती । सारखीं दोहींकडे ॥ ७८ ॥
प्रलय ते अवस्था सुषुप्ती । एकरूप दोहींची स्थिती ।
मकार मात्रा यासी म्हणती । अज्ञानरूप ॥ ७९ ॥
प्राज्ञ अभिमानचे परी । प्रलयीं रुद्र संहारी ।
ब्रह्मांडाचा अभिमानधरी । तमोगुणरूपें ॥ १२८० ॥
एवं पिंड ब्रह्मांड दोन्हींचें । वाच्यांशीं समानत्व साचें ।
असतां लक्ष्यांसीं कैंचें । भिन्नत्वपण ॥ ८१ ॥
प्रत्यगात्मा विज्ञानरूप । पूर्णब्रह्म स्वस्वरूप ।
यासी न करितां आपेंआप । अभेदता येतसे ॥ ८२ ॥
घटमठचि एक होतां । आकाशा भेद तो केउता ।
झणीं भेद भाविसी आतां । प्रत्यगात्मा ब्रह्मासी ॥ ८३ ॥

हें असो पूर्णब्रह्माहूनी । सर्वांसीही भिन्न न मानीं ।
नामरूप जें दृश्यपणीं । तें तें ब्रह्मरूप ॥ ८४ ॥
याचेंचि निरूपण आतां । श्लोकीं बोलिजे देवदत्ता ।
तेणें तुजसी अभिन्नता । तत्काळ होय ८५ ॥

चिन्मात्रैकरसे विष्णौ ब्रह्मात्मैकस्वरूपके ।
भ्रम एव जगज्जातं रज्ज्वां सर्पभ्रमो यथा ॥ २४ ॥

विष्णु चिन्मात्र एकरस । प्रत्यगात्मा ब्रह्म अविनाश ।
ऐसिया तुझ्याठायीं भ्रमविलास । रज्जुसर्पापरी झाला ॥ ८६ ॥
अगा देवदत्ता तूं अविनाशी । ब्रह्मचि आत्मा एकरसी ।
व्यापकपणें बोलिजे तुजसी । विष्णु हें नाम ॥ ८७ ॥
अखंड एकरस चिन्मात्र । तूचि अससी स्वतंत्र ।
तुझ्या ठायीं हा भ्रममात्र जगविलास दिसे ॥ ८८ ॥
अज्ञानें सर्प रज्जूवरी । जैसा जालासे अंधारीं ।
तैसींचि नामरूपें उभारी । तुजवरी माया ॥ ८९ ॥
रज्जुवेगळें सर्पासी । काढितां न येचि कोणासी ।
तेवींच या जगद्भ्रमासी । तुजहून काढील कोण ॥ १२९० ॥
तस्मात् हें वेगळें कांहीं । नामरूप झालेंचि नाहीं ।
तूंचि अससी सर्वदाही । सर्पपणासहित ॥ ९१ ॥
मी ब्रह्म होतां स्फुरण । तेंचि मायेचें लक्षण ।
तयासी भेद असे कोण । स्वरूपावेगळा ॥ ९२ ॥
तेथेंचि ज्ञानाज्ञानरूप । अविद्या मायेचें स्वरूअ ।
त्यासी भेद नसे अल्प । स्वरूपावेगळा ॥ ९३ ॥
तेथील प्रतिबिंबा नांव । ठेविलें असे जीवशिव ।
त्यासी स्वरूपाहून अपूर्व । भेद कोण कल्पी ॥ ९४ ॥
तया प्रकृतीपासून । होती भूतें आणि गुण ।
काय असे स्वरूपावीण । दृश्यामाजीही ॥ ९५ ॥
मग गुण भूतें प्रसवती । भोग्य आणि साधनसंपत्ती ।
जीव भोक्ता तयाप्रती । हे त्रिपुटी ऐसी ॥ ९६ ॥
हें असो प्रथमविकार । आकाशरूप महाथोर ।
गगन हें पावलें नाममात्र । परी तें सद्रूप ॥ ९७ ॥
सद्रूप वेगळें करितां । आकाशासी नसे वार्ता ।
तस्मात् तूंचि अससी तत्त्वतां । आकाशरूपें ॥ ९८ ॥
तैसेचि वायु अग्नि आप । पांचवें भूमीचें रूप ।
यासी आपणाहूनि अल्प । भेदचि भावूं नको ॥ ९९ ॥
पंचभूतांचें रचिलें । ब्रह्मांड नाम पावलें ।
भेदभाव टाकी वहिलें । तूंचि ब्रह्म अससी ॥ १३०० ॥
चवदा भुवनें सप्त पाताळ । वैकुंठकैलासादि स्थळें ।

स्थावरजंगमादि सकळें । तूंचि ब्रह्म अससी ॥ १ ॥
मेरु समुद्र नद्या पर्वत । तृण पाषाण वस्तुजात ।
जें जें दृश्य भासत । तूंचि ब्रह्म अससी ॥ २ ॥
देव मानव दानव । भूतें राक्षस गंधर्व ।
पक्षीं श्वापदें सर्व । तूंचि ब्रह्म अससी ॥ ३ ॥
जलचर आणि भूचर । दिनचर आणि इशाचर ।
कीटक आणि खेचर । तूंचि ब्रह्म अससी ॥ ४ ॥
तुजवीण कोणतें दुजें । असे म्हणोनि लाहिजे ।
यास्तव अंतरीं पूर्ण समजें । तूंचि ब्रह्म अससी ॥ ५ ॥
हा उत्तम हा अधम । हा कनिष्ठ हा मध्यम ।
हा विषम हा सम । ऐसें भावूंचि नको ॥ ६ ॥
हा थोर हा धाकुटा । हा चांगुला हा खोटा ।
हा श्रीमान् हा करंटा । ऐसें भावूंचि नको ॥ ७ ॥
हा स्वर्ग हा नरक । हा आंधार हा प्रकाशक ।
हा मूर्ख यासी बहु तर्क । ऐसें भावूंचि नको ॥ ८ ॥
हें सुख हें दुःख परम । हा पापरूप अधर्म ।
हें पुण्यात्मक उत्तम । ऐसें भावूंचि नको ॥ ९ ॥
हा पूर्वकषाचा सिद्धांत । हा बद्ध हा जीवन्मुक्त ।
हा साधक हा मोक्ष । ऐसें भावूंचि नको ॥ १३१० ॥
गगनचि जैसें गगनीं । कीं पाणियामाजी पाणी ।
तैसा तूंचि एक एकपणीं । अससी ब्रह्म ॥ ११ ॥
तूचि आंत तूंचि बाहेरी । तूंचि तळीं तूंचि उपरी ।
तूंचि पुढें मागें एकसरी । सव्य अपसव्य तूं ॥ १२ ॥
बहु कासया उच्चारूं । तूंचि वेद अर्थ विचारू ।
तूचि शिष्य तूं श्रीगुरु । अससी ब्रह्म ॥ १३ ॥
ऐसी अभेद जे प्रतीती । नाढळेचि दुजी व्यक्ती ।
एकला एक स्वयंज्योती । तूंचि आत्मा परिपूर्ण ॥ १४ ॥
हा वेदांतसिद्धार्थ काढिला । तुझिये करीं समर्पिला ।
ऐसेंचि देखें गा वहिला । बोलिल्या न्यायें ॥ १५ ॥
सर्वशास्त्रें सांडूनि दूरी । वेदांतसंमती निर्धारीं ।
तुजप्रति बोल्धिलें अंतरीं । आतां करीं हें दृड ॥ १६ ॥
मग देवदत्तें सष्टांग केलें । नेत्रोदकें चरण क्षाळिले ।
महाप्रसाद जी दिधलें । पूर्ण समाधान ॥ १७ ॥
जय जय सद्‌गुरु तुझिये कृपें । संशयासहित अज्ञान लोपे ।
भवसमुद्र मारिला थापें । मशकादिकीं ॥ १८ ॥
समर्थें जया धरिलें करीं । तो कां राहील भिकारी ।
परी एक आटह्वलें अंतरीं । विज्ञापना करूं तें ॥ १९ ॥
मागें आतां निरूपणीं । न्यायही घेतला व्याख्यानीं ।
सांख्य योग हीं शास्त्रें दोन्ही । ग्रहण केलीं ॥ १३२० ॥

तरी सर्व शास्त्रें कैसीं । सांडून जाणावे वेदांतासी ।
निवडून तयाचिये रूपासी । भिन्न भिन्न सांगावें ॥ २१ ॥
ऐसी प्रार्थना ऐकोनी । सद्गुरु बोलती सुवचनीं ।
साख्यादि घेतलें व्याख्यानीं । तें प्रयोजन ऐकें ॥ २२ ॥
जैसी मागून आली पद्धती । पुढें चालावें तेणें रीती ।
स्वानुबवानुरूप जे युक्ती । घेती ज्ञानी ॥ २३ ॥
हेंचि आतां निरूपिजे । श्लोकार्थीं अवधान दीजे ।
तेणें तुजलागीं उमजे । टाकणें घेणें ॥ २४ ॥

तार्किकाणां च जीवेशौ वाच्यावेतौ विदुर्बुधाः ।
लक्ष्यौ च सांख्ययोगाभ्यां वेदांतैरैक्यतानयोः ॥ २५ ॥

जीवेश वाच्य बोले न्याय । सांख्ययोगें लक्ष्य प्रत्यय ।
वेदांत ऐक्यत्वनिश्चय । जाणती ज्ञाते ॥ २५ ॥
न्याय म्हणजे अनुमान । दृष्टांतयुक्तीं घडे मनन ।
कांहीं तर्क केलियावीण । अर्थीं दृष्टि नव्हे ॥ २६ ॥
येंएं रीतीं घेतला न्याय । ऐक सांख्याचा उपाय ।
आत्मानात्मनिवाडू होय । लक्ष्य केळे तेणें ॥ २७ ॥
अभ्यासें वृत्तीसी सांडूनी । बलात्कारें समरससी पूर्णीं ॥
यास्तव योगही व्याख्यानीं घेतला असे ॥ २८ ॥
परी विरुद्ध जे वेदांतासी । सांडील त्या त्या सिद्धांतांसी ।
ते ते कोणते जरी म्हणसी । तें पुढें बोलूं तुज ॥ २९ ॥
येथें ग्रहणाचें प्रयोजन । असे तें केलें निरूपण ।
आतां वेदांआचा पक्ष जाण । अवधारीं निश्चित ॥ १३३० ॥
जरी झाली न्याययुक्ती । स्वानुभव नव्हे तयाप्रई ।
सर्वांशवाच्य जीवेशा म्हणती । अंधाचे परी ॥ ३१ ॥
सांख्ययोगें लक्ष्य निवडे । परी ऐक्यतेचें सांकडें ।
यास्तव ज्ञाते रहस्य कोडें । घेती वेदांताचें ॥ ३२ ॥
ब्रह्म प्रत्यगात्मा ऐक्य । हें वेदांततात्पर्य एक ।
त्याहूनि जें जें भेदात्मक । नामरूप मिथ्या ॥ ३३ ॥
इतुकें हें वेदांतसंमत । तेणें ऐक्य साधकां होत ।
सांख्ययोगादि शास्त्रसंकेत । घेती कार्यपरत्वें ॥ ३४ ॥
येथें दवदत्तें पुसिलें । वेदांत ऐक्य जें बोलिलें ।
तेंचि कैसें मजसी वहिलें । लक्षणावृत्ती सांगा ॥ ३५ ॥
बहु बरें म्हणोनि गुरु । लक्षणावृत्तीचा प्रकारु ।
येणें श्लोकीं निर्धारु । बोलते झाले ॥ ३६ ॥

कार्यकारणवाच्यांशौ जीवेशौ यौ जहच्च तौ ।
अजहच्च तयोर्लक्ष्यौ चिदंशावेकरूपिणौ ॥ २६ ॥

वाच्यांश कार्यकारणांचा । त्याग करून जीवेशांचा ।
अत्याग एकरूपीं लक्ष्याचा । चिदंश म्हणोनी ॥ ३७ ॥
त्वंपद बोलिलें जीवासी । तत्पद नाम ईश्वरासी ।
वाच्य लक्ष्य असती दोहींसी । ते वेगळे समजावे ॥ ३८ ॥
अविद्याकामकर्मसमुदाय । स्थूलादि हें देहत्रय ।
अभिमानें जीव भोक्ता होय । हें त्वंपदवाच्य ॥ ३९ ॥
देहत्रया विलक्षण । स्वप्रकाश ज्ञानघन ।
शुद्ध प्रत्यगात्मा पूर्ण । हें त्वंपदलक्ष्य ॥ १३४० ॥
विराटादि देहत्रय । मायेपासून तत्त्वसमुदाय ।
तयाचा नियंता ईश्वर होय । हा तत्पदवाच्य ॥ ४१ ॥
सृष्टिस्थितिप्रलयरहित । परिपूर्ण ब्रह्म सदोदित ।
अखंड अद्वय अनाअंत । हें तत्पदलक्ष्य ॥ ४२ ॥
सगट ऐक्य करूं जातां । विरोधचि होय तत्त्वतां ।
सर्वज्ञ किंचिज्ज्ञ पाहतां । एक नव्हे कधीं ॥ ४३ ॥
यास्तव हे लक्षणावृत्ती । केली पाहिजे निश्चितीं ।
तेचि कैसी जाणिजेती । भागत्यागें ॥ ४४ ॥
जहत् म्हणजे त्याग । अजहत् तेंचि अत्याग ।
जहदजहत् त्यागात्याग । ऐसे तीन प्रकार ॥ ४५ ॥
त्याग म्हणजे टाकावें । मिथ्या मिथ्यात्वें समजावें ।
अत्याग म्हणजे घ्यावें । सत्य तें निवडूनि ॥ ४६ ॥
सर्वांश त्यागिला जरी । सत्य तेंचि म लाभे करीं ।
म्हणोनि येथें हे अव्हेरीं । त्यागलक्षणा ॥ ४७ ॥
वाच्य जरी न टाकितां । लक्ष्यांश न कळे तत्त्वतां ।
निरोधें नव्हे ऐक्यता । यास्तव अत्याग नको ॥ ४८ ॥
तस्मात् येथें त्यागात्याग । लक्षणावृत्ति हे उमग ।
वाच्यत्याग लक्ष्यअत्याव । दोहींचेही ॥ ४९ ॥
राजा कोणीएक भला । देवपूजेसी बैसला ।
तोचि उठून शिकारीस गेला । परी राजा तो एकचि ॥ १३५० ॥
तैसें मायेमध्यें बिंबलें । सर्वज्ञत्वादि धर्म झाले ।
तेंचि ईश्वर नाम पावलें । उपाधि तोंवरी ॥ ५१ ॥
तेंचि चैतन्य अविद्येंत । किंचिज्ज्ञादि धर्म उमटत ।
जीवनामांचा संकेत । तया झाला उपाधीनें ॥ ५२ ॥
डोळे झांकून पूजा करी । ठाण मांडिलें आरक्तनेत्रीं ।
तो एक नव्हे निर्धारीं । विरोधामुळें ॥ ५३ ॥
तैसा सर्वज्ञ ईश्वरु । किंचिज्ज्ञ जीव अनीश्वरु ।
हे एक न होई निर्धारु । विरोधास्तव ॥ ५४ ॥
पूजासमय आसन ध्यान । ठाण मांडितां धनुष्य बाण ।
ह्या उपाधि दोन्ही त्यागून । राजा मात्र लक्षावा ॥ ५५ ॥

तैसें मायादि सर्वज्ञपण । अविद्यादि धर्म किंचिज्ज्ञ ।
ह्या उपाधि त्यागून । चैतन्य एक निवडावें ॥ ५६ ॥
वाच्य मिथ्यात्वें जातां । लक्ष्य उरे जें तत्त्वतां ।
तया चिदंशा ऐक्यता । सहजचि होय ॥ ५७ ॥
घट मठ उपाधि दोन्ही । त्यागितां गगन जैसें गगनीं ।
तेवीं जीवेश वाच्य त्यागूनी । आत्मा ब्रह्म अनुभवीं ॥ ५८ ॥
ऐसी भागत्यागलक्षणा । सांगितली तुज जाणा ।
हा पक्ष वेदांताविना । नसे अन्य शास्त्रीं ॥ ५९ ॥
अन्य शास्त्रींचे सिद्धांत । तुजसी होतों बोलत ।
परी तुवां पुसिलें निश्चित । तें किंचित् बोलिलों ॥ १३६० ॥
आतां ऐकें सर्व शास्त्रांचे । सिद्धांत जे जे बोलिले वाचे ।
तेथें असे ज्ञान तें कैंचें । द्वैतचि प्रतिपादिती ॥ ६१ ॥

कर्मशास्त्रे कुतो ज्ञाने तर्के नैवास्ति निश्चयः ।
सांख्ययोगौ द्विधापन्नौ शाब्दिकां शब्दतत्पराः ॥ २७ ॥

कर्मशास्त्रीं कैंचें ज्ञान । तर्कें निश्चय नव्हे जाण ।
सांख्ययोगासी । भेदभान । व्याकरण शब्दीं तत्पर ॥ ६२ ॥
नानायज्ञीं द्रव्य वेंचावें । अमुक अमुक साहित्य व्हावें ।
होता अध्वर्यु असावे । न्यून पडतां प्रायश्चित ॥ ६३ ॥
इतुका करून खटाटोप । परे फल तें पाहतां अल्प ।
देहबुद्धीचा मात्र संकल्प । सदृढ केला ॥ ६४ ॥
आपुलें निजसुख टाकूनी । स्वर्गादि सुखा करी ग्लानी ।
उदंड असतां भुवनीं । नेणोनि भीक मागे ॥ ६५ ॥
असो ऐसे मायाप्रवाहीं । पडिले तयां विसावा नाहीं ।
कर्मशास्त्रीं ज्ञान कांहीं । बोलोंचि नये ॥ ६६ ॥
तार्किक भट्टभास्कर । हेचि म्यायाचे प्रकार ।
तेथेंही ज्ञानाचा निर्धार । होय कैसेनि ॥ ६७ ॥
जन्मांध पाहूं गेले हत्ती । हातीं पडिलें तें चांचपिती ।
कोणी पुसतां सांगती । सुपाऐसा गज ॥ ६८ ॥
तैसे नाना तर्क करिती । नाना दृष्टांत युक्ती ।
प्रत्यक्षासी अनुमानिती । तेथें निश्चय कईचा ॥ ६९ ॥
देहादि जग हें सत्य असे । कारण कीं प्रत्यक्ष दिसे ।
न दिसे तें सत्यही नसे । वंध्यापुत्रापरी ॥ १३७० ॥
ब्रह्म नाहीं दिसेना । खपुष्प किमपि भासेना ।
ऐसे प्रवर्तती अनुमाना । तेथें यथार्थ ज्ञान कैंचें ॥ ७१ ॥
साख्यशास्त्र जैसा हंस । निवडीतसे क्षीरनिरास ।
तेवीं आत्मा आणि अनात्मयास । वेगळें काढी ॥ ७२ ॥
परी आत्मा ब्रह्म अभेदा । न प्रवर्तेचि संवादा ।

जीवईश्वराचिया भेदा । सत्यचि करी ॥ ७३ ॥
आणि माया हे प्रधान । कदा नव्हे अप्रमाण ।
प्रलयकालीं होय लीन । परी अभाव नाहीं ॥ ७४ ॥
अभाव जरी असता । तरी उद्भवचि नहोता ।
सुषुप्तिकाळीं पाहतां । वृत्ती जैसी ॥ ७५ ॥
ब्रह्म सच्चिदानंदघन । सर्वशक्तिमान् सर्वज्ञ ।
हे पंचही लक्षण । एकत्र करिती ॥ ७६ ॥
ऐसिया गा सिद्धांतानें वेदांतासी येतें उणें ।
तया विरोधाचीं लक्षणें । कांहींशीं बोलूं ॥ ७७ ॥
ब्रह्म प्रत्यगात्मा भेद होतां । हा सजातीय भेद तत्त्वतां ।
ब्रह्म परोक्षचि घेतां । आत्मा अब्रह्म ॥ ७८ ॥
दुसरें मायेच्या सत्यत्वानें । जग-जीवासी सत्यता होणें ।
जगसत्यत्वें ब्रह्मलक्षणें । प्रगट कैंचीं ॥ ७९ ॥
ब्रह्म ईश्वर एक केले । तरी सत्य मिथ्या एक झालें ।
जडचेतन निवडिलें । कासयावरूनि ॥ १३८० ॥
जैसा पुरुष करितां भोजन । माशी लागतां करी वमन ।
जाली तृप्ति ते जाऊन । तळमळ सुटे ॥ ८१ ॥
तैसा साख्यांचा प्रसंग । जालिया तृप्तीसी भंग ।
तेथें सुख अव्यंग । सुखदुःख भेदें होय ॥ ८२ ॥
प्रकृतिपुरुषांचा विवेक । जयासी घडे कौतुक ।
तयासी मोक्ष हा एक । होय म्हणती ॥ ८३ ॥
विवेक जयासी न घडे । तया बंधाचें सांकडें ।
यास्तव विवेकिया जोडे । म्हणती मोक्षसुख ॥ ८४ ॥
परी तें अवघें ओखटें । ब्रह्म आत्मत्वें न भेटे ।
अज्ञानभ्रांतीच न फिटे । तरी मोक्ष कैंचा ॥ ८५ ॥
तया म्हणूं न ये ज्ञान । सदा द्वैतरूप भान ।
ऐसें सांख्यशास्त्रींचें दूषण । असे बहुत ॥ ८६ ॥
तैसाचि योगशास्त्रीं कांहीं । मुख्यज्ञानाचा लेश नाहीं ।
शून्यीं अथवा वृत्तिप्रवाही । अभ्यासें पडती ॥ ८७ ॥
हठें प्राणासी निरोधी । वृत्ति लीन होय त्या संधीं ।
जळीं तुंबिनी बळें रोधी । सोडितां उफाळे ॥ ८८ ॥
तैसें मन उत्थानकाळीं । उठतां विषय न्याहाळी ।
अधिक देहबुद्धि सळी । सिद्धिबंधनें ॥ ८९ ॥
वृत्ति जेव्हां होय लीन । तेव्हांही कैंचें ब्रह्मज्ञान ।
वृत्ति अज्ञानीं निमग्न । सुषुप्तिपरी ॥ १३९० ॥
अथवा मुद्रादि साधन । तेणें आत्म्याचे दर्शन ।
परी तें केवळ दृश्य भान । त्यासी आत्मा भाविती ॥ ९१ ॥
ईश्वरु वेगळा ठेविती । जीवासी असंगही म्हणती ।
तरी ते जाणावे नेणति । अभेद वर्म ॥ ९२ ॥

शब्दज्ञानें लक्ष्य निवडे । तेथें स्वानुभव केवीं जोडे ।
आणि ऐक्यतेचें सांकडें । फिटे कैसेनि ॥ ९३ ॥
तस्मात् योगशास्त्रीं पाहतां । ज्ञानाची नसे वार्ता ।
व्यर्थचि श्रमती केउता । अर्थलाभ तयां ॥ ९४ ॥
व्यर्थ आत्मा म्हणती दूर । अति कठिण मार्ग दुस्तर ।
चार घांट महाथोर । लंघितां भय वाटे ॥ ९५ ॥
आपण आत्मा न कळे । मार्ग क्रमिती आंधळे ।
पडती जाऊनियां बळें । शून्यामाजीं ॥ ९६ ॥
जैसा दूर पंथ चालूनि आला । तो वेशीमध्यें नागविला ।
तैसा प्रसंग येथें घडला । योगाभ्यासें ॥ ९७ ॥
असो बहु बोलणें काये । ग्रंथालागीं विस्तर होये ।
ज्ञानवार्ताही बोलूं न ये । योगशास्त्रीं ॥ ९८ ॥
शब्दींच तत्पर व्याकरणी । बोलतां शिणेना वाणी ।
भवति न भवति अनुदिनीं । तेथें अर्थ कैंचा ॥ ९९ ॥
कण सांडून्न चाळणी । घेतसे भुसाची धणी ।
तेवीं अर्थसार त्यागूनी । घेती शब्दभूस ॥ १४०० ॥
तेथें तरी ज्ञान कैंचें । उगाचि अभिमानें नाचे ।
असो तया बहिर्मुखाचें । काजचि नको ॥ १ ॥
पुढील श्लोकीं पूर्वार्धांत । अन्य पाखांडाचा संकेत ।
उत्तरार्धीं शुद्ध वेदांत । स्तविला असे ॥ २ ॥

अन्ये पाखंडिनः सर्वे ज्ञानवार्तासु दुर्बलाः ।
एकं वेदांतविज्ञानं स्वानुभुत्या विराजते ॥ २८ ॥

अन्य पाखांडी दुर्बळ । ज्ञानवार्तेचा त्यां दुष्काळ ।
एक वेदांतविज्ञान केवळ । स्वानुभूतीनें विराजे ॥ ३ ॥
जेथें ज्ञानाचा विटाळ । ते ते जाण पाखांडी खळ ।
शास्त्रीय लौकिकी सकळ । येणेंचि न्यायें ॥ ४ ॥
देहात्मवादी प्राणवादी । मनचि आत्मा विज्ञानवादी ।
अणु आत्मा शून्यवादी । ते ते पाखांडी ॥ ५ ॥
जड आत्मा माध्यामिक । जड चेतन उभयात्मक ।
आत्मा भाविती सवृत्तिक । ते ते पाखांडी ॥ ॥ ६ ॥
शैव शाक्त वैष्णव । सौर गाणपत्य सर्व ।
जयांसी एकदेशी देव । ते ते पाखांडी ॥ ७ ॥
मल्लार भैरव तृणार्चक । धातुपाषाणपूजक ।
टिळेमाळादि दांभिक । ते ते पाखांडी ॥ ८ ॥
नग्न मौनी जटाधारी । धूम्रपानी वायुआहारी ।
अघोर आणि ठाडेश्वरी । ते ते पाखांडी ॥ ९ ॥
जती जंगम शेवडा । उदासी फकीर कानफाडा ।

माङ्भाव डोईफोडा । ते ते पाखांडी ॥ १४१० ॥
द्रव्यदारेसी विकिले । कामनेसी जे सोंकले ।
वरिवरी नाना सोंगा आणिलें । ते ते पाखांडी ॥ ११ ॥
ऐसें सांगावें तें किती । अवघे देहबुद्धीचे सांगाती ।
उगेचि जन्मूनियां मरती । ते ते पाखांडी ॥ १२ ॥
हें असो अधिकारावीअ । करिती जे कां वेदांतश्रवण ।
मुखें बडबडती ज्ञान । तेही पाखांडी ॥ १३ ॥
गुरु शिष्य शास्त्रभार । स्वानुभवेंवीण केर ।
वाउगा भरला बाजार । तेही पाखांडी ॥ १४ ॥
मुखीं ज्ञान बोले सैरा । अंतरीं असे द्रव्य दारा ।
पुत्रकामीं जो घाबरा । तोही पाखांडी ॥ १५ ॥
रुका वेचितां जाण । सर्व मिथ्या हें बोले वचन ।
आपुले करणीचा साभिमान । तेही पाखांडी ॥ १६ ॥
मी माझें झालें बळकट । मुक्तपणें जें सैराट ।
शब्दज्ञानीं कर्मभ्रष्ट । तेही पाखांडी ॥ १७ ॥
पुरे आतां किती बोल । प्रतीतीविण अवघें फोल ।
तेथें कैंचें हो असेल । शुद्ध ज्ञान ॥ १८ ॥
असो एक वेदांतसार । गुरुमुखें आणि शुद्ध विचार ।
तेथेंचि स्वानुभवें स्थिर । होय विज्ञान ॥ १९ ॥
म्हणून वेदांतपरतें । शास्त्र नाहीं गा कोणतें ।
सर्वांमधें विराजतें । स्वकीय तेजें ॥ १४२० ॥
वेदांतसिंहाचिये आरोळी । सांख्यादि गज कांपती चळीं ।
मग इतर शास्त्रें हीं कोल्हीं । उभ्या प्राण सांडिती ॥ २१ ॥
देवदत्ता दत्तचित्त । जया करणें आत्महित ।
तेणें शुद्ध वेदसिद्धांत । स्वामुभवें आकळावा ॥ २२ ॥
सर्वशास्त्रांसही सांडावें । आणि लौकिकाही त्यजावें ।
सर्वही स्वयेंचि व्हावें । निजांगें ब्रह्म ॥ २३ ॥
मागें बोलिलिया रीतीं । सर्व मीच ऐसी प्रतीती ।
नाठवेचि दुजी व्यक्ती । प्रह्मस्वरूपाविण ॥ २४ ॥
ऐसा जो शुद्ध वेदांत । विज्ञानरूपें विराजत ।
शून्यासहित मावळे द्वैत । सदा परिपूर्ण ॥ २५ ॥
नामरूपें द्वैतभान । याचें करोनियां हनन ।
मग एकचि ब्रह्म आपण । सर्वांमध्यें ॥ २६ ॥
येथेंही कोणी मंदप्रज्ञ । अर्थ एक भाविती आन ।
तयाचें करूं निरूपण । संशयनिरासार्थ ॥ २७ ॥
जग जीव मिथ्यात्वें त्यागावे । आणि सर्व ब्रह्मही अनुभवावें ।
हें दोहींनीं कैसें संभवे । त्यागग्रहण ॥ २८ ॥
सर्व ब्रह्मही म्हणे श्रुती । आणि वाच्य लक्ष्यही निवडिजेती ।
हा विरोध भासे आम्हांप्रती । बोलती मूर्ख ॥ २९ ॥

ऐसें वेदांतासी दूषण। लावूं पाहती मूर्ख जन।
त्यागग्रहणाची नेणती खूण। सप्रतीत अंगें॥ १४३०॥
जन्मांधें दूध कैसें पुसतां। बकाऐसें निरोपितां।
म्हणे तें तों न येचि खातां। अडकेल कंठीं॥ ३१॥
तैसा मुख्यार्थ न कळे वृत्ती। एकाचे एक भाविती।
तेथें कैंची हो प्रतीती। स्वात्मत्वें होय॥ ३२॥
त्याग तरी नामरूपाचा। उमसून व्हावा द्वैताचा।
येथें सर्वपणा आहे कैंचा। कीं टाकावा घ्यावा॥ ३३॥
न सांडितां नामरूपा। सर्व ब्रह्म कैंचें बापा।
ग्रहण करितां काय सर्पा। रज्जु भेटे॥ ३४॥
तस्मात् नामरूप सांडावें। शुद्ध ब्रह्म अनुभवावें।
परिपूर्ण एक स्वभावें। एकपणेंवीण॥ ३५॥
द्वैताचा नव्हे उमग। या नांवें बोलिजे त्याग।
एक ब्रह्मात्मा असंग। सर्व हें नाहीं॥ ३६॥
नानात्व बैसलें वृत्तीसी। यास्तव श्रुति तया उपदेशी।
जे सर्व सांडूनि सर्वांशीं। स्वात्मत्वें अनुभवीं॥ ३७॥
असो ऐसा जाला प्रकार। संशय निरसिला महाथोर।
अन्य शास्त्रें सांडोनि दूर। वेदांतचि पाहावा॥ ३८॥
त्वंपदशोधनीं तुजला। अपरोक्ष आत्मा भेटविला।
जैसा करतळीं आंवळा। तो आला कीं प्रतीती॥ ३९॥
पुढें शोधिलें तत्पद। मिथ्यात्वें एवैताचा उपमर्द।
ब्रह्मचि आत्मा अभेद। हेंही दाविलें॥ १४४०॥
हेंचि सदृढ व्हावें। अभ्यासें वृत्तीसी खलावें।
जे पुन्हां द्वैत न संभवे। ऐसें करूण्॥ ४१॥
बंध मोक्ष निरूपणव्याजें। द्व्हिनितार्थें सर्व बोलिजे।
तरी आतां अवधान दीजे। पुढील श्लोकीं॥ ४२॥

अहं ममेत्ययं बंधो नाहं ममेति मुक्तता।
बंधो मोक्षो गुणैर्भाति गुणाः प्रकृतिसंभवाः॥ २९॥

मी माझें हें बंधन। मुक्ति तेचि ययावांचून।
बंधमोक्षां गुण कारण। गुण तरी प्रकृतीचे॥ ४३॥
देहायेवढेपण। हेंचि आत्मयासी मरण।
ऐसें जाणावें मीपण। बंधासी मूळ॥ ४४॥
एवं मीपण दृढ होतां। त्यासवें उपजे ममता।
मग माझें माझें म्हणतां। सदृढ बांधला॥ ४५॥
हेंचि बंधाचें स्वरूप। सुखदुःख भोगी अमूप।
यावीण मुक्तीचें अल्प। निरूपण कीजे॥ ४६॥
देहादि वेगळे केले। सप्रतीत आपणा ओळखिलें।

निर्विकारत्वें सदृढ झाले । देहबुद्धीविण ॥ ४७ ॥
मुख्य देहचि मी नसतां । कोणा स्त्रीपुत्रादि ममता ।
ऐसें मी माझें निपटून जातां । मुक्तता हेचि ॥ ४८ ॥
मुक्त तोचि हा साधक । बद्ध तेचि इतर लोक ।
या दोहींमध्यें उभयात्मक । मुमुक्षु ओळखावा ॥ ४९ ॥
एवं बद्ध मुमुक्षु साधक । पूर्वार्धी तिहींचें रूपक ।
उत्तरार्धीं असे कौतुक । सिद्ध लक्षणाचें ॥ १४५० ॥
रजतमें बद्द्हता जडे । सत्वगुणें मोक्ष जोडे ।
मी असंग ज्ञान उजेडे । म्हणोनियां ॥ ५१ ॥
तस्मात् बंध आणि मोक्ष । गुणांस्तव दोहींचा पक्ष ।
गुण निर्मावयासी दक्ष । ते मायादेवी ॥ ५२ ॥
मूळ माया आणि गुण । मृगजलवत् भासमान ।
रूपनाम कल्पिलें जाण । परी मुळींच नाहीं ॥ ५३ ॥
गुणमायेसीच रूप नव्हे । तरी बंध मोक्ष कोठें आहे ।
निजरूपीं कांहींच न साहे । डोळां कण जैसें ॥ ५४ ॥
ऐसी जेथें दृढ मती । तया ज्ञानिया सिद्ध म्हणती ।
कोणतेही अवस्थेप्रती । द्वैत नुमसे ॥ ५५ ॥
एवं मी माझें हे बद्धता । मी माझें नुमसे चित्ता ।
तेचि जाणिजे मुक्तता । सिद्ध तो दोहींविण ॥ ५६ ॥
मी माझें हें उपलक्षण । मी कर्ता भोक्ताही बंधन ।
मजसी स्वस्वरूपाचें ज्ञान । हाही अभिमान बद्धक ॥ ५७ ॥
मी माझें जें वाटे मनीं । तोचि जागरीं विश्वाभिमानी ।
मी कर्ता भोक्ता सूक्ष्मपणीं । तोचि स्वप्नीं तैजस ॥ ५८ ॥
तें ध्येय मी ध्याता । साधकत्वें ध्यान करितां ।
हा प्राज्ञ अभिमानी तत्त्वतां । अज्ञान सुषुप्ति ॥ ५९ ॥
तस्मात् हे तिन्ही अभिमान । सूक्ष्मत्वें जरी होती स्फुरण ।
तोंवरी असे अज्ञान । मुख्य ज्ञान नव्हे ॥ १४६० ॥
हें अज्ञान निपटून जावें । मुख्य अभिना व्हावें ।
तरी अभ्यासेंवीण न संभवे । मंदप्रज्ञासी ॥ ६१ ॥
उपदेश होतांचि क्षणीं । सर्व संशय ग्रासूनी ।
पावे जो पूर्ण समाधानीं । ऐसें विवेकी थोडे ॥ ६२ ॥
तस्मात् देवदत्ता ऐक । अभासाचें रहस्य एक ।
आणि तयाची निश्चयात्मक । अवधिही बोलूं ॥ ६३ ॥
आणि मुमुक्षु साधकाची । कोण काल अवधि त्याची ।
येथें सूक्ष्मनिरूपणाची । सीमाचि असे ॥ ६४ ॥
मुखें देह मी नव्हे म्हणतां । नव जाय गा हे बद्धता ।
येथें अभ्यास दृढ होतां । अहंममता गळे ॥ ६५ ॥
जोंवरी अहंममता दिसे । तोंवरी जागृतीमध्यें असे ।
मी माझें निमतां आपैसें । स्थूलदेहा ओलांडिलें ॥ ६६ ॥

परी अहंममता गेली कैसी । प्रतीति पहावी मानसीं ।
वरिवरी त्यागितां तिसी । निर्मूळता नव्हे ॥ ६७ ॥
येथें प्रकार अभ्यासाचा । अनुसंधानात्मक साचा ।
देहादि सर्व जगाचा । अनुभव मिथ्यारूप ॥ ६८ ॥
मी प्रत्यगात्मा जीव साक्षी । अधिष्ठानचि मात्र लक्षी ।
द्वैत उठतांचि पुन्हां भक्षी । नामरूपातें ॥ ६९ ॥
एकेंचि काळें सर्व द्वैत । मिथ्यात्वें कैसा पाहत ।
आणि साक्षीही अनुभवित । म्हणसी कैसा ॥ १४७० ॥
सर्व हें एकदांचि न स्फुरे । एक उद्भवे एक मुरे ।
ज्या क्षणीं जें ये सामोरें । तेव्हां विषय एक ॥ ७१ ॥
शब्द घेतां नव्हे स्पर्श । रूप देखतां नव्हे रस ।
गंध घेतांही अन्यास । मन हें न जाणे ॥ ७२ ॥
सर्व इंद्रियांचे विषय । एकाच काळीं जरी प्रत्यय ।
परी स्फुरण जें कां होय । तें एकाविषयीं ॥ ७३ ॥
तस्मात् ज्या क्षणीं जो विषय । वृत्तीसी होय प्रत्यय ।
त्या क्षणींच मिथ्या निश्चय । केला पाहिजे ॥ ७४ ॥
तितुक्याचि विषयाचा जाणता । श्रम कोणतां अभ्यासितां ।
आणि मिथ्याही पाहतां । काय गा कष्ट ॥ ७५ ॥
एवं इतुकें अनुसंधान । अतुट चाले समान ।
द्वैत मिथ्या अवलोकन । आणि साक्षी स्मरावा । ॥ ७६ ॥
ऐसा अभ्यास दृढ होतां । क्षीण पावे अहंममता ।
मी माझें हें निपटूनि जातां । मुक्तता आयती ॥ ७७ ॥
अहंममता निःशेष गेली । हे कैसी प्रतीति आली ।
म्हणसी तरी अवलोकिली । अंतरीं पाहिजे ॥ ७८ ॥
धनस्त्रीपुत्रहानी । होतां जरी परोक्ष मानी ।
गेलें आलें नाठवे मनीं । तरी माझें गळालें ॥ ७९ ॥
माझें गेलें मुखें बरळे । परी अंतरीं न कळवळे ।
सूक्ष्मरूपें जो कां पिळे । देंठ नाभीचा ॥ १४८० ॥
ममत्व गेलें येणें रीतीं । निरहंकृति ते कोणती ।
कोणतेही अवस्थेप्रती । मी देह वाटेना ॥ ८१ ॥
कोणताही भोगितं विषय । मी ऐसा नव्हे प्रत्यय ।
आपण असंग हा निश्चय । सदृढ झाला ॥ ८२ ॥
ऐसा जो कां दृढभाव । निरहंकृति या नांव ।
विश्वाभिमानियाचा ठाव । पुसिला तेव्हां ॥ ८३ ॥
स्थूलदेह अवस्था जागृती । तेणें ओलांडिली निशिती ।
परी जाणावी प्रतीती । आपुली आपण ॥ ८४ ॥
स्वतां नेणे जो ऐसें अंतरीं । तोचि जाणावा आत्महत्यारी ।
आंत बांधिला म्हणे वरी । मीचि मुक्त ॥ ८५ ॥
तरी साधकें ऐसें न करावें । मुक्त तरी खरेंचि व्हावें ।

मी माझें हे त्यागावें । निपटुन अंतरींचे ॥ ८६ ॥
असो ऐशा अहंममतेची । बेडी तुटली बंधाची ।
आतां पुढे कर्त्या भोक्त्याची । अहंता गळावी ॥ ८७ ॥
होतां देहासी वर्तन । तेथें घडतसे क्रियमाण ।
दिसूं लागले पापपुण्य । आत्मया माथां ॥ ८८ ॥
पुण्यात्मक जरी घडले । तेव्हां म्हणे हें बरें झाले ।
अथवा अहा जें पाप घडलें । ते मनासी खंती ॥ ८९ ॥
ऐसा सूक्ष्म मोड उमटे । अंतरीं सुखदुःख उठे ।
हें जाणावें ओखटें । कर्म तैजसाचें ॥ १४९० ॥
येथेंही अभ्यास बोलिजे ।तेणें रीती साधकें कीजे ।
मग तो मोडचि मुपजे । अहंकर्तृत्वाचा ॥ ९१ ॥
संकल्परूप जें स्फुरण । तेतें जे कां शुद्ध ज्ञान ।
सर्वकाळ अनुसंधान । इतुकेंचि राहे ॥ ९२ ॥
उठो कीं राहो संकल्प । त्यासी काज नसे अल्प ।
आपुला आपण चिद्‌रूप । साक्षी आत्मा ॥ ९३ ॥
स्फुरणासी मिथ्या पाहावें । साक्षिमात्रें आपणा घ्यावें ।
ऐसें चिरकाल अभ्यासावें । अहंकर्तृत्व निमे जों ॥ ९४ ॥
तें निमाल्याची ओळखण । देहासी घडतांही वर्तणें ।
अंतरीं नव्हेचि स्फुरण । मी कर्ता भोक्ता ऐसें ॥ ९५ ॥
पाप तरी खंती नुपजे । पुण्य होतां बरें नेणिजे ।
हेंही अंतरींच समजे । जयाचें तया ॥ ९६ ॥
धीटपणें भलतें करी । मुक्तपणा दावी वरी ।
परी स्मरतसे अंतरीं । बरें अथवा वाईट ॥ ९७ ॥
तो मोड जरी अंतरींचा । स्वानुभवेचि निमे साचा ।
तेव्हां करण्या न करण्याचा । साक्षी आपण ॥ ९८ ॥
अहंता करो वरिवरी । परी खेदचि नाहीं अंतरीं ।
ऐसा ग्रंथिभेद करी । तोचि तारी आपणातें ॥ ९९ ॥
मी कर्ता भोता निमे जरी । तोचि ज्ञाता गा निर्धारी ।
तैजस अभिमानाचे शिरीं । पाय देऊनि नाचतसे ॥ १५०० ॥
तेंएं सूक्ष्म ओलांडिलें । स्वप्नावस्थेतें त्यागिलें ।
स्वानुभव सुकाळीं पडिलें । ठाण बुद्धीचें ॥ १ ॥
ऐसे दों देहीं अभ्यास दोन । सदृढ राखी जो अनुसंधान ।
आणि अवधीही ओळखून । पाहे अंतरीं ॥ २ ॥
ऐसा न करितां अभ्यास । दृढ न आवे अपरोक्षास ।
शब्दज्ञानी परा गतीस । पावेल कैंचा ॥ ३ ॥
बाई मी गुरवीण होईन । फुकाचा नैवेद्य खाईन ।
कांहींच करणें नको शीण । स्वयंपाकाचा ॥ ४ ॥
तैसेंचि जेणें मानिलें । अभासासी अव्हेरिलें ।
घडिभरी श्रवण जरी केलें । वेदांताचें ॥ ५ ॥

तेणें मोक्षश्री वरीना । मिथ्या बद्धता जाईना ।
तरी हें साधकें अभ्यासलक्षणा । अगत्य आदरावी ॥ ६ ॥
देहतादात्म्य झालें दृढ । यास्तव वाटे हें अवघड ।
मीपणाचा झडतां मोड । तरी त्यासी हें सुगम ॥ ७ ॥
असो ऐसे देहद्वयाचे । अभिमानी निमाले साचे ।
लक्षण हेंचि ग्रंथिभेदाचें । जे अहंता चैतन्य मिळेना ॥ ८ ॥
ऐसी बद्धता निमाली । परी मुक्तदशा उरली ।
ते स्थिती जरी न्याहाळिली । तरी मूलाज्ञान असे ॥ ९ ॥
ध्येय जें ब्रह्म परिपूर्ण । तेंचि अंगें असतां आपण ।
ध्याता वेगळा त्यासी होऊन । ध्यान करी ॥ १५१० ॥
तस्मात् आपणासी नेणतां । ध्यानमिषें वेगळा होतां ।
तेंचि अज्ञान तत्त्वतां । नसतां द्वैत कल्पी ॥ ११ ॥
ब्रह्मसुखाच्या अनुभवें । ध्याता ध्यानेंचि सुखावे ।
तया अभिमानातें जाणावें । प्राज्ञ ऐसें ॥ १२ ॥
निजांगें आपण नाहीं झाला । द्वैतरूपें सेवी सुखाला ।
येथें निर्भयत्व पावला । नवचे साधक ॥ १३ ॥
जरी निजांगें ब्रह्म व्हावें । तरीच निर्भयत्व पावावें ।
यास्तव येथें अभ्यासावें । बोलिजे तैसें ॥ १४ ॥
दृश्य द्रष्टा एक कीजे । साक्ष्य साक्षी कालविजे ।
ध्याता ध्येयही ओळखिजे । एकरूपचि ॥ १५ ॥
दृश्यासी दृश्यत्व नाहीं । तरी द्रष्टा कोठें पाही ।
साक्ष्य जरी असे कांहीं । तरीच साक्षी होय ॥ १६ ॥
जयासी ध्य्ॐ जाय ध्याता । तेंचि आपण अंगें तत्त्वतां ।
ऐसें विचारें जाणता । ध्याता वेगळा नुरेचि ॥ १७ ॥
ध्याता तोचि आपण । साक्ष्य साक्षी ब्रह्म पूर्ण । दृ
श्य द्रष्टा चैतन्यघन । भेदचि नाहीं ॥ १८ ॥
ऐसा दृढ होतां निश्चय । मग दृश्याचें दिसणें जें होय ।
आणि भासाचा जरी प्रत्यय । तरी तें ब्रह्मरूप ॥ १९ ॥
नामरूपात्मक स्फुरण । उठतांचि तया ओळखून ।
तें तें मिथ्यात्वें विदारून । निजांगें व्हावें ॥ १५२० ॥
जें जें तत्त्व समोर भेटे । तें तें मीचि ऐसें वाटे ।
तरी मग द्वैताचें तुटे । मूळ अनायासें ॥ २१ ॥
पाणियवरी तरंग । तैसें आपणावरी जग ।
तरंगीं जल अभंग । तेवीं जगीं आपण ॥ २२ ॥
द्वैतभाव सांडूनि दूरी । आपणचि चराचरीं ।
ऐसा अभ्यास जो दृढ करी । निजांगें ब्रह्म होय तो ॥ २३ ॥
कोणतेही अवस्थेप्रती । नुमसे द्वैतप्रतीती ।
निःसंशयत्वें दृढमती । हेचि अवधि याची ॥ २४ ॥
ऐसा निजांगें ब्रह्म झाला । मग ज्ञानाज्ञान कोठें त्याला ।

येणें रीतीं हा निमाला। प्राज्ञाभिमानी ॥ २५ ॥
मी माझें असे जोंवरी। मुमुक्षुत्व जाणावें तोंवरी।
अहंममता निर्मूळ जरी। होतां मुमुक्षुत्व राहिलें ॥ २६ ॥
पुढें तया नांव साधक। ध्येयध्यानरूपें कौतुक।
तेंही निमोनि होय एक। निजांगें ब्रह्म ॥ २७ ॥
संशयरहित समाधान। होतां गळालें साधकपण।
तया सिद्ध हें अभिधान। बोलिलें असे ॥ २८ ॥
एवं मी माझें हेंचि बंधन। मुमुक्षु करी त्याचें अनन।
निःशेष जातां निपटून। तोचि मुक्त साधन ॥ २९ ॥
बद्धमुक्तदशा ऐसी। निमाली जरी एकरसीं।
तोचि ज्ञाता निश्चयेंसीं। स्वयें ब्रह्मरूप ॥ १५३० ॥
एवं झालें निरूपण। ये रीतीं अभ्यासी जो पूर्ण।
तो निजंगेंचि आपण। ब्रह्मरूप होय ॥ ३१ ॥
ब्रह्मरूप मुळींच आहे। परी विचारें कोणी न पाहे।
याकरितां हा लवलाहें। अभ्यास कीजे ॥ ३२ ॥
ऐसें जे कां न जाणती। तेचि मंदभाग्य निश्चितीं।
हेंचि बोलिजे अल्परीतीं। पुढील श्लोकीं ॥ ३३ ॥

ज्ञानमेकं सदा भाति सर्वावस्थासु निर्मलम्।
मंदभाग्या न जानंति स्वरूपं केवलं बृहत् ॥ ३० ॥

अवस्था तिहीं एकलें ज्ञान। निर्मळ निजस्वरूप पूर्ण।
केवल सदा भासमान। मंदभाग्य न जाणती ॥ ३४ ॥
बृहत् ब्रह्म अस्तित्वेंविषयीं। शब्दस्पर्शादिकांच्या ठायीं।
आणि अंतःकरणादि समुदायीं। चिद्रूप आत्मा ॥ ३५ ॥
जो जो विषयमात्र स्फुरे। तो तो जाणे निर्विकारें।
आत्मया न कळतां निर्धारें। कोणते कार्य होतें ॥ ३६ ॥
सर्व जागृतीचा जाणता। स्वप्नातें तोचि अवलोकिता।
सुषुप्तीमाजी टळटळिता। जाणे अज्ञाना ॥ ३७ ॥
एवं सर्व जेणें व्यापिलें। भोक्त्यादि भोग्यीं संचलें।
तेंचि निजरूप आपुलें। चिन्मात्र ज्ञान ॥ ३८ ॥
सर्वदा जाणे स्वप्रकाशें। सर्व जनांसी असतां ऐसें।
मंदभाग्यासी अज्ञान कैसें। कीं प्रगट असून दिसेना ॥ ३९ ॥
रज्जुदृष्टीनें पाहे। नेणता म्हणे सर्प आहे।
तेवीं ब्रह्मरूपासी लवलाहें ॥ नामरूपें कल्पिती ॥ १५४० ॥
आहे तें सांडून ब्रह्म। नाहीं तया ठेऊनि नाम।
पावती सुखदुःख परम। हा भ्रम तरी कैसा ॥ ४१ ॥
जयाच्या सत्तें असती। जयाच्या प्रकाशें वर्तती।
जयाच्या सुखार्थ विषय घेती। परी नेणती तया ॥ ४२ ॥

देह तरी अत्यंत मडें । तेथें ज्ञानप्रकाश पडे ।
हें नेणूनियां बापुडे । जाती देव धुंडावया ॥ ४३ ॥
असो मायेनें भुलविले । परतंत्रदशा पावले ।
शास्त्रसंपन्न जरी झाले । तरी हा भ्रम निरसेना ॥ ४४ ॥
ऐसी बद्धता हे नाथिली । ते कांहींशी निरूपिली ।
पुढील स्थिति ऐकिली । पाहिजे मुक्ताची ॥ ४५ ॥

संकल्पसाक्षिणं ज्ञानं सर्वलोकैकजीवनम् ।
तदस्मीति च यो वेद स मुक्तो नात्र संशयः ॥ ३१ ॥

संकल्पसाक्षी जें ज्ञान । हेंचि सर्व लोकांचें जीवन ।
तेंचि मी जया बाणे खूण । निःसंशयी मुक्त तो ॥ ४६ ॥
हा मनाचा संकल्प उमसे । साक्षी जाणेचि तयासरिसें ।
हा मी आत्मा स्वप्रकाशें । अनुभवी आपणा ॥ ४७ ॥
ऐसें जें प्रज्ञानघन । तेंचि या सर्वांचें जीवन ।
तरी सर्वांमाजी मीचि जाण एकला आत्मा ॥ ४८ ॥
येहें कोणी दुजा नाहीं । मीचि असें सर्वदाहा ।
ऐसें ज्ञान जया पाहीं । तोचि मुक्त निश्चयें ॥ ४९ ॥
मीच ब्रह्म सर्वदेशी । निश्चयरूप बुद्धी ऐसी ।
न इच्छितांही मुक्ती त्यासी । बळें माळ घाली ॥ १५५० ॥
तस्मात् देवदत्ता सावधान । मी देह हेंचि बंधन ।
मी ब्रह्म ते मुक्ति जाण । ओळखीं अंतरीं ॥ ५१ ॥
नामरूप मनासी भासे । जाण बंधाचें रूप ऐसें ।
ज्ञानें ब्रह्मचि विलसे । मुक्त स्थिति हेचि ॥ ५२ ॥
वृत्तीसहित ज्ञान स्फुरे । ते जीवन्मुक्ति निर्धारें ।
वृत्तीवीण समाधान बा रे । विदेहस्थिति ते ॥ ५३ ॥
तरी तूं टाकूनि संशय । ज्ञानरूप अससी अद्वय ।
बोलिल्या रीतीं निश्चय । ओळखीं अंतरीं ॥ ५४ ॥
देवदत्तें ऐकतां ऐसें । पुसूं आदरिलें मानसें ।
जीवन्मुक्तीचें लक्षण कैसें । सवृत्तिक ज्ञान ॥ ५५ ॥
परप्रकाशता वृत्तीसी । आत्मयासी जाणे कैसी ।
जो अगोचर वाणीमनांसी । तेथें वृत्तीज्ञान कैसें ॥ ५६ ॥
तोचि सर्वांगी जाणे । तयासी हें कोणी नेणे ।
तरी स्वानुभव जो होणें । तोचि कवणासी ॥ ५७ ॥
यासी कोणएं जी प्रमाण । कीं आत्मयासी करी ग्रहण ।
ऐसें शंकरें ऐकून । परम संतोष पावले ॥ ५८ ॥
सवृत्तिक जें ब्रह्मज्ञान । जीवन्मुक्ताचें लक्षण ।
पुढें कीजे निरूपण । अनुक्रमेंचि ॥ ५९ ॥

परी तुझिया गा अंतःकरणीं । कोण तत्त्वस्वरूप ग्रहणीं ।
हेंचि आधीं पाहें विचारूनी । ग्रहणाचें काज नको ॥ १५६० ॥
तरी आतां श्लोक दोन । हेंचि ऐकें निरूपण ।
स्वप्रकाशासी करी ग्रहण । ऐसें तत्त्व नाहीं ॥ ६१ ॥

प्रमाता च प्रमाणं च प्रमेयं प्रमितिस्तथा ।
तस्य भासावभासेत मानं ज्ञानाय तस्य किम् ॥ ३२ ॥

प्रमाता प्रमेय प्रमाण । आणि तयाचें वसतें स्थान ।
हें ज्याचे भासा भासमान । त्यासी प्रमाण कासया ॥ ६२ ॥
निर्विकल्पीं हें स्फुरण । जया नांव अंतःकरण ।
तयासी बोलिजे प्रमाण । चंचलरूपें ॥ ६३ ॥
त्यामाजी चैतन्य व्यापलें । त्याऐसें विकारी दिसलें ।
हेंचि प्रतिबिंबत्वें कल्पिलें । तोचि जीव प्रमाता ॥ ६४ ॥
अस्तित्वें जें ब्रह्मरूप । तेथें कल्पिलें नामरूप ।
शब्दस्पर्शादि अमूप । विषय तोचि प्रमेय ॥ ६५ ॥
एवं अंतःकरण प्रमाण । जीव तो प्रमाता जाण ।
प्रमेय ते विषय संपूर्ण । शब्दस्पर्शादि ॥ ६६ ॥
जया तिहींचेंही स्थळ । तो हा अन्नमय स्थूळ ।
तेथें राहूनियां सकळ । विषय सेविती ॥ ६७ ॥
ऐसे प्रमाण प्रमाता । प्रमेय प्रमिति जेणें सत्ता ।
भासती प्रकाशें तत्त्वतां । जयाचेनि ॥ ६८ ॥
तो हा आत्मा ज्ञानघन । सर्वांसी जाणताहे आपण ।
तयासी नेणतीच संपूर्ण । जडरूप तत्त्वें ॥ ६९ ॥
डोळा देखे घटासी । परी घट नेणे नेत्रासी ।
तैसा आत्मा जाणे सर्वांसी । सर्व नेणती तया ॥ १५७० ॥
हाचि अर्थ तुजला पुढें । श्लोकीं बोलिजे निवाडें ।
स्वप्रप्रकाश आणि जडें । प्रगट कळती ॥ ७१ ॥

अर्थाकारा भवेद् वृत्तिः फलेनार्थः प्रकाशते ।
अर्थज्ञानं विजानाति स एवार्थः परं स्मृतः ॥ ३३ ॥

वृत्ति होतां विषयाऐसी । जीव तयातें प्रकाशी ।
स्वप्रकाशें जाणे तिहींसी । अर्थ तोचि परमात्मा ॥ ७२ ॥
जो जो विषय येई समोर । वृत्ति व्यापी तदाकार ।
फेडोनि अज्ञान अंधकार । जीवें स्फुरे अमुक ऐसें ॥ ७३ ॥
वृत्तीसी ज्ञान स्फुरेना । तरी जीव पाहिजे विषयज्ञाना ।
प्रतिबिंब न पडे वृत्तिविना । तरी वृत्तिही पाहिजे ॥ ७४ ॥
एवं परस्परें साह्यभूत । जीव आणि वृत्ति स्फुरत ।

तेणें विषयाचें ग्रहण होत । ऐसा व्यापार तिहींचा ॥ ७५ ॥
कूटस्थ आत्माचि वृत्तिसी । व्यवहार कां न प्रकाशी ।
ऐसें जरी तूं कल्पिसी । तरी अवधारीं ॥ ७६ ॥
चंचलत्वें स्फुरण होय । उद्‌भवूनि होतो लय ।
त्यासवेंचि जीवही जाय । हारपोनियां ॥ ७७ ॥
यास्तव विकारी जीव । विशेषत्वें स्फुरवी सर्व ।
आत्मप्रकाश सदैव । लयकाळींही संचला ॥ ७८ ॥
तस्मात् प्रतिविंबयोगें वृत्ती । सर्व विषयांसी निवडिती ।
सामान्य प्रकाश आदिअंतीं । वृत्ति उद्‌भवलयाच्या ॥ ७९ ॥
एवं जीववृत्ति आणि विषय । इतुकाही भासतां समुदाय ।
आत्मा जाणें प्रकाशमय । सामान्यरूपें ॥ १५८० ॥
वृत्तिसहित सर्वांचा । निर्विकारें जाणता साचा ।
तोचि अर्थ बोलिजे वाचा । परशब्दें अगोचर ॥ ८१ ॥
ऐसीं सर्व तत्त्वें जड । आत्मा चैतन्यघन वाड ।
तेथें ग्रहंआचा पवाड । होईल कैंचा ॥ ८२ ॥
वृत्तीसी सांडूनि दूरी । शून्याचाही ग्रास करी ।
आत्मा आत्मपणें निर्धारीं । निश्चय कळावा ॥ ८३ ॥
वृत्तीनें ग्रहण करूं जातां । आत्मा अपरोक्ष केउता ।
वेगळा राहे अनुभविता । हें परोक्षज्ञान ॥ ८४ ॥
ध्याता जोंवरी वेगळा असे । तोअंवरी कर्तृतंत्रता दिसे ।
वस्तुरूप होतां आपैसें । तें अपरोक्ष ज्ञान ॥ ८५ ॥
येथें ही करिसी कल्पना । वस्तुतंत्र अपरोक्ष ज्ञाना ।
ज्ञाता वेगळा भिन्नपणा । असे तरी ऐक ॥ ८६ ॥
जों जों जाणों जाय ज्ञाता । तों तों वेगळा पडे तत्त्वतां ।
जाणणें नेणणें त्यागितां । तोचि आत्मा आपण ॥ ८७ ॥
बहुत कासया बोलावें । स्वरूपीं जाणणेंचि न संभवे ।
येथें विचारेंचि अभिन्न व्हावें । ज्ञान तेंही टाकूनि ॥ ८८ ॥
तुवां मागें पिउसिलें लक्षण । जीवन्मुक्ता सवृत्तिक ज्ञान ।
परी याचा अर्थ गहन । वृत्तीनें घेणें नव्हे ॥ ८९ ॥
अंगें वस्तुरूप झाला । संशय अवघा निमाला ।
मग जो कार्यभाग दिसला । तो तो आपणचि वाटे ॥ १५९० ॥
आपणामध्यें सर्व जग । कीं जगीं आपण अभंग ।
सर्वावस्थेमाजी उमग । वृत्ति ऐसी ॥ ९१ ॥
सवृत्तिक ज्ञान ऐसें । सर्व दिसतांही भेद नसे ।
स्वरूपीं वृत्तिग्रहण कैसें । संभवे बापा ॥ ९२ ॥
तथापि फिटावया अज्ञान । वृत्तिव्याप्तीचें प्रयोजन ।
असे तेंचि निरूपण । पुढील श्लोकीं ॥ ९३ ॥

वृत्तिव्याप्यत्वमेवास्तु फलव्याप्तिः कथं भवेत् ।

स्वप्रकाशस्वरूपत्वात् सिद्धत्वाच्च चिदात्मनः ॥ ३४ ॥

स्वरूपीं असो वृत्तिव्याप्ती । परी काज नसे जीवाप्रती ।
चिदात्मा स्वप्रकाश संवित्ती । सहज सिद्ध असतां ॥ ९४ ॥
देवदत्ता सावधान । सूक्ष्म येथींचें निरूपण ।
वृत्तिव्याप्तीचेंही कारण । अंगिकारिलें ॥ ९५ ॥
घटपट येतांचि दृष्टीसी । वृत्ति व्यापी तया जैसी ।
स्वरूपीं स्वरूपाकार तिअसी । योजितांचि होय ॥ ९६ ॥
पाणियावरी चक्र उमटे । अमर्याद धांवें नेटें ।
तैसें वृत्तीसीं स्वरूप भेटे । तेव्हां होय तयाऐसी ॥ ९७ ॥
चक्र जैसें वितळून जातां । पाणी पाणीपणें तत्त्वतां ।
तैसी वृत्तीसी लय होतां । मग आत्माचि उरे ॥ ९८ ॥
आधीं स्वरूपीं वृत्ति व्यापे । परी तत्क्षणींच ते हारपे ।
लवण जैसें सागरीं लोपे । पुढें अद्वय आत्मा ॥ ९९ ॥
ऐसी वृत्तीची व्यापकता । बाध नसे अंगीकारितां ।
परी जीवरूपें जो प्रमाता । नलगे व्याप्तीसी ॥ १६०० ॥
बाह्य पदार्थ अवघीं जडें । तेथें जीवाचें काज पडे ।
स्वप्रकाश चैतन्य उघडें । तेथें जीव कासया ॥ १ ॥
चक्षु दिवा मिळे जरी । घटाचें रूप दिसे तरी ।
दीप पहावया निर्धारीं । चक्षुचि एक पुरे ॥ २ ॥
तैसें जडविषीं या दोहींचें । काज असे वृत्तिजीवांचें ।
स्वप्रकाशालागीं साचें । वृत्तिच एक पुरे ॥ ३ ॥
जल तेथें प्रतिबिंब । वृत्ति तेथें जीव आतुडे ।
म्हणसी जरी ऐसें कोडें । तरी दडे जीवत्व ॥ ४ ॥
सूर्यप्रकाशीं जैसा दीप । प्रकाश करीना अल्प ।
तेवीं जीवाचें प्रतिबिंबरूप । मुख्य बिंबींच मिळे ॥ ५ ॥
जोंकाळ मुख्यबिंबाहूनी । वगळें असतां पाणी ।
प्रतिबिंबाचे झडपणी । दिसे तोंवरीच ॥ ६ ॥
पाणी बिंब एक होतां । कैंची उठे प्रतिबिंबता ।
जाणावें याचि दृष्टांता । निजस्वरूपीं ॥ ७ ॥
जोंवरी आत्मरूपाहूनी । वृत्ति असे भिन्नपणीं ।
तोंवरी जीवाची उभवणी । प्रतिबिंबत्वें ॥ ८ ॥
वृत्ति आणि बिंबात्मा । एकत्र मिळतो संगमा ।
तरी प्रतिबिंबरूपें भ्रमा । स्थान कंचें ॥ ९ ॥
एवं प्रतिबिंबरूप जीव । याचा निःशेष अभाव ।
वृत्तिव्याप्तीचा गौरव । असे कांहींसा ॥ १६१० ॥
वृत्ति योजितां निर्विकारीं । अज्ञानाची होय बोहरी ।
तेही होऊन स्वरूपाकारीं । वितुळे तत्क्षणीं ॥ ११ ॥
जरी वृत्तिव्याप्ति होये । परी अमुक ऐसें घेतां न ये ।

न घेतांही मिळून जावे । स्वरूपामाजी ॥ १२ ॥
आकाशीं वायु विरे । पुढें आकाशचि सारें ।
तेवीं चिन्मात्र ब्रह्म उरे । ग्रहणत्यागावीण ॥ १३ ॥
ऐसा निश्चय गा जयासी । अभिन्न होऊन एकरसीं ।
पावला पूर्ण समाधानासी । निर्विकल्परूप ॥ १४ ॥
पुढें उत्थानकालीं वृत्ती । त्याचि सुखा अनुभविती ।
हेचि जाणावी जीवन्मुक्ती । वासनानंदरूपें ॥ १५ ॥
वासना उठे किंवा निमे । व्यवहारे कीं विश्रामे ।
ज्ञाता पडेना संभ्रमें । भिन्नत्वाच्या ॥ १६ ॥
तयाचा निश्चय हा कैसा । अल्पत्वें बोलूं कांहींसा ।
नसे भेदाचा वळसा । कोणते काळीं ॥ १७ ॥
मी अनंत परिपूर्ण । चैतन्यसागर गहन ।
तेथें वृत्तीचें स्फुरण । लहरी जैसी ॥ १८ ॥
उठतांचि चैतन्य खचित । त्यामाजी विश्व हें उमटत ।
परी तेंही पाहे निश्चित । अतिभातित्वें ॥ १९ ॥
आतां वृत्ति हे जरी उठे । तरी आपण आपणा भेटे ।
पुन्हां जरी ते ओहटे । तरी केवळ आत्मा ॥ १६२० ॥
वृत्तीचा उद्भव अथवा लय । होतांही आपण अद्वय ।
जीवन्मुक्त निःसंशय । क्रीडे येणें रीतीं ॥ २१ ॥
ग्रहणावीण वृत्तीसहित । अभिन्नपणें जीवन्मुक्त ।
सांगितला अल्प संकेत । हृदयीं धरीं ॥ २२ ॥
आतां कैसी विदेहस्थिती । सांगत असों तुजप्रती ।
तेचि उन्मनी निश्चितीं श्लोकार्थीं कळे ॥ २३ ॥

अर्थादर्थे यथा वृत्तिः गतुं चलति चांतरे ।
अनाधारा निर्विकारा या दशा सोन्मनी स्मृता ॥ ३५ ॥

उभयविषयांचें अंतर । मध्यसंधि निर्विकार ।
जे वृत्तिदशा अनाधार । ते उन्मनी बोलिजे ॥ २४ ॥
विषय पावतां दृष्टीसी । अमुक ऐसें कल्पी मानसीं ।
विशेषत्वें म्हणावें त्यासी । विकाररूपें ॥ २५ ॥
प्रथ विषयवृत्तीनें । सांडूनि दुजियावरी जाणें ।
तोचि संधि अवलोकणें । सूक्ष्म विचारें ॥ २६ ॥
पहिला विषय टाकिला । दुजा जोंवरी नाहीं घेतला ।
तया अनाधार वृत्तीला । उन्मनी ओळखिजे ॥ २७ ॥
जेथें मन असे समान । विकाराचें नव्हे भान ।
हेंचि उन्मनीचें लक्ष्मण । सप्रतीत पाहें ॥ २८ ॥
डोळा देखे सहजगती । अमुक ऐसी नव्हे स्फूर्ती ।
सामान्यत्वें स्वयंज्योती । प्रकाशी ते उन्मनी ॥ २९ ॥

निर्विकल्प ब्रह्मरूप। जेथें उद्भवेना नामरूप।
सागरीं लवण जैसें अल्प। वेगळें न निघे॥ १६३०॥
तैसेंचि ज्ञात्याचें मन। उमसूं न लाहे भिन्न।
तया उन्मनीतें अभिधान। वेदेहस्थिति॥ ३१॥
जो निश्चय जीवन्मुक्ताचा। तोचि निश्चय असे याचा।
परी सविकल्प निर्विकल्पाचा। मात्रचि भेद॥ ३२॥
विश्व हें आहे कीं नव्हे। वृत्ति गेली कीं उद्भवे।
हें जयासी नाहीं ठावें। ते विदेहस्थिति॥ ३३॥
ब्रह्मरूप आपण आहे। ऐसी वृत्ति जाणों न लाहे।
कोणताचि संशय न राहे। ते विदेहस्थिति॥ ३४॥
ब्रह्म तरी आठवे चित्तीं। परी मी ऐसी नव्हे स्फूर्ती।
भिन्नत्वाची झाली समाप्ती। विदेहस्थिति ऐसी॥ ३५॥
तैसेंचे डोळां देखे विश्व। परी उमसूं नेदी रूप नाअंव।
भिन्नत्वाचा पुसुला ठाव। ते विदेहस्थिति॥ ३६॥
हें सर्व कीं मी एक;ला। हेंही स्फुरेना तयाला।
देह पडला कीं क्रीडला। नेणेचि तो॥ ३७॥
जैसी देहबुद्धि गेली। तेवीं ब्रह्मबुद्धि मावळली।
पुढें स्थिति जे उरली। ते बोलतां न ये॥ ३८॥
स्मरण तैसें विस्मरण। पाहणें तैसें न पाहणें।
व्यवहार तैसें उगेपण। भेदचि नाहीं॥ ३९॥
प्रवृत्ति तैसी निवृत्ति। उद्भव तैसी समाप्ती।
ऐसी जे कां अभेदस्थिति। हे विदेह मुक्तदशा॥ १६४०॥
एवं सवृत्तिक जीवन्मुक्ति। निर्विकल्प वेदेहस्थिति।
देवदत्ता हे तुजप्रति। अभेदरीती सांगितली॥ ४१॥
हेंचि तुजसी दृढ व्हावें। ऐसे बोलिजेतें बरवें।
जीं जीं भासती रूपनांवें। तीं तीं ब्रह्मरूप॥ ४२॥
मातीवीण नव्हे घट। तंतूवीण नव्हे पट।
तरी घटपट सांडूनि अवीट। माती तंतू जाणावे॥ ४३॥
ऐसें अन्वयाचें रूप। बोलिजे तुजसी अल्प।
तेणें कळेल आपेंआप। मुक्तदशा ही॥ ४४॥
ब्रह्मरूप हें आघवें। भिन्न यासी रूपचि नव्हे।
तीं श्लोकीं निरूपण बरवें। ऐकें सावध॥ ४५॥
प्रथम चित जया नांव। चिद्रूपचि याचा स्वभाव।
भेदकल्पना ते वाव। मुळींच नाहीं॥ ४६॥

चित्तं चिच्च विजानीयात् तकाररहितं यदा।
तकारो विषयाध्यासो जपारागो यथा मणौ॥ ३६॥

ज्या क्षणीं तकार लोपे। त्या क्षणीं चित्त चिद्रूपें।

तकार विषयाध्यास रूपें। स्फटिकीं जेवीं रक्तरूप॥ ४७॥
कापुसासी पीळ पडे। तयासी तंतू नांव जोडे।
परी आंतबाहेरी कोडें। कापुस अवघा॥ ४८॥
तैसें ब्रह्मस्फुरण। तया नांव पडिलें भिन्न।
परी तें पाहतां विचारून। स्वरूपावीण काय॥ ४९॥
अज्ञानें नांव ठेविलें। चिद्रूपा चित्त कल्पिलें।
तें नामचि एक केलें। तरी रूप तो एक॥ १६५०॥
एक तकार पडिला अधिक। तेणें भासली वेगळीक।
तें सांडून पाहतां एक। चित्त तें चिद्रूपें॥ ५१॥
एक मात्राचि पुसिली। तेणें मोत्याची माती झाली।
तेवीं सकारें व्यक्ति कल्पिली। वेगळी चित्ताची॥ ५२॥
तकार तोचि विषयाध्यास। जो कां भासे अन्यथाभास।
सांडूनि आपुल्या उगमास। विषयाकार झालें॥ ५३॥
अध्यास म्हणजे नव्हे खरा। वाउगा दिसे भास सारा।
आरक्त दिसे श्वेत हिरा। जपाकुसुमीं॥ ५४॥
रक्तपुष्प केलें वेगळें। तरी श्वेतमणि ऐसा कळे।
तेवीं तकार सांडितां निवळे। चिद्रूप चिद्रूपत्वें॥ ५५॥
तंतू अवघाचि कापुस। नाहीं सूतपणा लवलेश।
तेवीं स्फुरणालागीं भास। चिद्रूपेंवीण केवीं॥ ५६॥
चित्त एक उपलक्षण। परी चतुर्विध अंतःकरण।
आणि इंद्रिये तेंही उपकरण। जें साधन भोक्त्याचें॥ ५७॥
इतुक्यांचेही वेगळे भाव। पुसून टाकीं रूप नांव।
एकलाचि स्वयमेव। ज्ञानरूप आत्मा॥ ५८॥
वेगळें यासी रूप नाहीं। आहे तें असे सर्वदाही।
नामें मात्र ठेविलीं तीं हीं। ओळखून सांडावीं॥ ५९॥
पाणियाचेअम्वि अंग। नाम पावलें तरंग।
तेवीं आत्मा हा असंग। नानात्वें कल्पिला॥ १६६०॥
तस्मात् वाउगा हा विकार। नसतांचि झाला भासमात्र।
परी हा जाणावा निर्विकार। चिद्रूप आत्मा॥ ६१॥
केवळ भोक्ताचि चिद्रूप आहे। ऐसें हें बोलणें नव्हे।
भोग्यादि जें जें दिसताहे। तेंही ब्रह्मरूप॥ ६२॥
तकारें झालें जैसें चित्त। त्याचि चित्ताचें हें निर्मित।
तेंही ब्रह्मरूप निश्चित। बोलिजे श्लोकीं॥ ६३॥

ज्ञेयवस्तुपरित्यागात् ज्ञानं तिष्ठति केवलम्।
त्रिपुटी क्षीणतामेति ब्रह्मनिर्वाणमृच्छति॥ ३७॥

विषयमात्रांचा करितां त्याग। केवल ज्ञान उरे मग।
त्रिपुटीचा होतांचि भंग। अंगें ब्रह्म होतसे॥ ६४॥

अहंब्रह्म जें स्फुरण । तयाचेंचि नसतां ज्ञान ।
तेंचि भिन्नत्वें विभागून । विषयाकार झालें ॥ ६५ ॥
पहिलें केवळ सद्रूप । त्यावरी कल्पिला आरोप ।
शब्दस्पर्शादि नामरूप । ठेविली असती ॥ ६६ ॥
आपण ब्रह्म हें कळेना । विषय ब्रह्मही निवळेना ।
भिन्नत्व कल्पिलें आपणा । विषयाअंसहित ॥ ६७ ॥
आपण आत्मा हें जाणिकें । चित्त जेव्हां चिद्रूप झालें ।
मग विषय तेही देखिले । ब्रह्म चिन्मात्र ॥ ६८ ॥
कापुसाचा तंतू झाला । आडवा उभा विणिला ।
पट हें नाम आलें त्याला । परी तो कापूस ॥ ६९ ॥
तैसें चिद्रूप तेंचि चित्त । त्याचें कल्पित विषयाजात ।
तें तें ब्रह्मरूप समस्त । नानारूप त्यागूनि ॥ १६७० ॥
पटीं ओळखावा तंतू । कापूस ओळखावा त्यांतू ।
तेवीं विषयामाजी चित्तू । ओळखावें आधीं ॥ ७१ ॥
तेंचि चित्त चिद्रूप । तरी विषय कैंचा नामरूप ।
तस्मात् ज्ञेयामाजीही अल्प । भेदचि नाहीं ॥ ७२ ॥
एवं विषयनाम हें सांडितां । केवल ज्ञान उरे तत्त्वतां ।
तळटळीत चिद्रूपता । देखे पदार्थमात्रीं ॥ ७३ ॥
पदार्थ अवघे चिद्रूप । तरी कोठें विषयासी रूप ।
भासलें होतें जें अल्प । तेंही नष्ट झालें ॥ ७४ ॥
ऐसा विषयाचा अभाव । भोक्ता तोही समूळ वाव ।
तरी भोगालागीं ठाव । असे कैंचा ॥ ७५ ॥
ज्ञेय सर्व मिथ्या झालें । ज्ञात्याचें भान गळालें ।
तरी मग ज्ञान उरलें । असे कोठें ॥ ७६ ॥
प्रमेयासी रूप नसतां । उद्भवेचि ना प्रमाता ।
तरी मग प्रमाणाची वार्ता । नाहींच नाहीं ॥ ७७ ॥
कार्यजात निःशेष नाहीं । कर्ताही उद्भवेना कंहीं ।
तरी मग करणें पाहतां तेंही । मिथ्याचि रूप ॥ ७८ ॥
दृश्य जरी मिथ्या अवघें । द्रष्टा इष्टपणें नेघे ।
तरी मग शून्याचें घर रिघे । दर्शन तेंही ॥ ७९ ॥
एवं त्रिपुटी होतां क्षीण । सहज उरे ब्रह्म पूर्ण ।
ऐसें पावती निर्वाण । विचारें सर्व ॥ १६८० ॥
पावावया जाणें नलगे । आधींच आहे तें निजांगें ।
नामरूपाचीं जातां सोंगें । विषयादि ब्रह्म ॥ ८१ ॥
मनमात्र असे जोंवरी । विश्व हें दिसे तोंवरी ।
ते मनचि निमालें जरी । तरी हें ब्रह्मरूप ॥ ८२ ॥
हेंचि आतां श्लोकाआंत । बोलिजेतें गा निभ्रांत ।
सावधान असावें चित्त । एकाग्रभावें ॥ ८३ ॥

मनोमात्रमिदं सर्वं चिन्मनो ज्ञानमात्रकम् ।
अज्ञानभ्रम इत्याहुः विज्ञानं परमं पदम् ॥ ३८ ॥

विश्व हेंचि असतां मन । संकल्पहीन तेंचि ज्ञान ।
विकार तो भ्रम अज्ञान । विज्ञान तें परम पद ॥ ८४ ॥
देवदत्ता हीं नामरूपें । नसतां कल्पिलीं जगरूपें ।
हें अवघें जाण पडपें । एकल्या मनाचें ॥ ८५ ॥
होय नव्हे करी मन । त्यासी साह्य झाला अभिमान ।
तेणें जगद्रूप संपूर्ण । सत्यचि केलें ॥ ८६ ॥
ऐसा निश्चय बळावला । तेंचि चिंतूंही लागला ।
यास्तव येथें भास झाला । लोपोनि स्वरूप ॥ ८७ ॥
तस्मात् मनाचा अंकुर । यासी ओळखीं गा निर्धार ।
जो निर्विकारीं विकार । बळेंचि लावी ॥ ८८ ॥
ऐसें मन जोंवरी असे । तोंवरीच हें विश्व दिसे ।
त्या मनाचा अंकुर नासे । तरी लोपे नामरूप ॥ ८९ ॥
जेवीं सुषुप्तिमाजी मन । नसतां कोठें जगभान ।
तस्मात् ब्रह्म हें ओळखून । मनचि मोडावें ॥ १६९० ॥
मन हें कैसें मोडावें । म्हणसी ऐसें स्वभावें ।
स्फुरण चिद्रूपें पाहावें । संकल्पावीण ॥ ९१ ॥
होय नव्हे जें जें करी । इतुकेंचि मन हें विकारी ।
ब्रह्मचि ऐसा निश्चय धरी । तरीच मोडे हें मन ॥ ९२ ॥
ब्रह्मचि असे एकलें । होय नव्हे करणे गेलें ।
हेंचि जाणावें मन मेलें । संकल्प सांडितां ॥ ९३ ॥
मग चिन्मात्र उरे स्फुरण । नव्हे द्वैतरूप जगभान ।
तरी तयासी म्हणावें ज्ञान । मन नाम गेलें ॥ ९४ ॥
मन हें नांव आलें अंतरीं । जग नाम कल्पिलें बाहेरी ।
ऐसिया अज्ञानभ्रमपुरीं । वाहतचि गेले ॥ ९५ ॥
तस्मात् भ्रम हा सांडूनी । मीचि ब्रह्म सर्वपणीं ।
पाहसी ऐसें अनुदिनीं । तरी ज्ञान तेंहेंचि ॥ ९६ ॥
ऐसा निश्चय दृढ होतां । भेद अवघा मावळतां ।
ज्ञानस्फुरणही तत्त्वतां । गळे आपेंआप ॥ ९७ ॥
पुढें अखंड एकरस । परब्रह्मचि अविनाश ।
ज्ञाते बोलत असती त्यास । परमपद विज्ञान ॥ ९८ ॥
देवदत्ता तूं हें ऐसें । निश्चयें धरीं मानसें ।
नामरूपाचें सांडीं पिसें । जीवेशांसहित ॥ ९९ ॥
देवदत्तें हें ऐकोनी । पुसूं आदरिलें मनीं ।
जी जी ईश्वर सर्वज्ञपणीं मिथ्या कैसा ॥ १७०० ॥
ऐसें शंकरें ऐकिलें । देवदत्ता सावध वहिलें ।
तुझें मन मायेंत गुंतलें । भीड नुल्लंघिसी ॥ १ ॥

तरी आतां सावधान । श्लोकार्थीं घालावें मन ।
माया जग जीव ईशान । मिथ्याचि अवघे ॥ २ ॥

अज्ञानं चान्यथाज्ञानं मायामेतां वदंति ते ।
ईश्वरं मायिनं विद्यान्मायातीतं निरंजनम् ॥ ३९ ॥

अज्ञान आणि अन्यथाज्ञान । इतुकें मायेचें लक्षण ।
जाणिजे मायावी ईशान । निरंजन तया अतीत ॥ ३ ॥
ब्रह्म सच्चिदानंद नेणें । आत्माचि ब्रह्म न होणें ।
हीं अज्ञानाचीं लक्षणें । पाहें ओळखुनी ॥ ४ ॥
स्वरूपीं व्यर्थ कल्पी जग । जीव ईश्वराचें सोंग ।
हेंचि अंतरीं उमग । अन्यथाज्ञान ॥ ५ ॥
अन्यथाज्ञान आणि अज्ञान । यांसीच माया हें अभिधान ।
जयेचे स्वरूपाची खूण । स्वपुष्पापरी ॥ ६ ॥
या शब्दें हें इतुकें । भासताती नामरूपकें ।
तें नाहींच ऐसें कौतुकें । मा शब्देंचि बोले ॥ ७ ॥
ऐसी मायाच मायेतें । मिथ्यात्व साधी नामसंकेतें ।
नामेंवीण इचे रूपातें । ठावचि नाहीं ॥ ८ ॥
अज्ञान अन्यथा ज्ञानासी । आकार नसे या कार्यासी ।
कारणरूप मायाही तैसी । मिथ्याचि असे ॥ ९ ॥
तया मायेमाजी बिंबलें । ईश्वर त्यासी नाम आलें ।
सर्वज्ञत्वादि उमटले । धर्मही तेथें ॥ १७१० ॥
केवळ सुविद्या उपाधी । ज्ञानचि स्फुरे अनवधी ।
अज्ञान नातळेचि कधीं जीवा ऐसें ॥ ११ ॥
परी अन्व्हे वास्तविक । म्हणोनि बोलिजे मायिक ।
मायेसहित आवश्यक नाशचि आहे ॥ १२ ॥
ईशाचेनि सत्यपणें । जग जीवही सत्य होणें ।
सच्चिदादि ब्रह्मलक्षणें । प्रगट न होती ॥ १३ ॥
सर्पभान खरें असतां । रज्जुज्ञान न ये हाता ।
देवीं नामरूपें सत्य होतां । सच्चिदानंद कोठें ॥ १४ ॥
यास्तव ईश्वर हें नाम । निजरूपी अन्यथा भ्रम ।
या भ्रमासी अतीत परम । निरंजन आत्मा ॥ १५ ॥
मायेसी सत्यत्व असावें तरी प्रतिबिंब सत्य व्हावें ।
तस्मात् मिथ्यात्व ओळखावें । जीवाचेपरी ॥ १६ ॥
लेंकुरांचिया समाजा । जैसा रंक तैसा राजा ।
तेणें रीती भाव दुजा । नसेचि येथे ॥ १७ ॥
ईश्वरसी सत्व म्हाणसी । बळेचि कल्पिसी भेदासी ।
तरी अभेद समाधानासी । पावसी कैसा ॥ १८ ॥
हा सांख्याचा सिद्धांत । येणें लागू पाहे द्वैत ।

तरीं हें सांडीं गा दुर्मत । अभेदब्रह्म होई ॥ १९ ॥
नामरूप गेलिया । तूंचि अवघा शिष्यराया ।
तेथें भिन्न असे कोठोनियां । ईश्वर तुजहूनि ॥ १७२० ॥
नट जैसा आणी सोंग । केव्हां ब्राह्मण केव्हां मांग ।
परी उंच नीच हा भाग । नटासी कैंचा ॥ २१ ॥
तैसा जड जीव ईश्वर । हा तुझा अन्यथा प्रकार ।
उंच नीच ऐसा विकार । नसतां तूंचि सर्व ॥ २२ ॥
अगा ऐसें अभेदज्ञान । सांडूनि कल्पिसी भेदमान ।
तरी मन कैंचें समाधान । अवीट राहे ॥ २३ ॥
तरी आतां ऐसें पाहें । हें सर्वही मीच आहें ।
परा नामरूपचि न साहे । सर्वपणाचें ॥ २४ ॥
ऐसा परिपूर्ण अभंग । एकलाचि तूं निःसंग ।
अभेदभक्ती हे उमग । वेदांतसिद्ध ॥ २५ ॥
ऐसें समाधान दुजें । ञ~मेंवींअ कोठें लाहिजे ।
हें एक ज्ञानियाचि साजे । राजचिन्हें राजिया ॥ २६ ॥
ज्ञानाऐसें दुसरें नाहीं । परम सुगम ज्ञान पाहीं ।
पडिलें देहबुद्धिप्रवाहीं । तयांमात्र कठिण ॥ २७ ॥
ज्ञान हें पवित्र । ज्ञान हें परम स्वतंत्र ।
धन्य धन्य ते सत्पात्र । जे लाहती ज्ञाना ॥ २८ ॥
ऐसें ज्ञान हें सांडूणी । जे पडती अन्यसाधनीं ।
तयां हतदैवांची मनीं । खंती वाटे ॥ २९ ॥
ज्ञानेंवीण मोक्ष जोडे । हें कालत्रयीं न घडे ।
ऐसे असतांही वेडे । पडती अन्य साधनीं ॥ १७३० ॥
बहु बोलणें हें काय । केलें तितुकें व्यर्थ जाय ।
ज्ञानेंवीण दुजा उपाय । नाहींच नाहीं ॥ ३१ ॥
हेंचि आतां दृढ कीजे । भव हा वृष्टिरूपें बोलिजे ।
प्रबोधवायु न लाहिजे । तरी हा निमेना ॥ ३२ ॥

सदानंदे चिदाकाशे मायामेघस्तडिन्मनः ।
अहंता गर्जनं तत्र धारासारो हि यत्तमः ॥ ४० ॥
महामोहांधकारेऽस्मिन् देवो वर्षति लीलया ।
अस्या वृष्टेर्विरामाय प्रबोधैकसमीरणः ॥ ४१ ॥

चिदानण्ंद शुद्ध गगन । तेथें माया मेघ वीज मन ।
अहंता हे मेघगर्जन । अज्ञान अंधकार ॥ ३३ ॥
महामोह अंधारांत । लीलेनें देव वृष्टि करीत ।
प्रबोधवायु जरी प्राप्त । तरी हे वृष्टि वितुळे ॥ ३४ ॥
सच्चिदानंद ब्रह्म सधन । शुद्ध बुद्ध परिपूर्ण ।
शून्यावांचूनियां गगन । जें अखंड एकरस ॥ ३५ ॥

ऐसिया गा चिदाकाशीं। माया उद्‌भवे मेघाऐसी।
परी विकार चिद्‌गगनासी। बोलोंचि नये॥ ३६॥
मेघ गगनीं एकदेशी। विकाररूपें माया तैसी।
जगवृष्टीचे उद्‌भवासी। जे कां कारण॥ ३७॥
मेघांमाजी जें चमके। विद्युल्लता हें मन निकें।
उद्‌भवूनियां असिकें। नासे तत्क्षणीं॥ ३८॥
अहंता हे देहबुद्धीची। हेचि गर्जना मेघाची।
उमसूं नेदी कांहींचि। सद्‌भुद्दिविचार॥ ३९॥
ऐसिया मेघमंडपीं। अज्ञानतमाची झांपी।
गडद पडली तया मापी। ऐसा कवण॥ १७४०॥
महामोह खडतरला। अज्ञानतमी मिसळला।
तेणें अंधकार दाटला। निबिडपणें॥ ४१॥
ऐसा दाटला अंधार। वृष्टि करिताहे ईश्वर।
अथवा देवशब्दें होणार। कर्म जीवाचें॥ ४२॥
सुखदुःखद्वंद्वें अपार। पर्जन्यधारा पडती सैर।
पापपुण्याचा महापूर। प्रवाह चालिला॥ ४३॥
मेघें आकाश झांकोळे। वरी अज्ञान अंवसेचें काळें।
मग असतांही ज्ञान डोळे। न दिसे कांहीं॥ ४४॥
मग वीज चमके जेव्हां। गपगपां डोळे झंकती तेव्हां।
झांपडी पडे स्वानुभवा। बहिर्मुखत्वें॥ ४५॥
मनाचा अंकुर जैं मोडे। पूर्व रीतीं गडद पडे।
तेव्हां कैंचा दृष्टी आतुडे। ज्ञानप्रकाश॥ ४६॥
अहंकार हा खवळला। मी मी म्हणतचि उठिला।
ऐकतां तया गर्जनेला। कानटाळी॥ ४७॥
अहंतेचे गर्जनेपुढें। जीव भ्रमून झाले वेडे।
सच्छास्त्र शब्द कानीं न पडे। सहसा कांहीं॥ ४८॥
वरी सुखदुःखांच्या धारा। रिचवताती एकसरा।
नाहीं विश्रांतीसी थारा। निजसुखा मुकले॥ ४९॥
खालीं पाणी वरती गारा। सुखदुःखें आदळती शिरा।
कामज्वरें कांपती थरथरां। वायु चढे मस्तकीं॥ १७५०॥
एक प्रवाहीं वाहती। एक खडकीं अडकती।
एक शाखा अवलंबिती। प्रपंचवृक्षाच्या॥ ५१॥
स्त्रीपुत्रादि सर्व सुसरी। ओढिती बळें मोहविवरीं।
गळा येऊनि मिठी मारी। ममताधामीण॥ ५२॥
एक पाताळविवरीं दडाली। क्रोधाजगर तेथें आले।
मदमत्सरींही वेष्टिले। सर्पादिकीं॥ ५३॥
एक चढे स्वर्गादिशिखरीं। तेथें लोभ व्याघ्र महाभारी।
सुखदुःखें आदळती शिरीं। थारा न मिळे॥ ५४॥
एवं ऐसी दुर्धर वृष्टी। अडकती वाहती होती कष्टी।

घाबरून कंठी घालिती मिठी । एकमेकांच्या ॥ ५५ ॥
प्रवाहगतीनें एकत्र होती । तया माझें माझें म्हणती ।
विघड होतां बोंबलती । माझें गेलें म्हणोनी ॥ ५६ ॥
ऐसी वृष्टी महाथोर । अखंड वर्षे अपार ।
येथून सोडविता नर । कोणी आढळेना ॥ ५७ ॥
अवघी पहापूरीं पडिले । कोण कोणासी काढी वहिलें ।
सुखदुःखेंचि भांबावले । अज्ञानांधारीं ॥ ५८ ॥
या वृष्टीचे विरामासी । मूर्ख प्रवर्तले साधनासी ।
नागवे होऊन पोळविती त्यासी । तैसें वरिवरी भजन ॥ ५९ ॥
खालीं पादरक्षा ठेविती । वरवंटा तेथें बैसविती ।
दुसरी पादरक्षा गळती । बांधिती वरी ॥ १७६० ॥
तेवीं प्रतिमेच्या पूजनें । वृष्टी हे न राहे तेणें ।
जप आणि अनुष्ठानें । परी हे निमेना ॥ ६१ ॥
एक महाहटेंकरून । बळें बांधिती पर्जन्य ।
एक करिती दान यज्ञ । तेणें अधिक वाढे ॥ ६२ ॥
एक पडिले नानामतीं । जेवीं वोसणामाजी शिरती ।
न लागती गारा ऐसें म्हणती । आम्ही निर्भय ॥ ६३ ॥
एकासी योगशास्त्र डेरा । म्हणती लाधला आम्हां थारा ।
बळें घुसती त्यामाझारा । म्हणती वृष्टी कोठें ॥ ६४ ॥
सांख्यभोपळा एकासी । लाधला तेणें सुख मानसीं ।
पोंहती बांधून कमरेसी । प्रवाहामाजी ॥ ६५ ॥
द्वैतभक्तीची फुतकी नाव । लाहतां मानिती आम्ही सएऐव ।
धन्य आमुचा ऋणी देव । दृढभाव आम्हांसी ॥ ६६ ॥
परी तेणें वृष्टी निमेना । अभेदज्ञान हें लाहेना ।
असो ऐसें अन्यसाधना । काजचि नको ॥ ६७ ॥
प्रबोधवायु जरी सुटे । तरीच वृष्टी वितळून फाटे ।
प्रवाहरूप पाणी आटे । तत्क्षणींचि ॥ ६८ ॥
सुटतां बोधवायूची झुळी । मेघमाया कांपे चळीं ।
अहंतेसी दांतखिळी । पडे तेव्हां ॥ ६८ ॥
मग राहतांचि गर्जना । उमसूं नेदी चपळ मना ।
महावातें झडपितां जाणा । मायामेघ वितुळे पैं ॥ १७७० ॥
माया निमतांचि कारण । वृष्टिकार्य उरे कोठून ।
सुखदुःखादि पापपुण्यें । एकसरां निमालीं ॥ ७१ ॥
आपण आकाश चैतन्यघन । द्वैतरहित या नांव ज्ञान ।
हाचि महाप्रभंजन । प्रलयकाळींचा ॥ ७२ ॥
स्वप्रकाश प्रगटतां तरणी । अज्ञानतमाची सकार्य हानी ।
झाली भेदाची धूळधाणी । जीवेशांसह ॥ ७३ ॥
बंध मोक्ष दोन्ही निमाले । सुखदुःख त्यांसवें गेलें ।
मग केवळ निजसुख उरलें । निर्भय समाधान ॥ ७४ ॥

एवं ऐसा बोध अनिळ । मायामेघादिकांचा काळ ।
वृष्टिविरामार्थ केवळ । हाचि एक ॥ ७५ ॥
यासी साह्य कोणी नलगे । एकलाचि वीर एकांगें ।
सिंहापुढें जैसीं कागें । तेवीं अन्य साधनें ॥ ७६ ॥
असो तुजला देवदत्ता । बोध हा उपदेशिला आतां ।
जेणें द्वैतभेदाची वार्ता । नुरे किमपि ॥ ७७ ॥
ऐसें अभेदरूप ज्ञान । निःसंशय करीं जतन ।
नामरूपावरी शून्य । घालीं हातें ॥ ७८ ॥
जग जीव आणि ईश्वरू । जितुका नामाचा प्रकारू ।
सत्यत्वें भेद नको करूं । निर्विकारू तूं आत्मा ॥ ७९ ॥
तूचि एक ब्रह्म अद्वय । हेंचि समाधान निर्भय ।
आतां सांडीं गा संशय । आज्ञा आमुची ॥ १७८० ॥
ऐसी ऐकतां अमृतवाणी । देवदत्ता विस्मय मनीं ।
सद्गद होऊनी लागे चरणीं । म्हणे धन्य गुरुवर्या ॥ ८१ ॥
धन्य धन्य वेदांतसार । धन्य धन्य हा सद्विचार ।
धन्य धन्य आमुचें भाग्य थोर । जें लाधलो महासुखा ॥ ८२ ॥
मीच एक आत्माराम । कोठें जीवशिवादि नाम ।
मायेचें मडें जालें भस्म । तुमचिये कृपें ॥ ८३ ॥
आतां भेदचि नाहीं उरला । निःसंशय प्रत्यय बाणला ।
अवघा ब्रह्मगोळ दाटला । माझिये पुष्टपणें ॥ ८४ ॥
एवढा पूर्ण मी असतां । भ्रमीं गुंतलों नेणतां ।
व्यर्थ मृगजळीं बुडतां । काढिलें स्वामी ॥ ८५ ॥
निजसुखराज्यासी अंतरलों । सुखदुःख भीक मागों गेलों ।
तों तुम्ही पुन्हां बैसविलो । साम्राज्यसिंहासनीं ॥ ८६ ॥
आतां मुखें करूं स्तवन । तरी वाच्य वाचक नव्हे दोन ।
भेदचि जासी खाऊन । तरी स्तवूं कैसा ॥ ८७ ॥
तुज जरी नमूं जावें । तरे चरण मस्तक भेद नव्हे ।
वंद्यवंदकाच्या नांवें । घातलें शून्य ॥ ८८ ॥
जरी आतां मनें स्मरूं । तरी मनासी भेद केवीं करूं ।
बाह्यांतरीं तूं सद्गुरु । आतां भिन्न मी कैंचा ॥ ८९ ॥
एवं स्तुति स्मरण वंदन । तुझ्या ठायीं न चले जाण ।
जेथें भेदें वाहिली आण । वचारासहित ॥ १७९० ॥
असो ऐसा तूं भेदरहित । निर्विकार सदोदित ।
मजसी मेळविलें आपणांत । निजकृपाकटक्षें ॥ ९१ ॥
तरंग मेळविला जीवनीं । कीं स्फुल्लिंग मिळे अग्नीं ।
तेवीं मी एक कृपापाणी । मिळालों स्वरूपीं ॥ ९२ ॥
ऐसा कोण असे दाता । दासालागीं निजपद देता ।
असो तूंचि तूं गाअनंता । उपमेरहित ॥ ९३ ॥
शकंरें ऐसें जाणितलें । त्यासी सामाधान बाणलें ।

धांवोनि पोटासीं धरिलें । देवदत्तासी ॥ ९४ ॥
वत्सालागीं धेनु जैसी । गुरुमाय कळवळली तैसी ।
चाटूं पाहे सच्छिष्यासी । सप्रेमभरें ॥ ९५ ॥
हस्तें थापटिली पाठी । प्रेमें धरिली हनुवटी ।
गुरुमाय कृपाळु मोठी । मुखचि चुंबीतसे ॥ ९६ ॥
म्हणती धन्य गा शिष्यराया । देशधडी केली माया ।
पावलासी गा अभया । निःसंदेह ॥ ९७ ॥
हेंचि बापा स्वानुभवज्ञान । हेंचि अपरोक्ष समाधान ।
हेंचि जीवन्मुक्ताची खूण । बाणली तुज ॥ ९८ ॥
हेचि बापा परम तृप्ती । जयेसी निरंकुशा म्हणती ।
ऐसीच दृढ असो तुजप्रती । आमुच्या आशीर्वादें ॥ ९९ ॥
आणिकही आमुचें चित्त । कांहीं बोलावें वांच्छित ।
तृप्तीसी तृप्त करूं पाहात । तरी अवधान देई ॥ १८०० ॥
मागें आम्ही इतुकें । ज्ञानविज्ञानाची रूपकें ।
करूनि बोलिलों कौतुकें । तुजला सप्रतीत ॥ १ ॥
तयाचाचि पुन्हां मागुती । अनुवाद कीजे गा निश्चितीं ।
ज्ञानविज्ञानाची रीती । निवडूनि दावूं ॥ २ ॥
तरी आतां सावध व्हावें । ऐकलेंचि पुन्हां ऐकावें ।
आणि ध्वनितार्थें समजावें । सहजस्थितीसी ॥ ३ ॥
येथूनियां सात श्लोक । ज्ञानविज्ञानाचें रूपक ।
तुझिये तृप्तीवरी अधिक । उपराळ कीजे ॥ ४ ॥

ज्ञानं दृग्दृश्ययोर्भानं विज्ञानं दृश्यशून्यता ।
एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन ॥ ४२ ॥

दृश्य द्रष्टा भान तें ज्ञान । दृश्यशून्य तें विज्ञान ।
एक अद्वय ब्रह्म पूर्ण । अन्य किंचित् असेना ॥ ५ ॥
दृश्य मिथ्या हें पाहसी । द्रष्टा द्रष्टेपणें जाणसी ।
ज्ञान ऐसें म्हणावें यासी । सत्य मिथ्या निवडितां ॥ ६ ॥
मिथ्या नव्हें तें उत्पन्न । जरी आहत असती नयन ।
नाहींच तया नामाभिधान । सत्य मिथ्या केवीं ॥ ७ ॥
एवं दृश्यावरी शून्य । सत्य मिथ्या नव्हे भान ।
इकडे द्रष्टाही आपण । द्रष्टेपणा सांडी ॥ ८ ॥
दृश्य द्रष्टा गेलियावरी । जें काय उरे निर्विकारी ।
तेंचि विज्ञान निर्धारीं । निवृत्तिरूप ॥ ९ ॥
अन्य येथें कांहीं नसे । आहे तें ब्रह्मचि असे ।
निश्चयें श्रुति बोलतसे । अद्वय ब्रह्म ॥ १८१० ॥
एवं ऐसें स्फूर्तिवीण । अभेदब्रह्मचि सधन ।
याचि नांवें गा विज्ञान । दृढ अपरोक्ष ॥ ११ ॥

हेंचि आतां अन्यरीतीं। विज्ञान बोलिजे तुजप्रती।
पूर्वनिरूपण मागुती। श्लोकीं अनुवादूं॥ १२॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं तज्ज्ञानं ज्ञानमुच्यते।
विज्ञानं चोभयोरैक्यं क्षेत्रज्ञपरमात्मनोः॥ ४३॥

क्षेत क्षेत्रज्ञ जाणिजे। ययासी ज्ञान बोलिजे।
विज्ञानें दोही ऐक्य कीजे। क्षेत्रज्ञ परमात्मा॥ १३॥
उपदेशक्रमीं देवदत्ता। त्वंपदशोधनीं तत्वतां।
निवडिली क्षेत्रक्षेत्रज्ञता। वाच्यलक्षण॥ १४॥
वाच्य जें कां देहत्रय। पंचकोशादि समुदाय।
आणि जीव जो अभिमानी होय। तयासहित हें क्षेत्र॥ १५॥
असज्जडदुःखात्म। अनात्म्याचें हें रूपक।
तें तें जाण आवश्यक। क्षेत्ररूपें॥ १६॥
लक्ष्य साक्षी प्रत्यगात्मा। कूटस्थ निर्विकारी महात्मा।
अधिष्ठान या रूपनामा। अस्तिभातिप्रियत्वें॥ १७॥
निर्विकारत्वें सर्वां जाणे। उगेंचि प्रकाशी सामान्यें।
तोचि जाणिजे क्षेत्रज्ञ। अंतर्यामी॥ १८॥
एवं क्षेत्रक्षेत्रज्ञ दोन्ही। जाणत असे निवडूनी।
क्षेत्र पाहे परोक्षपणीं। क्षेत्रज्ञ अपरोक्ष॥ १९॥
ऐसें निवडून जाणिलें। त्यासी ज्ञान हें नाम आलें।
दृश्य द्रष्टा विभागले। पूर्वरीतीं येथें पैं॥ १८२०॥
आतां विज्ञान तें कैसें। बोलिजे तें कांहींसें।
ब्रह्मा आत्मया भेद नसे। अखंड एक॥ २१॥
त्वंपदावरी तत्पदींचें। वाच्य टाकूनि ईशाचें।
शुद्ध ज्ञान जें लक्ष्याचें। निवडिलें मागें॥ २२॥
उभयांचें लक्ष्य शुद्ध। आत्मा परमात्मा अभेद।
अंगेंचि जो सच्चिदानंद। ध्येयध्यानेंवीण॥ २३॥
त्यासीच नांव विज्ञान। जेथें द्वैताद्वैत नव्हे भान।
हेंचि पुढेंही निरूपण। बोलिजेल श्लोकीं॥ २४॥

परोक्षं शास्त्रजं ज्ञानं विज्ञानं चात्मदर्शनम्।
आत्मनो ब्रह्मणः सम्यक् उपाधिद्वयवर्जितम्॥ ४४॥

परोक्ष शास्त्रजन्य तें ज्ञान। आत्मदर्शन तें विज्ञान।
आत्मा ब्रह्म हें अभिन्न। माया अविद्या निसरतां॥ २५॥
गुरुमुखें वेदांतरीती। गुरु शास्त्र दोनी प्रतीई।
श्रवणमातें अर्थानुभूती। होय तें ज्ञान॥ २६॥
ब्रह्म प्रत्यगात्मा अद्वय। माया अविद्या उपाधिद्वय।

निरसून आत्मत्वें प्रत्यय। बाणतां विज्ञान ॥ २७ ॥
शात्रीं अभेद प्रतिपादन। शास्त्रप्रतीति हे जाण।
गुरुमुखेंही तेंचि वचन। ऐकतां ज्ञान विश्वासें ॥ २८ ॥
ऐसें परोक्षें जाणिकें। आत्मा ब्रह्म अभेद कळलें।
यासीही ज्ञान असे बोलिलें। गुरुशास्त्र प्रतीती ॥ २९ ॥
तेंचि अपरोक्षें बाणतां। विचारें अंगें ब्रह्म होतां।
आत्मप्रतीती तत्त्वतां। तेंचि आपणा आपण ॥ १८३० ॥
माया अविद्या उपाधी। उत्पन्नचि नव्हे कधीं।
ऐसी निश्चयें दृढबुद्धी। या नांव विज्ञान ॥ ३१ ॥
अथवा परोक्षे ध्येध्यान। तेंचि जाणावें गा ज्ञान।
त्रिपुटीरहित समाधान। विज्ञान तेंचि ॥ ३२ ॥
हेंचि आतां मागुती। ज्ञानविज्ञानाची स्थिती।
बोलिजे यथानिगुतीं। पूर्वानुवादें ॥ ३३ ॥

त्वमर्थो विषयज्ञानं विज्ञानं तत्पदाश्रयम्।
पदयोरैक्यबोधस्तु ज्ञानविज्ञानसंज्ञकम् ॥ ४५ ॥

मी आत्मा हेंचि ज्ञान। अहंब्रह्म तें विज्ञान।
उभय ऐक्य समाधान। ज्ञानविज्ञान दोन्ही ॥ ३४ ॥
वाच्य सांडूनि त्वंपदींचें। अपरोक्षें आत्मज्ञान साचें।
हा मी आत्मा या विषयाचें। नाम असे ज्ञान ॥ ३५ ॥
या सर्व जगाचा हेतु। सच्चिदानंद अनंतु।
अपरोक्षें तया जो जाणतु। या नांव विज्ञान ॥ ३६ ॥
त्वंपद तत्पद लक्ष्य दोन्ही। अभेदें जाणतसे ज्ञानी।
तयासी संज्ञा हे मानी। ज्ञानविज्ञानरूप ॥ ३७ ॥
एवं आत्मज्ञान तेंचि ज्ञान। ब्रह्मज्ञान तें विज्ञान।
उभयात्मक संज्ञा पूर्ण। ज्ञानविज्ञान ऐसी ॥ ३८ ॥
आणीकही ज्ञानविज्ञानाचें। रूपक जाणावें साचें।
निरूपण ऐकें श्लोकाचें। सावधपणें ॥ ३९ ॥

आत्मानात्मविवेकस्तु ज्ञानमाहुर्मनीषिणः।
अज्ञानं चान्यथा लोके विज्ञानं तन्मयं जगत् ॥ ४६ ॥

आत्मानात्मविवेकाप्रती। ज्ञान ऐसें ज्ञाते बोलती।
अज्ञान अन्यथालोकरीती। विज्ञान तें सर्व ब्रह्म ॥ १८४० ॥
असत् जड दुःखानात्मा। अस्तिभातिप्रियरूप आत्मा।
विवेकें निवडी जो महात्मा। ज्ञाते बोलती हें ज्ञान ॥ ४१ ॥
सत्य मिथ्या एक केलें। एकासी एकचि भाविलें।
लोकरीतीं जे भुलले। हेंचि अज्ञान ॥ ४२ ॥

रज्जूवरी सर्प नाहीं । जगासी रूप नसे कांहीं ।
ब्रह्मचि जाणें सर्वदाही । दिसे भासे जें ॥ ४३ ॥
सर्व आपणचि ऐसें वाटे । आपाणामामध्यें सर्व उमटे ।
हेंचि विज्ञान गोमटें । जाणिजे तुवां ॥ ४४ ॥
ऐसी ज्ञानविज्ञानाची स्थिती । सांगितली बहुधा रीतीं ।
येथें कोणी मंदमती । भांबावेल ॥ ४५ ॥
कीं ज्ञान आणि विज्ञानाचा । निर्धार एक नव्हे साचा ।
यास्तव पुढील श्लोकींचा । अर्थ निश्चयरूप ॥ ४६ ॥

अन्वयव्यतिरेकाभ्यां सर्वत्रैकं प्रपश्यति ।
यत्तु तत् वृत्तिजं ज्ञानं विज्ञानं ज्ञानमात्रकम् ॥ ४७ ॥

अन्वय आणि व्यतिरेकानें । सर्वत्रीं एकचि पाहणें ।
ज्ञानातें वृत्तीसीं स्फुरणें । विज्ञान तें ज्ञानमात्र ॥ ४७ ॥
कारणरूपें एक हेम । कार्यासी अलंकार हें नाम ।
तेवीं कार्य हाचि जगद्भ्रम । ब्रह्म तेंचि कारण ॥ ४८ ॥
सुवर्णावीण अलंकार । कैंचे होती नानाप्रकार ।
तेवीं ब्रह्मरूपावीण आकार । जगासी कईम्चा ॥ ४९ ॥
अलंकारीं सुवर्ण असे । जगामाजीही ब्रह्म तैसें ।
हें अन्वयाचें रूप ऐसें । कार्यामध्यें कारण ॥ १८५० ॥
सुवर्णी नसती अलंकार । ब्रह्मीं जगाचा नसे विकार ।
हा व्यतिरेकाचा प्रकार । जे कारणीं कार्य नाहीं ॥ ५१ ॥
ऐसें अन्वयव्यतिरेकें । करून पाहावें विवेकें ।
जे सर्वही नामरूपकें । एकब्रह्म चिन्मात्र ॥ ५२ ॥
सोन्यावीण् अलंकार नव्हे । मग तें सुवर्ण कां न म्हणावें ।
अलंकार असतांही पाहावें । सुवर्णचि ॥ ५३ ॥
तेवीं या सर्व जगासी । वेगळें रूपचि नसे यासी ।
तरी हें ब्रह्मचि अविनाशी । कां न म्हणाएं ॥ ५४ ॥
कारणावीण कार्य कांहीं । भिन्नत्वें रूप तया नाहीं ।
तरी हें कारणचि निःसंदेहीं । स्वानुभवें पाहावें ॥ ५५ ॥
ऐसें सर्वत्र ब्रह्म एक । सप्रतीत निश्चयात्मक ।
तया प्रबोधाचें रूपक । द्विविध असे ॥ ५६ ॥
सर्वदा वृत्तीचें स्फुरण । जें सर्वही ब्रह्म आपण ।
वृत्त्यात्मक जें कां लक्षण । ज्ञान तें या नांवें ॥ ५७ ॥
तेही वृत्ति जेथें मुरे । स्फुरण स्फुरणीय थारे ।
सर्व एक दोन्ही विसरे । हें निवृत्तिरूप विज्ञान ॥ ५८ ॥
मागें बहुत केला प्रकार । परी इतुकेचि याचा निर्धार ।
ज्ञान तें सवृत्तिक विचार । ज्ञप्तिमात्र विज्ञान ॥ ५९ ॥
हेंचि आणिक एका श्लोकें । ज्ञानविज्ञान निश्चयात्मकें ।

आणि उभयाचें पळही निकें । बोलिजे ऐकावें ॥ १८६० ॥

अज्ञानध्वंसकं ज्ञानं विज्ञानं चोभयात्मकम् ।
ज्ञानविज्ञाननिष्ठेयं तत् सत् ब्रह्मणि चार्पणम् ॥ ४८ ॥

अज्ञान नाशितें ज्ञान । विज्ञान दोहींसी अधिष्ठान ।
हे ज्ञानविज्ञान निष्ठा अर्पण । एक परब्रह्मीं ॥ ६१ ॥
आपण ब्रह्मही न कळे । हींचि अज्ञानाचीं पडळें ।
मी ब्रह्म ज्या क्षणीं निवळे । या नांव ज्ञान ॥ ६२ ॥
सूर्यउदय होतांक्षणीं । अंधार नासे निपटूनी ।
तेवीं ज्ञान प्रगटतां मनीं । अज्ञान सर्व जळे ॥ ६३ ॥
मी ब्रह्मप्रतीति लाहे । तरी मी कोण कोठें राहें ।
ऐसें अज्ञानध्वांसक पाहें । ज्ञान हेंचि निश्चयें ॥ ६४ ॥
अज्ञान जातां ज्ञानवृत्ती । गळून विज्ञानरूप होती ।
जेवीं कापुरासवें समाप्ती । महातेजीं अग्नीची ॥ ६५ ॥
पुढें निर्विकार परब्रह्म । स्फूर्तिरहित आत्माराम ।
अज्ञान ज्ञानाचा उपरम । निःशेष होय ॥ ६६ ॥
ध्येय ध्यान सर्व गळालें । द्वैताद्वैत भान गेलें ।
नुसते परब्रह्म उरलें । हेंचि विज्ञान ॥ ६७ ॥
ज्ञानाज्ञानाच्या स्फूर्ती । जया अधिष्ठानीं उमटती ।
तेथें विरोध नसे रती । ज्ञानाज्ञानाचा ॥ ६८ ॥
प्रकाश आणि अंधकारा । दोहींसीही गगन थारा ।
तेवीं ज्ञानाज्ञानविकारा । अधिष्ठान ब्रह्म ॥ ६९ ॥
त्यासीच नांव विज्ञान । ज्ञानाज्ञानासी अधिष्ठान ।
एव उभयात्मकाची खूण । बोलिली श्लोकीं ॥ १८७० अ॥
तस्मात् जाणणें तेंचि ज्ञान । विज्ञान तेंचि ब्रह्म अभिन्न ।
सातां श्लोकींही निरूपण । परी निश्चय इतुका ॥ ७१ ॥
ज्ञानविज्ञाननिष्ठा ऐसी । मेळवीतसे अखंड रसीं ।
स्वरूपावीण साधकासी । उरोंचि नेदी ॥ ७२ ॥
तत् तेंचि सत् परिपूर्ण । ब्रह्मचि एक दंडायमान ।
याचि नांवें गा अर्पण । जे भिन्न नाम नुरे ॥ ७३ ॥
अज्ञान ज्ञानें जळालें ।ज्ञान विज्ञानीं मिळालें ।
मग विज्ञान नामही उरलें । नसेचि भिन्न ॥ ७४ ॥
शंकर म्हणती शिष्यराया । इतुकें हें बोलिले कासया ।
याचें प्रयोजन लवलाह्या । सांगूं तुजप्रती ॥ ७५ ॥
ऐसी ज्ञानविज्ञानस्थिती । दृढ निश्चय जयाच्या मती ।
तया कोणेही अवस्थेप्रती । उत्थानचि नव्हे ॥ ७६ ॥
मनादि इंद्रियव्यापारें । होत असती पूर्व संस्कारें ।
ज्ञाता मानी जरी विकारें । उत्थान तें या नांव ॥ ७७ ॥

मृगजळापरी वृत्ति उठे। व्यवहारून तत्काळ आटे।
सत्यमिथ्या विकार नुठे। हे सहज समाधि ॥ ७८ ॥
ध्यानीं किंवा व्यवहारीं। किंवा सुषुप्तिमाझारीं।
वृत्तीची असतां भलती परी। तरी निश्चय एकरूप ॥ ७९ ॥
तरंग उठतांही पाणी। निमतांही जीवन जीवनीं।
तैसी वृत्तीची उभवणी। होतां जातां आपण ॥ १८८० ॥
समाधीमाजी जें समाधान। तोचि निश्चय व्यवहारीं पूर्ण।
जागृति सुषुप्ति कीं स्वप्न। एकरूप सर्वदा ॥ ८१ ॥
वृत्तीचा विकारचि वेगळा। स्वरूपावीण न दिसे डोळां।
भेदचि गिळिला सगळा। नामरूपाचा ॥ ८२ ॥
संशयचि निपटून गेला। देखेना उद्भव लयाला।
वृत्तिरहित संचला। आपुला आपण ॥ ८३ ॥
ऐसा निश्चयचि जयासी। समाधि उत्थान नसे त्यासी।
स्वलीला वर्तणूक जैसी। होय तोचि विधि ॥ ८४ ॥
एणें अमुक करावें। आणि अमुक न करावें।
ऐसा नेमचि न संभवे। इतरांऐसा ॥ ८५ ॥
त्याचा विषय तो एकांत। व्यवहारतांही निवांत।
मुखें जें जें बडबडत। तेंचि मौन त्याचें ॥ ८६ ॥
सहजीं सहज जें होतां। करूं न करूं नसे वार्ता।
चांगलें वाईट ही चिंता। किमपि नसे ॥ ८७ ॥
ऐसी हे सहजस्थिती। मगें निरूपिली तुजप्रती।
सदाचरणीं भोजनसंकेतीं। जें प्राप्त तें भोगितो ॥ ८८ ॥
तेणें रीईं समजावें। आतां कासया विस्तारावें।
परी मुख्य वर्म कळावें। सहजस्थितीचें ॥ ८९ ॥
अगा जो ब्रह्मचि अंगें। तयासी वक्तृत्वही नलगे।
हीं वाउगींच सोंगें। नामरूपाचीं ॥ १८९० ॥
बंधचि मुळीं नसतां। तेथें कैंची असे मुक्तता।
जेथें ज्ञातृत्वाची वार्ता। नसे किमति ॥ ९१ ॥
जीवन्मुक्ति विदेहस्थिती। सहजस्थिती नित्यमुक्ती।
ह्याही अवधिया सांगाती। सोपाधिकाच्या ॥ ९२ ॥
असे ऐसा जो ज्ञानी पूर्ण। निजांगें ब्रह्म अभिन्न।
त्यासी आपुला म्हणे कोण। अविषय सर्वांचा ॥ ९३ ॥
त्यासी कोणीही जाणेना। तयासी कोणी देखेना।
तयासी अवलंबूंही शकेना। आपुलें म्हणोनी ॥ ९४ ॥
ज्ञाता नव्हे मातापित्यांचा। ज्ञाता नव्हे पतिव्रतेचा।
ज्ञाता नव्हेचि पुत्राचा। आपुला म्हणावया ॥ ९५ ॥
बंधु स्वजन आप्ताचा।मित्र सुहृद कुलगुरूचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया ॥ ९६ ॥
देशाचा कीं ग्रामाचा। किंवा सार्वभौम राजाचा।

ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ९७॥
जाति वर्ण आश्रमाचा। कुळगोत्र सपिंडाचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ९८॥
सुखाचा किंवा दुःखाचा। पापाचा किंवा पुण्याचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ९९॥
कर्म अकर्म निष्कर्माचा। धर्म आणि अधर्माचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ १९००॥
बंधाचा कीं मोक्षाचा। समाधि कीं उत्थानाचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ १॥
ऊर्ध्व कीं अधोगतीचा। जन्माचा कीं मृत्यूचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ २॥
भूतांचा कीं गुणांचा। देहाचा कीं प्राणाचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ३॥
इंद्रियांचा कीं मनाचा। अहंकाराचा कीं बुद्धीचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ४॥
कामादि दुर्जनांचा। कीं विवेकादि सज्जनांचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ५॥
इहलोक परलोकींचा। देव ऋषि पितरांचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ६॥
ब्रह्माआदि विष्णूचा। रुद्र किंवा ईश्वरचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ७॥
शास्त्रविचार वेदाचा। विधि किंवा निषेधाचा।
ज्ञाता नव्हेचि कोणाचा। आपुला म्हणावया॥ ८॥
असो हें किती बोलावें। ज्ञाता कोणाचाचि नव्हे।
जेथें स्वानुभवही न संभवे। वेगळा उमसूं॥ ९॥
सर्वांमाजी तरी एकला। परी नातळेचि नामरूपाला।
तेथें अमुक हें म्हणावयाला। लाहे कवण॥ १९१०॥
तेथें कैंची स्थिती गती। तेथें कैंची विचारतीती।
तेथें बापिडी हे मुक्ती। नाम केवीं मिरवी॥ ११॥
देवदत्ता ऐसी स्थिती। आकळीं गा हे दृढमती।
जेथें समाधि उत्थानभीती। अंग मिरवावया॥ १२॥
आणिक तुज खूण। अंतरींची सांगूं पूर्ण।
तेही दृढ करीं जतन। अंतर्यामीं॥ १३॥
ब्रह्मज्ञान उपजे जेव्हां। ऐसी स्थिति लाहे तेव्हां।
ऐसें नव्हे पाहें अनुभवा। पूर्वींच आत्मा अलिप्त॥ १४॥
आकाश जैसें घटांतरीं। न लिंपेचि त्या त्या विकारीं।
तैसा आत्मा चराचरीं। निर्विकाररूपें॥ १५॥
आत्मा अज्ञानकाळीं जरी। अज्ञानें होय विकारी।
तरी ज्ञान होतां निर्विकारी। होय कैसा॥ १६॥

तस्मात् ज्ञानीं कीं अज्ञानी । एकरूप आती दोनी ।
कीं आत्माचि एक पूर्णपणीं । सर्वांमाजी सारिखा ॥ १७ ॥
या श्लोकीं हेंचि आतां । आत्म्याची कैसी अलिप्तता ।
इतुकें सांगून तत्त्वतां वकृत्व आटोपूं ॥ १८ ॥

भोक्ता सत्त्वगुणः शुद्धो भोगानां साधनं रजः ।
भोग्यं तमोगुणं प्राहुः आत्मा चैषां प्रकाशकः ॥ ४९ ॥

भोक्ता ज्ञानशक्ति सत्वगुण । क्रियाशक्ति रजसाधन ।
भोग्य द्रव्यशक्ति तमोगुण । आत्मा यासी प्रकाशक ॥ १९ ॥
अंतःकरणाच्या वृत्ति दोन । एक बुद्धि एक मन ।
क्रियारहित शुद्ध ज्ञान । हेचि ज्ञानशक्ति ॥ १९२० ॥
सत्त्वगुण म्हणावें यासी । हाचि भोक्ता विषयासी ।
आणि साह्य असे स्फूर्तिसी । प्रतिबिंब जीव तया ॥ २१ ॥
एवं प्रतिबिंब आणि वृत्ती । दोन्ही एकत्र मिळती ।
सुखदुःख भोग निवडती । यास्तव भोक्ता नांव ॥ २२ ॥
इंद्रिय प्राण हीं उपकरणें । या द्वारें वृत्ति येंएं जाणें ।
हे क्रियाशक्ति ग्रहणसाधनें । रजोगुणात्मक ॥ २३ ॥
शब्दस्पर्शादि विषय । तमोगुण भोग्य होय ।
द्रव्यशक्तीचा समुदाय । येणें रीतीं जाणिजे ॥ २४ ॥
वृत्ति प्राणाच्या आधारें । निघोनि इंद्रियांच्या द्वारें ।
विषय घेतां एकसरें । सुखदुःखें होती ॥ २५ ॥
एवं वृत्ति इंद्रिय विषय । हाचि त्रिगुण समुदाय ।
आत्मा यासी प्रकाशमय । साक्षिमात्र ॥ २६ ॥
वृत्ति उठतां जाणावें । इंद्रियांसी प्रकाशावें ।
विषय तेही अवलोकावे । स्वप्रकाशत्वें ॥ २७ ॥
जैसा ठाणबाईचा दिवा । तेणें प्रकाशमात्र करावा ।
घरींचा चोर कीं परावा । नेणावा सहसा ॥ २८ ॥
तेवीं आत्मा ज्ञानरूपक । सामान्यत्वें प्रकाशक ।
परी सुखदुःखाचें कौतुक । साक्षीही नाहीं ॥ २९ ॥
केवळ साक्षीच अलिप्त नसे । प्रतिबिंबाही भोग न दिसे ।
हें दृष्टांतमुखेंचि आपैसें । विवेकें कळे ॥ १९३० ॥
अग्निसंगें लोह तप्त । जडामध्यें अग्नि मिश्रित ।
लोहो घणें जेव्हां पिटित । तें दिसतें अग्नीसी ॥ ३१ ॥
परी जडाचा घाव जड । सोसूं जाणें तेंचि दृढ ।
प्रकाशासी तें अवघड । ओझें घेतां ॥ ३२ ॥
तेवीं सुखदुःखाच्याचि कथा । वाजती वृत्तीच्या माथां ।
परी प्रतिबिंबासी सर्वथा । शिवतीच ना ॥ ३३ ॥
जळीं प्रतिबिंब देखिलें । तयासी काष्ठें जरी मारिलें ।

परी तें जीवनीं आदळलें । नातळे प्रतिबिंबा ॥ ३४ ॥
तस्मात् प्रतिबिंबरूप जीवासी । भोक्तृत्वाची नवचे दशी ।
मग सामान्य जो प्रकाशी । तेणे कोठोनी ॥ ३५ ॥
एवं सुखदुःखात्मक विषय । या ग्रहंआचें साधन इंद्रिय ।
सुखदुःख वृत्तीसी होय । यासी साक्षी आत्मा ॥ ३६ ॥
तस्मात् आत्मा निर्विकारी । कोणतेही अवस्थेमाझारी ।
त्यासी कोण म्हणे विकारी । चरचरीं असतां ॥ ३७ ॥
देवदत्ता आत्मा ऐसा । विकारीच नव्हे सहसा ।
नामरूप दिसतांही ठसा । विकाररूपी ॥ ३८ ॥
आत्मा नव्हेचि अज्ञान । आणि नव्हे ज्ञानसंपन्न ।
सर्वांसी अविरोधी पूर्ण । आत्माचि एक ॥ ३९ ॥
ऐसें निश्चयेंसीं समजें । येथें कोणी नाहीं दुजें ।
एक आत्माचि विराजे । स्थावरजंगमीं ॥ १९४० ॥
आत्माचि सर्वत्रीं असतां । कोणासी सुखदुःखवार्ता ।
कोण मरे कोण जन्मता । नानायोनीं ॥ ४१ ॥
आपण आत्मा हें विसरले । देहाचि मी हें मानिते झाले ।
जन्मती मरती उगले । परे तें सत्य नव्हे ॥ ४२ ॥
तस्मात् सर्व जरी अज्ञानी । परी न जन्मे न मरे कोणी ।
आत्मा जैसा पूर्णपणीं । तैसाचि असे ॥ ४३ ॥
कोणासीच नाही बंधन । कोणासीच नाही पाप पुण्य ।
सुखदुःख भोगही संपूर्ण । नसे कोणासी ॥ ४४ ॥
स्वरूपस्थिति हे ऐसी । बोलत असती पारदर्शी ।
हेंचि दृढ मानसीं । गुह्य ज्ञात्याचें ॥ ४५ ॥
चराचरीं मीच एक । व्यापूनियां तिन्ही लोक ।
निजप्रकाशें प्रकाशक । निर्विकारत्वें ॥ ४६ ॥
हेचि अनिर्व्याच्य स्थिती । ज्ञानाज्ञानासारिखी गती ।
बंधमोक्षही लागती । एकाचि मार्गें ॥ ४७ ॥
विचार अविचार एकसरी । बद्ध मुक्ता एकचि परी ।
हा निश्चय केलाचि करीं । सदृढ बुद्धि ॥ ४८ ॥
आतां तुझा तूंचि जाण । आम्हीं झालों कीं उत्तीर्ण ।
ऐसें बोलोनियां वचन । स्तब्ध राहिले ॥ ४९ ॥
देवदत्तें सर्व आकळुनी । पावला पूर्ण समाधानीं ।
झाली संशयाची धुणी । सद्गुरुप्रसादें ॥ १९५० ॥
पूर्वीपासून निरूपण । त्याचा सारांश आलोडून ।
अंतःकरणीं बाणली खूण । बहु बोलणें नको ॥ ५१ ॥
वारंवार प्रदक्षिणा । वारंवार वंदी चरणा ।
सेवा प्रसाद इच्छी मना । न्याहाळी मुख ॥ ५२ ॥
तों शंकर म्हणती सर्वज्ञा । देवदत्ता दृढप्रज्ञा ।
आतां आमुची घेऊनि आज्ञा । यथासुखें विचरें ॥ ५३ ॥

स्वरूपीं स्वरुपानुभवें । जीवन्मुक्तिसुख भोगावें ।
उरलें प्रारब्ध सारावें । सुखदुःख भोगोनि ॥ ५४ ॥
ऐकतांचि देवदत्त । घाबरा पाहे विस्मित ।
नेत्रीं होतसे अश्रुपात । प्रार्थिताहे सद्गद ॥ ५५ ॥
अहा हे सद्गुरुराजा । पूर्णब्रह्म मोक्षध्वजा ।
न सोडीं मी चरणांबुजा । देहपातावीण ॥ ५६ ॥
देह वाणी आणि मानस । श्रीचरणींच यांचा न्यास ।
गुरूनें उपेक्षितां यांस । कैसे राहती ॥ ५७ ॥
आतां काज असे कवण । कीं तें म्यां करावें जाऊन ।
सेवाचि इच्छितसे मन । हाचि प्रसाद द्यावा ॥ ५८ ॥
परमप्लावण्या वेव्हाळी । परी ते शोभे पतीजवळी ।
तेवीं मीही चरणातळीं । शोभेन अत्यंत ॥ ५९ ॥
सिंहासन रत्नखचित । राजा बाइसतां परम शोभत ।
तैसा मीही देवदत्त । वास वांच्छत श्रीचरणीं ॥ १९६० ॥
देह पादुका श्रीचरणीं अवस्था हेंचि वांच्छी मनीं ।
तरी समर्थें कृपा करूनी । दिधलेळिच दुयावें ॥ ६१ ॥
देहबुद्ध्या तरी दास । जीवबुद्ध्या तुझा अंश ।
मीचि तूं हा अविनाश । आत्मबुद्धि जेव्हां ॥ ६२ ॥
ऐसें बोलोनि चरण धरी । तथास्तु निघावें मुखोद्गारीं ।
सर्वथा वंचनही न करीं । अनाथबंधो ॥६ ३ ॥
मग उठूनियां शकरें । म्हणती सावधान ऐकें उत्तरें ।
समाधान पावून बा रे । विरोधी बोलसी ॥ ६४ ॥
ऐसें नव्हे समाधान । तुवां वाटून घेतलें रान ।
अभेदासी करिसी भिन्न । हें तुजसी शोभेना ॥ ६५ ॥
इतुकाचि औटहात गुरु । या सर्वांमाजी कोण गा चोरु ।
आणि त्व्ज्ञ्या ठायींही विकारु । कोठोनि आला वेगळा ॥ ६६ ॥
आत्मा देहधारी कल्पिसी । तूंही देहायेवढा होसी ।
अहा निकृष्ट कल्पना ऐसी । पूर्णज्ञान विरोध ॥ ६७ ॥
वियोगसंयोगाचा खेद । कोठें असे आत्मा अभेद ।
चराचरीं सच्चिदानंद । नामरूपावीण ॥ ६८ ॥
तोचि गुरु कीं आपण । वेगळें कैंचें गुरुशिष्यपण ।
देह वाणी आणि मन । तेथेंचि तत्पर सर्वदा ॥ ६९ ॥
जरी भिन्नत्वें भावावें । तरीच सेवावंचक व्हावें ।
अभिन्नचि असतां स्वभावें । अखंड सेवा आयती ॥ १९७० ॥
ऐसी अखंड सेवा असता । देहसंबंध घेसी केउता ।
अंतरीं पाहें गा पुरता । स्वस्वानुभवें ॥ ७१ ॥
जडाचा मानिसी संयोग । होय केव्हां तरी वियोग ।
तेव्हां समाधानाचा भंग । होईल बापा ॥ ७२ ॥
दोन काष्ठें प्रवाहें । एकत्र चालतां पाहें । ए

क अटके एक वाहे । परतंत्रतेमुळें ॥ ७३ ॥
देह प्रारब्धाधीन तैसा । एकरूप राहे जैसा । सांडीं ।
सांडीं भेद ऐसा । देहबुद्धीचा ॥ ७४ ॥
ऐक गुरुभक्तीचें लक्षण । निपटूनि जावें । मीपण ।
एक गुरूचि परिपूर्ण । भेदभान न होतां ॥ ७५ ॥
किंवा एकचि पूर्ण आत्मा । कल्पूं न ये रूपनामा ।
हा अभेदशक्तीचा महिमा । दृढ कां न व्हावा ॥ ७६ ॥
देह पडे अथवा राहे । सुख अथवा दुःख साहे ।
परी समाधान भंग नव्हे । हेंचि चिन्ह ज्ञानाचें ॥ ७७ ॥
अगा आकाश तुटोनि पडे । कीं पृथ्वी जळामाजी बुडे ।
परीं समाधान तें न मोडे । हेंचि चिन्ह ज्ञानाचें ॥ ७८ ॥
वियोग किंवा संयोग । अवघें मायिकाचे ढोंग ।
होतां जातां नव्हे भंग । समाधानासी ॥ ७९ ॥
असो हे किती सांगावें । तुजसी सर्व असे ठावें ।
आतां भेदाचियां नांवें । तिलदान देईं ॥ १९८० ॥
सर्वांठायीं एक गुरु । पूर्ण आत्मा निर्विकारु ।
देवदत्त किंवा शंकरु । नाम हें कोठें ॥ ८१ ॥
ऐसा करोनियां निश्चय । निःसंदेह अमुचा आशीर्वाद ।
कालत्रयीं नाहीं भय । तुझें समाधान ॥ ८२ ॥
ऐसा आमुचा आशीर्वाद । प्रसन्नत्वें दिधला प्रसाद ।
आतां उठें टाकीं खेद । हेचि आज्ञा आमुची ॥ ८३ ॥
तुवां जावें येचि क्षणीं । आम्हासीही अल्पादिनीं ।
जाणे असे महाप्रस्थानीं । आतां आग्रह टाकीं ॥ ८४ ॥
ऐसा ऐकतां वृत्तांत । बोलिल्या न्यायें समस्त ।
तथास्तु म्हणे देवदत्त । माथा चरणीं ठेउनी ॥ ८५ ॥
परी आतां एक प्रार्थना असे । सदाचरण बोलिलें जैसें ।
ज्ञानरूप आश्रम तैसे । मजसी निरोपावे ॥ ८६ ॥
बहु बरें म्हणोनियां स्वामी । बोलूं आरंभिती अनुक्रमीं ।
ब्रह्मचर्य श्लोकीं प्रथमीं । अवधारीं आधीं ॥ ८७ ॥

ब्रह्माध्ययनसंयुक्तो ब्रह्मचर्यरतः सदा ।
सर्वं ब्रह्मेति यो वेद ब्रह्मचारी स उच्यते ॥ ५० ॥

तोचि ब्रह्मेति बोलिजे । जेणें सर्व ब्रह्म जाणिजे ।
तेथेंचि अखंड विचरिजे । वेदाध्ययनयुक्त ॥ ८८ ॥
शब्दब्रह्मीं पारंगत । जो कां शुद्ध वेदांत ।
श्रवणमननीं अखंड रत । वेदाध्ययन या नांवें ॥ ८९ ॥
वृत्तिस्वरूपाकारीं । अनुदिनीं अभ्यासें थावरी ।
तोचि जाणिजे ब्रह्मचारी । सर्वदा व्रतस्थ ॥ १९९० ॥

सांडूनियां रूपनाम । अनुभवीतसे सर्व ब्रह्म ।
भेदचि अथवा झाला भस्म । तोचि ब्रह्मचारी ॥ ९१ ॥
येर हे स्थूळाची क्रिया । कोण पुसे ब्रह्मचर्या ।
आतां ऐकें शिष्यराया । गृहस्थ कोणतो ॥ ९२ ॥

गृहस्थो गुणमध्यस्थः शरीरं गृहमुच्यते ।
गुणाः कुर्वन्ति कर्माणि नाहं कर्तेति बुद्धिमान् ॥ ५१ ॥

शरीरगृहीं गुणीं स्थित । तोचि गृहस्थ बुद्धिमंत ।
गुणचि कर्मीं प्रवर्तत । आपण कर्ता असेना ॥ ९३ ॥
पंचीकृत भूतांपासुनी । स्थूल देहाची उभवणी ।
जन्म नाश जयालागुनी । हेंचि गृह बोलिजे ॥ ९४ ॥
ऐसिया देहरूप मंदिरीं । साक्षिमात्रें निर्विकारी ।
तोचि आत्मा गुणां माझारी । अलिप्तत्वें गृहस्थ ॥ ९५ ॥
शब्दस्पर्शादि रूपनाम । सर्व व्यापार हेंचि कर्म ।
हा तों प्रत्यक्ष गुणांचा धर्म । आत्मा तया अलिप्त ॥ ९६ ॥
सत्वगुण अंतःकरण । इंद्रियादि रजोगुण ।
विषयतमाचें निरूपण । पूर्वश्लोकीं जाहलें ॥ ९७ ॥
ऐसी गुणाची प्रवृत्ती । स्वस्वकर्मींच वर्तती ।
सुखदुःखें अभिमाना होती । विश्वतैजसादिकां ॥ ९८ ॥
सहजगति कर्म ऐसे । होय जें जें अनायासें ।
तया कर्तृत्वाचें पिसें । आत्मयासी असेना ॥ ९९ ॥
आपण आत्मा परिपूर्ण । निश्चयेसीं बाणली खूण ।
तरी कर्माचा कर्ता कवण । असे गा ज्ञानोदयीं ॥ २००० ॥
एवं नाहं कर्तृत्वें मती । तोचि बुद्धिमान निश्चितीं ।
गृहस्थ नाम हें तयाप्रती । अत्यंत शोभे ॥ १ ॥
जागृति स्वप्नादि व्यापार । सुषुप्ति समाधि समग्र ।
होती जाती निर्विकार । आपण आत्मा ॥ २ ॥
आपुलेपणा हा विसरे । देहचि मी हें झालें खरें ।
आणि माझीं हीं रांडापोरें । बांधिलीं घरें मातीचीं ॥ ३ ॥
ऐसें मी माझें कल्पूनी । वासना बळाविली द्विगुणी ।
पुनःपुन्हां मरती जन्मुनी । ते गृहस्थ लौकिकी ॥ ४ ॥
असो तयासी नाहीं काज । मुख्य गृहस्थ सांगितला तुज ।
पुढील श्लोकीं आतां समाज । वानप्रस्थ कोणता ॥ ५ ॥

किमुग्रैश्च तपोभिश्च यस्य ज्ञानमयं तपः ।
हर्षामर्षविनिर्मुक्तो वानप्रस्थः स उच्यते ॥ ५२ ॥

उग्र तपें करोनि काय । शुद्ध तप तें ज्ञानमय ।

हर्ष शोक गेले उभय । जयाचे तो वनस्थ ॥ ६ ॥
विवेक सांडूनियां दूरी । वनीं ही जरी वास करी ।
तरी तो नव्हेचि निर्धारीं । वानप्रस्थ ॥ ७ ॥
धूम्रपान पंचाग्निसाधन । नाना उग्रतपें तो तो शीण ।
काय होतसे तेणें । कोरड्या दुराग्रहें ॥ ८ ॥
तस्मात् जयासी ज्ञानतप । जेथें नातळीच पुण्यपाप ।
अंगेंचि ब्रह्म सच्चिद्रूप नामरूप सांडूनि ॥ ९ ॥
जेहें द्वैतचि मावळे । त्रिविधा रीतीं मीपण गळे ।
ज्ञानें सहज मुक्त झाले । हर्षविषाद कैंचा ॥ २०१० ॥
ऐसा हर्षविषादावांचुनी । स्वेच्छा क्रीडे निरंजनीं ।
ओळखीं वानप्रस्थालागुनी । ऐक आतां संन्यास ॥ ११ ॥

देहन्यासो हि संन्यासो नैव काषायवाससा ।
नाहं देहो महात्मेति निश्चयो ज्ञानलक्षणम् ॥ ५३ ॥

निश्चयें ज्ञानलक्षण ऐसें । मी देह स्वप्नींही नुमसे ।
तोचि महात्मा न्यासी असे । काषायवासें नव्हेचि ॥ १२ ॥
अगा ज्ञानाचें लक्षण । पूर्वापर वेदांतकथन ।
जितुकें झालें निरूपण । परी निश्चय ऐसा ॥ १३ ॥
ब्रह्म प्रत्यगात्मा अभिन्न । ध्येय ध्याता ध्यानेंवीण ।
वृत्तिरहित समाधान । सारांश इतुका ॥ १४ ॥
ऐसी दृढतर बुद्धि झाली । संशयाची मुळी खांदिली ।
तिन्ही काळीं स्थिति एकली । एकपणेंवीण ॥ १५ ॥
कोणतेही अवस्थेप्रती । देहबुद्धीची समाप्ती ।
विश्वतैजसप्राज्ञरीती । उरली नाहीं ॥ १६ ॥
मी माझें निःशेष जातां । विश्वाभिमानाची नुरे वार्ता ।
अकार स्थूल हा तत्त्वतां । स्वानुभवें न्यासिला ॥ १७ ॥
मी कर्ता भोक्ता निमतांक्षणीं । तैजस अभिमानाची हानी ।
उकार सूक्ष्म देहालागुनी । सर्वथा न्यासिलें ॥ १८ ॥
मी ध्याताचि वेगळा नुरे । त्या क्षणींच प्राज्ञ हा मरे ।
कारणदेह सह मकारें । न्यासिलें खरें ते समयीं ॥ १९ ॥
देहत्रय जैसें पिंडीं । तेवीं तीन देह ब्रह्मांडीं ।
विराट हिरण्यगर्भ परवडी । तिजा अव्याकृत ॥ २०२० ॥
पिंडींचा अभिमान निमतां । समष्टिअभिमान गळे तत्त्वतां ।
श्रम नसेचि न्यासितां । ब्रह्मादि अभिमानिया ॥ २१ ॥
ऐसा नामरूपाचा त्याग । करून आत्मा उरे असंग ।
तिन्ही अवस्थेसीं मग । मी देह वाटेना ॥ २२ ॥
एवं देहत्रयाची न्यासी । तोचि महात्मा संन्यासी ।
सांगितला धरी मानसीं । निश्चयरूप ज्ञाता ॥ २३ ॥

येर हे वेषधारी भगवे । दंडकमंडलु मिरवावे ।
परी ज्ञानविचाराच्या नांवें । शून्याकार ॥ २४ ॥
ते ते नव्हेति संन्यासी । व्यर्थ त्यागिलें शिखासूत्रासी ।
ओझें मिरविती अपेशी । काष्ठ खापराचें ॥ २५ ॥
महावाक्य आणि योगपट । मुखें करोनियां पाठ ।
स्वानुभवें पुसतां सपाट । हा संन्यास केवीं ॥ २६ ॥
असो हे ज्ञानविहीन । तयांसी असे काज कोण ।
तुज सांगितलें ज्ञानलक्षण । संन्यासी तो निश्चयें ॥ २७ ॥
ब्रह्मचर्य किंवा गृही । वनस्थ किंवा संन्यास पाहीं ।
हें लक्षण अन्यास नाहीं । एक ज्ञात्यावांचुनी ॥ २८ ॥
पूर्वील सदाचरणरीती । स्नानसंध्यादि जितुकीं होती ।
तितुकीं घडती ज्ञानाप्रती । येरां फजिती कष्टमात्र ॥ २९ ॥
हेंही ज्ञानियच्या ठायीं । यथार्थ नव्हे निःसंशयीं ।
बोधक्रिया अभिप्रायीं । आरोपिलें रूपक ॥ २०३० ॥
आत्मत्वें क्रिया असे जरी । ज्ञाताही क्रियारूप तरी ।
नामसंकेत निर्विकारीं । आरोपिजे वृथा ॥ ३१ ॥
ज्ञाता ज्ञातेपणें वेगळा । उमसूं न लाहे हेळा ।
तेथें आचरणाचा सोहळा । केवीं लागे ॥ ३२ ॥
अगा अज्ञान नव्हे । तरी उत्पन्न केवीं आधवें ।
मग बंध मोक्ष संभवे । कोठें कोणा ॥ ३३ ॥
नसतां बद्धपणाची वार्ता । मुमुक्षु बोलावा केउता ।
साधक सिद्ध हीं पाहतां । नाम कें कवण ॥ ३४ ॥
आत्म्यासी नहीं आत्मस्मरण । तरे कैंचें प्रातःस्मरण ।
स्नानसंध्यादि सदाचरण । कोठें भिन्न नामक्रिया ॥ ३५ ॥
तैसेचि ब्रह्मचर्य गृहस्थ । संन्यासी कीं वानप्रस्थ ।
हें नामरूप समस्त । ज्ञात्यासे नलगे ॥ ३६ ॥
अगा हें बोलणें जितुकें । अर्थ घेतां अवघें फिकें ।
तोही अर्थ वृत्त्यात्मकें भेदचि करी ॥ ३७ ॥
तेही वृत्ति ग्रासूनी । स्वानुभवें समाधानी ।
त्या स्वानुभवासी मिळणी । अखंडैकरसीं जेव्हां ॥ ३८ ॥
ते स्थितीसी म्हणों काय । सरला वाचेचा उपाय ।
देवदत्ता हेचि निर्भय । समाधाना समाधि ॥ ३९ ॥
ऐसी हे अद्वैतसंपदा । तुजसी वरील देवदत्ता ।
हा प्रसाद घेईं तत्त्वतां । नव्हे अन्यथा कल्पांतीं ॥ २०४० ॥
हा तुमचा आमुचा संवाद । जितुका झाला अनुवाद ।
याचें अनुसंधान जे विशद । श्रवणमननें राखिती ॥ ४१ ॥
त्यांसी कायफलप्राती । हेंचि श्लोकीं निरोपिजेती ।
तेथून ग्रंथाची समाप्ती । परिपूर्ण झाली ॥ ४२ ॥

सदाचारमिमं नित्यं येऽनुसंदधते बुधाः ।
संसारसागरात् शीघ्रं मुच्यंते नात्र संशयः ॥ ५४ ॥
इति श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमच्छंकर भगवता कृतं
सदाचारस्तोत्रं संपूर्णम् ॥

ऐसिया सदाचरणासी । जे ज्ञाते धरितील मानसीं ।
ते शीघ्र सुटती निश्चयेंसीं । संसारसिंधूपासुनी ॥ ४३ ॥
पूर्वी वर्णिला अधिकार । योगिशब्दें प्राप्त विचार ।
ऐसे जे कां ज्ञाते नर । साधनचतुष्टययुक्त ॥ ४४ ॥
बोलिल्या रीतीं सदाचरण । अभ्यासयुक्त श्रवणमनन ।
दृढ धरिती अनुसंधान । योषा जरापरी ॥ ४५ ॥
ते शीघ्रचि भवापासूनी । सागररूप संसाराहूनी ।
मुक्त होती येथें कोणीं । संशयो न करावा ॥ ४६ ॥
अधिकार नाहीं जयासी । आणि न प्रवर्तती अभ्यासीं ।
ते वरपडे होती पाषांडासी । उगे शब्द ऐकतां ॥ ४७ ॥
अस्मात् ऐसें न करावें । खरेंचि जयासी मुक्त व्हावें ।
तेणें अगत्य अभ्यासावें । बोलिल्या रीतीं ॥ ४८ ॥
अभ्यासीं होय प्रवृत्ती । चढती क्षणक्षणां प्रीती ।
तेणें कर्माची समाप्ती । करोनि हेंचि आदरावें ॥ ४९ ॥
ऐसें न होतां उगें ऐकोनी । कर्म त्यागील जो कोणी ।
शपथ असे तयालागूनी । ब्राह्मण्याची ॥ २०५० ॥
कारण कीं यथार्थ ज्ञान नव्हे आणि कर्मापासूनि भ्रष्टावें ।
तेणें इहपरत्र मुकावें । हें नव्हेचि विहित ॥ ५१ ॥
पूर्ण समाधान ज्ञानें होय । त्यासी त्यागा म्हणणें काय ।
आपेंआप सोडोनि जाय । कर्मचि साधकां ॥ ५२ ॥
पर्वतीं लागतां अग्न । श्वापदासी जा म्हणे कोण ।
तेवीं यथार्थ होतां ज्ञान । तरी मग क्रिया कोठें ॥ ५३ ॥
ज्ञानें कर्म हें गळेना । आणि अज्ञानबंध तुटेना ।
तरी आडनांव ऐसें ज्ञाना । कां न म्हणावें ॥ ५४ ॥
परे साधकें एकाग्रभावें । अनुसंधान दृढ धरावें ।
मग निपटूनि जाती आघवें । परिपक्वदशा होतां ॥ ५५ ॥
जैसी शेंद पिकतांक्षणीं । वेगळी होय देंठाहूनी ।
तेवीं साधक अभ्यासेंकरूनी । कर्मापासूनि मुक्त होय ॥ ५६ ॥
तस्मात् अभ्यास करावा । तोचि एक मुक्त व्हावा ।
येथें संशयो न धरावा । मुमुक्षु साधकें ॥ ५७ ॥
देवदत्ता आतां तुवां । जतन करोनि ज्ञानदिवा ।
भोगीं स्वात्मसुखाचा ठेवा । आज्ञा घेऊनि आमुची ॥ ५८ ॥
मग करोनि साष्टांग नमना । सव्य घालूनि प्रदक्षिणा ।
देवदत्त मागील चरणा । आज्ञा वंदूनि निघाला ॥ ५९ ॥

मागेंपुढें आंतबाहेरीं। अथवा गुरूचि चराचरीं।
वियोगसंयोगाचा निर्धारीं। नुरेचि खेद ॥ २०६० ॥
सर्वसंगपरित्याग। करूनि उरला अभंग।
जळीं फिरे जेवीं तरंग। तेवीं देह विचरे ॥ ६१ ॥
एवं शकरें वेदार्थ संस्कृतीं। काढिला वेदांतसंमतीं।
त्याचाचि अर्थ हा प्राकृतीं। हेही कृती स्वामींची ॥ ६२ ॥
ग्रंथ संपतां स्तुतिउत्तरें। बोलताती अपारें।
परी अर्थासी कारण येरें। चाड नाहीं ॥ ६३ ॥
इति श्रीमच्छंकरविरचित। सदाचार शुद्ध वेदांत।
त्याचीच टीका हे प्राकृत। सुबोधरूप ॥ २०६४ ॥
हा ग्रंथ आचार्यें आरंभितां। मंगल केलेंसे स्वमुखता।
त्याहून मुळामाजी इतर नसतां। जें कां होतें अधिक ॥ १ ॥
तें अहिक मंगल शंकरानांदाचें। जें नव्हे मुख्य शंकराचार्यांचें।
काज नसे येथें तयाचें। हें हंसरायें जाणून ॥ २ ॥
मजशीं आज्ञापिलें येऊन। स्वप्नामाजी दृष्टांतवून।
कीं सखया तें करीं न्यून। सश्लोक सटीप ॥ ३ ॥
इतुकेनें आम्हां संतोष। होईल जाणून विशेष।
प्रति करविली हे अशेष। सकल बुधवरदें हंसांकितें ॥ ४ ॥
शके अठराशेंचारोत्तरीं। श्रावणमासीं सुदिनाभीतरी।
लेखन पूर्ण झालें निर्धारीं। हंसकृपेंकरोनी ॥ ५ ॥
इति सदाचारटीका समाप्ता ॥ श्लोकाः ५४ ॥ ओंवीसंख्या २०६४ ॥
एकूण २११८ ॥
॥ संपूर्णमस्तु। श्रीसद्गुरुवर्यार्पणमस्तु ॥
* * * * *